CMYK





सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
सोलापूर | बुधवार, १४ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विनम्र अभिवादन



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची आज (तारखेप्रमाणे) जयंती

### विचारपुष्प



जो कोणी या देशाला आपली मातृभूमी मानेल, भारताच्या संस्कृतीचा ज्यांना अभिमान आहे, ज्यांनी देशाच्या सन्मानासाठी कष्ट उपसले आणि देशाच्या एकतेवर ज्यांची श्रद्धा आहे ते सर्व लोक हिंदुत्वाच्या व्याख्येत येतात.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या,** चतुर्थ सरसंघचालक

# दहावीच्या निकालात मुलींचीच बाजी

## कोकण अव्वल, नागपूर तळाशी




◆ **पुणे, १३ मे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल मंगळवारी ऑनलाईन जाहीर केला. यंदा राज्यात दहावी परीक्षेचा निकाल ९४.१० टक्के लागला आहे. फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या तुलनेत फेब्रुवारी-मार्च २०२५ चा निकाल १.७१ टक्क्याने कमी आहे. सालाबादाप्रमाणे यंदाही निकालात उत्तीर्णांमध्ये मुलींनीच बाजी मारली असून कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक तर नागपूर विभागाचा सर्वांत कमी लागला आहे.

या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.१० आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण २८,५१२ खाजगी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८,०२० विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी २२,५१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.३६ आहे. या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण २४,३७६ पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३,९५४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी ९,४४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ३९.४४ आहे.

मंडळाने विद्यार्थ्यांना गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी बुधवार १४ मे ते २८ मेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचीही मुभा उपलब्ध करून दिली आहे. पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व खाजगी रीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार दिनांक १५ मेपासून मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### नागपूर विभागाचा एकूण निकाल ९०.७८ टक्के

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. उत्तीर्णांमध्ये मुलींचे प्रमाण ९४.१९ टक्के आहे, हे विशेष. नागपूर विभागाचा निकाल ९०.७८ टक्के लागला असून, राज्यात नवव्या क्रमांकावर आहे.

### विदर्भात अमरावती विभाग अव्वल

**अमरावती :** इयत्ता दहावीच्या परीक्षेत अमरावती विभाग राज्यात सहाव्या, तर विदर्भात प्रथम स्थानावर आहे. विभागाचा सरासरी निकाल ९२.९५ टक्के लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत तो २.६३ टक्क्यांनी घसरला आहे.

बुलढाणा जिल्हा ९५.५२ टक्के निकालासह विभागात पहिल्या क्रमांकावर आहे. मुलांपेक्षा मुली उत्तीर्ण होण्याचे प्रमाण यंदाही जास्त आहे.

सोलापूर निकाल वृत्त पान ९ वर

### न्या. गवई आज घेणार सरन्यायाधीश पदाची शपथ

◆ **नवी दिल्ली, १३ मे**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बीआर गवई बुधवारी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना गोपनीयतेची शपथ देणार आहेत. २००७ मध्ये न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन यांची नियुक्ती झाल्यानंतर हे पद भूषवणारे ते दुसरे दलित न्यायमूर्ती असतील. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या निवृत्तीनंतर न्यायमूर्ती गवई हे मुख्य न्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. त्यांचा कार्यकाळ २३ डिसेंबरपर्यंत राहणार आहे.



१६ एप्रिल रोजी प्रचलित प्रक्रियेनुसार सरन्यायाधीश खन्ना यांनी त्यांच्या नावाची केंद्र सरकारकडे शिफारस केली होती. न्यायमूर्ती गवई यांना मे २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात बढती देण्यात आली आणि ते सध्याच्या सरन्यायाधीशांनंतर सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. न्या. गवई यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक ऐतिहासिक निकालांमध्ये सहभाग घेतला आहे, ज्यामध्ये नोटबंदी आणि कलम ३७० रद्द करणे यांचा समावेश आहे. राजकीय निधीसाठी निवडणूक रोखे योजना रद्द करणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाचाही ते भाग होते. न्या. गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावतीमध्ये झाला. त्यांचे वडील रामकृष्ण सूर्यभान गवई आंबेडकरी चळवळीच्या प्रमुख नेत्यांपैकी होते. त्यांनी अमरावतीचे खासदारपद व पुढे बिहार, सिक्कीम आणि केरळचे राज्यपालपद भूषवले. भूषण गवई तीन भावंडांपैकी ज्येष्ठ होते. वडील राजकारण, समाजकारणात सक्रिय असल्याने बालपणापासूनच त्यांना सामाजिक कार्याचा वारसा लाभला. ◂(वृत्तसंस्था)

# व्याप्त काश्मीर रिकामे करा



### परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानला ठणकावले

### तिसऱ्याचा हस्तक्षेप मान्य नाही

◆ **नवी दिल्ली, १३ मे**

पाकिस्तानने बेकायदेशीरपणे अतिक्रमण केलेले व्याप्त काश्मीर तत्काळ रिकामे करावे, भारताचे बऱ्याच काळापासूनचे हे धोरण आहे आणि त्यात कोणताही बदल झालेला नाही. व्याप्त काश्मीर किंवा जम्मू-काश्मीरशी संबंधित कुठलाही मुद्दा भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय चर्चेतूनच सोडवला जाईल. त्यात कोणत्याही तिसऱ्या पक्षाची भूमिका आम्हाला मान्य नाही, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

पत्रपरिषदेत बोलताना जयस्वाल म्हणाले, व्याप्त काश्मीर भारताचाच भाग आहे, यावर आम्ही ठाम आहोत. त्यात कुठलीही तोडजोड होणार नाही. याप्रकरणी तिसऱ्या देशाची मध्यस्थी आम्हाला मान्य नाही. विजयाचा दावा करणे पाकिस्तानची जुनी सवय आहे. १९७१, १९७५ आणि १९९९ च्या कारगिल युद्धात देखील असेच करण्यात आले होते. ढोल वाजवण्याची पाकिस्तानची सवय आहे, पराभूत झाले तरी ते ढोल वाजवतील. पाकिस्तान सीमेपलीकडून दहशतवादाला पाठिंबा देणे बंद करीत नाही आणि भारताची तशी खात्री होत नाही, तोपर्यंत सिंधू जल करार स्थगित राहणार आहे.

#### चर्चेत व्यापाराचा मुद्दा नव्हता

ट्रम्प आणि व्यापाराबाबत विचारलेल्या प्रश्नावर जयस्वाल म्हणाले, ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यापासून ते १० मे रोजी गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याच्या करारापर्यंत, भारत आणि अमेरिकेमध्ये तत्कालीन लष्करी परिस्थितीवर चर्चा झाली. यावेळी कोणत्याही चर्चेत व्यापाराचा मुद्दा नव्हता.

#### सुरक्षा परिषदेत पुरावे सादर करणार


टीआरएफने पहलगाम हल्ल्याची जबाबदारी घेतली होती. टीआरएफ ही लष्कर-ए-तोयबाची संघटना आहे. आम्ही संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत टीआरएफला दहशतवादी संघटना म्हणून सूचीबद्ध करण्यासाठी विनंती केली आहे. पाकिस्तान दहशतवाद्यांना पाठिंबा देत असल्याचे आमच्याकडे पुरावे असून तेदेखील दिले जाईल. बीएसएफ जवान बीके साहू यांच्या सुटकेसाठी संरक्षण मंत्रालय काम करत असल्याचे जयस्वाल म्हणाले.

भारत आणि पाकिस्तानच्या डीजीएमओ यांच्यामध्ये झालेल्या चर्चेनंतर शस्त्रसंधीवर सहमती झाली. भारतीय लष्कराच्या ताकदीमुळेच पाकिस्तानला गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवणे भाग पडले. भारताने नष्ट केलेली दहशतवादी पायाभूत सुविधांची ठिकाणं केवळ भारतीयांच्याच नव्हे तर जगभरातील इतर अनेक निष्पाप लोकांच्या मृत्यूसाठी जबाबदार होती. पाकिस्तान जितक्या लवकर ते स्वीकारेल तितके चांगले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### महत्त्वाचे

#### विक्रीच्या दबावाने गडगडला निर्देशांक

**मुंबई :** सोमवारी शेअर बाजारातील प्रचंड मोठ्या तेजीनंतर मंगळवारी मात्र मोठ्या घसरणीने साऱ्यांनाच चकित केले. जागतिक बाजारांकडून मिळालेल्या सकारात्मक संकेतांनंतरही भारतीय बाजारातील निर्देशांक आणि निफ्टी मोठ्या घसरणीसह बंद झाले.



मुंबई बाजारातील निर्देशांकात दिवसअखेर १२८१ अंकांची घसरण झाली आणि तो ८१,१४८ वर बंद झाला. निफ्टी ३४६ अंकांनी खाली येत २४,५७८ वर स्थिरावला. दिवसभरातील कारभारात बँक आणि फार्मा निर्देशांक एक टक्क्याहून अधिक वाढीसह बंद झाले. कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ आणि मोठ्या प्रमाणावर झालेली नफा वसुली हे घसरणीमागील मुख्य कारण ठरले. सोमवारी १२ मे रोजी बाजारात मागील चार वर्षातील सर्वात मोठी एक दिवसाची तेजी दिसून आली. त्यापाठोपाठ मंगळवारी बाजारात गुंतवणूकदारांनी नफा वसुली केली.

# जिल्ह्यात दहावीच्या निकालात तीन टक्के घट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र दहावी परीक्षेचा मंगळवारी ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून या निकालात जिल्ह्याचा निकाल तीन टक्के घटला आहे. गेल्या वर्षी ९५.२५ टक्के लागला होता, तर यावर्षी ९२.८0 टक्के निकाल लागला आहे.

पुणे विभागातील २ लाख ६३ हजार १५४ विद्यार्थ्यांपैकी जिल्ह्यातून ६४ हजार ४५४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. राज्यात २ लाख ४९ हजार ५07 उत्तीर्णपैकी जिल्ह्यातील ५९ हजार २७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्हा प्रशासनानकडून कॉपीमुक्त अभियान राबविताना जिल्ह्याच्या प्रशासन कार्यालयातून ऑनलाईन नजर ठेवण्यात आली होती. त्यामुळे निकालात घट झाली असली तरी मुलींनी या परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. जिल्ह्यातील बहुतांश शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनीनी गणित, विज्ञान, संस्कृत यासह इतर विषयात शंभरपैकी शंभर गुण मिळविले आहेत. तर पस्तीस टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. शंभर पैकी पस्तीस टक्के गुण मिळविणाऱ्याचे कौतुक होत असल्याने या विद्यार्थ्यांचीही चर्चा सुरू आहे. जिल्ह्यातील दहावी परीक्षेच्या निकालात मुलींचे उत्तीर्ण प्रमाण ९६.१0 टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ९४. 0४ टक्के आहे. जिल्हा प्रशासनाने कॉपीमुक्त अभियान राबविल्यामुळे दहावीच्या निकालावर परिणाम झाला असल्याची चर्चा होती. त्यानुसार गुणवंत विद्यार्थी चांगल्या गुणाने उत्तीर्ण झाले असले तरी जिल्ह्याचा निकाल मात्र घटला आहे. शहर जिल्ह्यासह मुलामुलींना अपेक्षित गुण मिळाल्याने उद्यापासून सुरू होणाऱ्या ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची धावपळ सुरू झाली आहे.

### देशद्रोहाच्या आरोपाखाली तीन जणांना अटक

◆ **गुवाहाटी, १३ मे**

आसाममध्ये देशद्रोहाच्या आरोपाखाली आणखी तीन जणांना अटक करण्यात आली, असे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर राज्यात एकूण ५६ जणांना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या तिघांची ओळख धुबरी येथील लालचन अली, लखीमपूर येथील समीर अली आणि कार्बी आंगलोंग येथील रकीब हुसेन अशी झाली आहे, असे सरमा यांनी सोमवारी रात्री एक्सवर पोस्टमध्ये म्हटले आहे.

शत्रूशी सहानुभूती दाखविण्याचे कोणतेही कृत्य म्हणजे देशद्रोह आहे. देशद्रोहांवर कारवाई करण्यात आली असून असे ५६ देशद्रोही तुरुंगात आहेत. यापूर्वी, पहलगाम दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानच्या भूमिकेचा बचाव केल्याबद्दल एआययूडीएफचे आमदार अमिनुल इस्लाम यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. ◂(वृत्तसंस्था)

# नेतृत्व असावे तर असे....!

## ● अचानक जवानांना भेटण्यास पोहोचले पंतप्रधान मोदी ● सैन्याचे मनोबल उंचावले

◆ **आदमपूर, १३ मे**

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानवर अपेक्षित असणारी जबरदस्त कारवाई केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी देशाला संबोधित केले. या संबोधनात त्यांनी पाकिस्तानला कठोर इशारा दिला आणि त्यापाठोपाठ आज मंगळवारी ते थेट सीमेवर जवानांना भेटण्यासाठी अचानक दाखल झाले. सैन्याचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने त्यांची ही भेट अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी सकाळी अचानक पंजाबमधील जालंधर येथील आदमपूर एअरबेसवर पोहोचले. येथे त्यांनी हवाई दलाच्या अधिकाऱ्यांची आणि सैनिकांची भेट घेतली. त्यांनी ऑपरेशनबद्दल चर्चा केली. यशस्वी हवाई हल्ल्याबद्दल त्यांनी सैनिकांचे अभिनंदनही केले.

सैनिकांना भेटल्यानंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर लिहिले की, आज सकाळी मी आदमपूर येथील हवाई दलाच्या तळाला भेट दिली आणि आपल्या शूर हवाई योद्ध्यांना आणि सैनिकांना भेटलो. धैर्य, दृढनिश्चय आणि निर्भयतेचे प्रतीक असलेल्या लोकांसोबत राहणे हा एक अतिशय खास अनुभव होता. आपल्या देशासाठी सर्व काही करणाऱ्या आपल्या सशस्त्र दलांचा भारत नेहमीच आभारी आहे. ◂(वृत्तसंस्था)

### घरात घुसून मारू, बचावाची संधीही देणार नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी सकाळी पंजाबमधील आदमपूर एअरबेसवर पोहोचले. येथे ते हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांना भेटले. यानंतर त्यांनी २८ मिनिटे संबोधित केले. मोदी म्हणाले, भारतात निष्पाप लोकांचे रक्त सांडल्याने एकच परिणाम होईल - विनाश आणि सामूहिक विनाश. ज्या पाकिस्तानी सैन्यावर हे दहशतवादी अवलंबून होते, त्यांना भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदलाने पराभूत केले आहे. पाकिस्तानात आता अशी कोणतीही जागा नाही जिथे दहशतवादी बसून शांततेत श्वास घेऊ शकतील. आम्ही घरात घुसून तुमच्यावर हल्ला करू आणि तुम्हाला पळून जाण्याची एकही संधी देणार नाही. आपल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा विचार करून पाकिस्तान बरेच दिवस झोपू शकणार नाही.



पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारताने आपली लष्करी कारवाई पुढे ढकलली आहे. जर पाकिस्तानने पुन्हा दहशतवादी कारवाया किंवा लष्करी धाडस केले तर आम्ही त्याला योग्य उत्तर देऊ. मी हे उत्तर माझ्या स्वतःच्या अटींवर आणि माझ्या पद्धतीने देईन. या निर्णयाचा पाया, त्यामागील विश्वास, तुमचा संयम, धैर्य, शौर्य आणि सतर्कता आहे. तुमचे धाडस, हा उत्साह असाच अबाधित ठेवावा लागेल. आपल्याला सतत सतर्क राहावे लागेल. आपण तयार असले पाहिजे. आपण शत्रूला आठवण करून देत राहावे की हा एक नवीन भारत आहे, त्याला शांतता हवी आहे पण जर मानवतेवर हल्ला झाला तर युद्धाच्या आघाडीवर शत्रूचा नाश कसा करायचा हे भारताला चांगलेच माहिती आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.

# आला रे आला... वेळेआधीच मान्सून आला

## अंदमानात धडक; २७ मे रोजी केरळात आगमन


◆ **नवी दिल्ली, १३ मे**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने मंगळवारी हवामानाबद्दल माहिती दिली आहे. २७ मे रोजी केरळात आगमन होणार आहे. नैऋत्य मान्सून बंगालच्या उपसागराच्या दक्षिणेकडील काही भागात, अंदमान समुद्राच्या दक्षिणेकडील भागात, निकोबार बेटांवर आणि अंदमान समुद्राच्या उत्तरेकडील भागात पुढे सरकत आहे. या काळात दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि अंदमान समुद्रावर पश्चिमेकडील वाऱ्यांचा प्रभाव वाढला आहे. मागील दोन दिवसांत निकोबार बेटांवर झालेल्या मध्यम ते मुसळधार पावसाचा हवाला देत हवामान खात्याने म्हटले आहे. याशिवाय, या भागात आउटगोइंग लॉन्गवेव्ह रेडिएशन मध्येही घट नोंदवण्यात आली आहे. जी ढगाळ हवामान दर्शवते. आयएमडीने स्पष्ट केले, की या सर्व परिस्थिती प्रदेशात मान्सूनच्या प्रारंभासाठी अनुकूल निकष पूर्ण करतात.

**मागील १७ वर्षांचा रेकॉर्ड मोडला**

मान्सूनने अधिकृतपणे दक्षिण बंगालच्या उपसागराचा काही भाग, दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटे आणि उत्तर अंदमान समुद्राचा काही भाग व्यापला असून पुढील २४ तासांत निकोबार बेटांवर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मान्सून २७ मेपर्यंत केरळ किनाऱ्यावर पोहोचणार असून मागील १७ वर्षात प्रथमच मान्सून नियोजित कालावधीच्या चार दिवस आधी केरळमध्ये पोहोचेल.

काही दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्र, मालदीव-कोमोरिन परिसर, संपूर्ण अंदमान-निकोबार बेटे आणि मध्य बंगालच्या उपसागराच्या काही भागात विस्तारेल. ◂(वृत्तसंस्था)



**मान्सूनचा तारखेनुसार देशव्यापी प्रवास**

| | |
|---|---|
| १५ मे : | अंदमान आणि निकोबार |
| १ जून : | तामिळनाडू, लक्षद्वीप, आसाम, मेघालय |
| ५ जून : | गोवा, आंध्र प्रदेश किनारपट्टी, कर्नाटक, पश्चिम बंगाल |
| ६ जून : | महाराष्ट्र, आंध्र प्रदेशचे किनारपट्टी व्यतिरिक्त जिल्हे. |
| १० जून : | मध्य महाराष्ट्र, मुंबई, विदर्भ, तेलंगणा, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड, बिहार |
| १५ जून : | गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश |
| २० जून : | गुजरातचे पूर्ण जिल्हे, राजस्थान, उत्तराखंड, दिल्ली |
| २५ जून : | राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश |

### वाटचालीवर लक्ष ठेवून

दरवर्षी महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन ६ जून रोजी होते. यंदा अंदमानमध्ये मान्सून ८ ते १० दिवस आधी आला. केरळमध्ये लवकर नैऋत्य मान्सून वारे पोहोचतील. महाराष्ट्रात कधी आगमन होईल याचा अंदाज लवकरच वर्तवला जाईल. सध्या आम्ही मान्सूनच्या वाटचालीवर लक्ष ठेवून आहोत.

**- एस. डी. सानप,** शास्त्रज्ञ, पुणे हवामानशास्त्र विभाग

# सोलापुरात सलग दोन दिवस जोरदार पाऊस

## यंदा मान्सून लवकर दाखल होण्याचे संकेत

सोलापूर शहरात आज दि.१३ मे रोजी सायंकाळपासूनच मुसळधार पाऊस झाला. शहरातील सखल भागात पाणी साचल्याचे चित्र होते. त्यामुळे काही प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात ४ ते ५ दिवसांपासून आभाळी वातावरणामुळे तापमानात घट झाली होती. दुपारी मात्र चांगलाच उकाडा होता. सलग दोन दिवस सायंकाळी पावसाने हजेरी लावली. सोमवारी व आज मंगळवारी दि. १३ मे रोजीही दुपारी ३९ अंश सेल्सियस तापमान झाले आणि सायंकाळी सहानंतर सलग दोन तास जोरदार अवकाळी पाऊस झाला. एक दिवसाआड जोरदार पाऊस पडू लागल्याने यंदा मान्सुन लवकरच दाखल होण्याचे संकेत मिळत आहेत.



मे महिन्याच्या सुरूवातीला तापमानाचा पारा ४४.७ अंश सेल्सियसपर्यंत होता. त्यामुळे सर्वजण उकाड्याने हैराण झाले होते. गेल्या आठवड्यापासून वादळी वारे व ढगाळ हवामानामुळे तापमान घटले. अवकाळी पावसाची शक्यताही हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत होती. त्यानुसार गेल्या दोन दिवसांपासून रोजच पाऊस पडू लागला आहे. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यातही अवकाळीच्या सरी काही ठिकाणी बरसल्या. त्यानंतर प्रचंड तापमान वाढून उकाडाही वाढला होता. आता तापमानाचा पारा खाली आल्याने हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली असून, तर काही ठिकाणी हलका पाऊस किंवा ढगाळ वातावरण राहील असे सांगितले आहे. तर जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनचा पाऊस सरासरीच्या १0३ टक्के होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान, या जोरदार पावसामुळे नांगरण झालेल्या शेतीला तर फायदा होणारच असून, पेरणीपूर्व मशागतीही चांगल्या होणार असल्याची माहिती शेतकरी बांधव देत आहेत. सध्या जिल्ह्यातील शेतकरी नांगरणी, कुळवणी, पणजी, कुळव मारणे वगैरे कामे करीत आहेत. तर काही शेतकऱ्यांनी शेतातील दगड वेचणे, वाढलेली काटेरी झुडुपे तोडणी करून पेरणीसाठी जमिनी तयार करून ठेवल्या आहेत. दरम्यान, मे एन्डपर्यंत ही सर्व कामे झाल्यानंतर पाऊस पडताच ८ जून पासून जिल्ह्यातील शेतकरी पेरणीसाठी सज्ज होतो. सध्या वातावरणातील होत असलेल्या बदलामुळे तापमानातही चढउतार दिसून येत आहे.

## महत्त्वाचे...


### सोलापुरातील तरुणी हैदराबादमध्ये झाली जखमी

**सोलापूर, दि. १३ मे-**

सोलापुरातील तरुणी हैदराबाद येथे एसटीने प्रवास करताना चालकाने ब्रेक मारल्याने लोखंडी पाईपला धडकून जखमी झाली. हा अपघात १० म रोजी सायंकाळी ५ वाजता घडला. नेहा विकी झिझोडकर (वय ३०, रा. सिध्देश्वर पेठ, सोलापूर) असे जखमी तरुणीचे नाव आहे. १० मे रोजी नेही ही लिंगमपल्ली ते चार मिनार असा एसटीतून प्रवास करत होती. लिंगमपल्लीपासून २०० मीटर अंतरावर असताना एसटीच्या समोरील वाहनाने अचानक ब्रेक मारले. यावेळी एसटीच्या चालकाने एसटीचेही बेक मारल्याने उभा राहून प्रवास करणाऱ्या नेहाचे डोके एसटीतील लोखंडी पाईपला धडकले. यात डोक्याला जख्म झाल्याने हैदराबाद येथे उपचार करून १३ रोजी सकाळी ११.५५ वाजता स्वत; शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरल्याने वाफळेतील तरुण जखमी

**सोलापूर, दि. १३ मे-**



यावली ते माढा असे दुचाकीवरून जाताना अंजनगाव शिवारात दुचाकी घसरून झालेल्या अपघातात मोहोळ तालुक्यातील वाफळे येथील तरुण जखमी झाला. हा अपघात सोमवारी रात्री १० वाजता घडला.गणेश मच्छिंद्र चव्हाण (वय २३) असे तरुणाचे नाव आहे. गणेश हा सोमवारी रात्री १०.३० च्या सुमारास यावली ते माढा रोडवरून दुचाकी चालवित जात होता. त्यावेळी अंजनगाव शिवारात अचानक दुचाकी घसरली. यात खाली पडल्याने डोक्याला जख्म झाली असून दोन्ही हाता व पायाला खरचटल्याने आणि चेह-याला जखम झाल्याने माढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून वडील मच्छिद्र यांनी रात्री २.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### झोपेत शुध्द हरपलेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ मे-**

झोपेत अंसताना शुध्द हरपलेल्या महिलेचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी सकाळी १० वाजता घडली. लक्ष्मी दिपक शिवशरण (वय ४२, रा. रामवाडी ) असे महिलेचे नाव आहे. लक्ष्मी या मंगळवारी रात्री १२.३० वाजता त्यांच्या रामवाडी येथील घरात झोपी गेल्या. दरम्यान सकाळी ८.३० च्या सुमारास त्यांना घरातील लोकांनी उठविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या झोपेतून उठत नसल्याने त्यांना बेशुध्द अवस्थेत सकाळी १० वाजता मुलगा रोहित शिवशरण यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्या मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### नातेवाईकांनी रागावल्याने केले सडा मारण्याचे औषध प्राशन

**सोलापूर, दि. १३ मे-**

घरातील लोक रागावल्याने १५ वर्षाच्या मुलीने सडा मारण्याचे औषध प्राशन केले. हा प्रकार सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास बापूजी नगरात घडला. संबाधी सूर्यकांत गायकवाड (वय १५) असे मुलीचे नाव आहे. सोमवारी संबाधी ही तिच्या बापूजी नगरातील घरात असताना, कोण्या तरी कारणाने घरातील लोक तिला रागावले. याचा राग मनात धरून मानसिक तणावाखाली आलेल्या संबाधी हिने सडा मारण्याचे औषध प्राशन केले. यात तिला त्रास होऊ लागल्याने दुपारी ४.१५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सिव्हील हॉस्पीटलच्या ओपीडीतून मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. १३ मे -**

सोलापुरातील सिव्हील हॉस्पीटलमधील ओपीडी क्र. १७ मधून चोरट्याने डॉक्टरांचा १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत गोरक्ष राधेशाम मल्लाह (वय ३२, रा. ५, बी/१ क्वॉर्टर्स, सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ मे रोजी सायंकाळी गोरक्ष मल्लाह हे ओपीडी क्र. १७ येथे होते. त्यावेळी चोरट्याने त्यांचा १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

### बाळे येथून दुचाकीची चोरी


**सोलापूर, दि. १३ मे-**

बाळे येथून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत राघवेंद्र चंद्रकांत जानकर (वय ४५, रा. बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राघवेंद्र जानकर यांनी ३ मे रोजी रात्री त्यांची एमएच १३ ए आर ८२१५ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.

### 'मोदी मधला दादा झाला का ?' म्हणून तरूणास धावत्या रिक्षासमोर ढकलले

**सोलापूर, दि. १३ मे-**

मोदी मधला दादा झाला का म्हणून तरूणास धावत्या रिक्षासमोर ढकलून दिल्याने त्याच्या पायावरून रिक्षा जाऊन पाय फ्रॅक्चर होण्यास कारणीभूत झालेल्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभिजीत ज्ञानेश्वर बोराडे (वय ३५, रा. रेल्वे कॉलनी, शासकीय दूध डेअरीसमोर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विकि म्हेत्रे (रा. मोदी, सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ एप्रिल रोजी साडेआठच्या सुमारास मोदी येथे अभिजित बोराडे व त्याचा मित्र बंडू डोलारे हे मिळून प्रविण टी हाऊसजवळ चहा पिण्यासाठी चालत होत होते. त्यावेळी विकि म्हेत्रे याने बोराडे यास तु मोदी मधला दादा झाला का असे म्हणून धक्काबुक्की करून बोराडे यास रस्त्याने जाणाऱ्या धावत्या रिक्षासमोर ढकलून दिले. त्यावेळी रिक्षाचे चाक हे बोराडे याच्या पायावरून जाऊन पाय फ्रॅक्चर झाला. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.




# बाजार समितीच्या राजकारणात रंगले मानापमान नाट्य

### पहिली संधी मिळायला हवी होती म्हणून सभापती निवडीला गैरहजर : राजशेखर शिवदारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मे**





सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पहिल्या वर्षासाठी मला मिळायला हवे, अशी माझी माफक अपेक्षा होती. पण या निवडीत माझा अनादर झाला. त्यामुळेच मी सभापती निवडीवेळी अनुपस्थित राहिलो अशी भूमिका घेतल्याचे माजी सभापती राजशेखर शिवदारे यांनी दिली. बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापतींची निवड रविवारी झाली. या निवडीवेळी संचालक मंडळातील ज्येष्ठ संचालक राजशेखर शिवदारे अनुपस्थित होते. याबदल शिवदारे म्हणाले, बाजार समितीच्या आजवरच्या राजकारणात काय झाले हे सर्वांनाच ज्ञात आहे. माझ्या सभापतिपदांच्या काळात अचानकपणे अविश्वास ठराव आणण्यात आला. मला चुकीच्या पद्धतीने बाजूला करण्यात आले. त्यामुळे बाजार समितीचे सभापतिपद प्रथम मला मिळायला हवे, अशी भूमि का मी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे मांडली होती. बाजार समितीच्या संस्थापकांचा वारसदार म्हणून मी माझी भावना व्यक्त केली होती. संचालक मंडळाची निवड झाल्यानंतर आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटायला गेलो. मुख्यमंत्र्यांनी दोन दिवसांत निर्णय कळवितो, असे सांगितले होते. परंतु, या भेटीपूर्वीच सभापतिपदाचा निर्णय झालेला असावा, असे आज मला वाटत आहे. निवड करताना मला विश्वासात घेण्यात आले नाही.

> **पॅनलमधून बाहेर पडण्याचा दिला होता सल्ला : शिवदारे**
>
> निवडणुकीत जागा वाटपादरम्यान माझ्या सासऱ्यांचे निधन झाले. त्यामुळे जागा वाटपाच्या बैठकांना मी गैरहजर राहिलो. या काळात आमच्या गटाला केवळ एक जागा देण्यात आली. आम्हाला दोन जागा हव्या होत्या. त्यावेळी माझ्या सहकाऱ्यांनी मला या पॅनलपासून बाजूला जाण्याचा सल्ला दिला होता, पण दिलेला शब्द म्हणून त्यांच्यासोबत राहिलो, असे शिवदारे म्हणाले.

# 'सुयश'च्या तीन शाळांचे दहावीत उज्वल यश

### सुयश गुरूकुल : मंजिरी मसलकर प्रथम



**सोलापूर, दि. १३ मे -**

मार्च २०२४-२५ मध्ये घेतलेल्या दहावी स्टेट बोर्ड परीक्षेचा निकाल लागला. सुयश गुरुकुलमधील एकूण ४० विद्यार्थी बसले होते. २ विद्यार्थी हे ९० टक्केच्या पुढे आहेत. तर १८ विद्यार्थी ८० टक्केच्या खाली आहेत. यशस्वी विद्यार्थी याप्रमाणे - मंजिरी मसलकर - ९८ टक्के (पहिली), स्वरांजली गायकवाड - ९७.८० टक्के (दुसरी), संकेत जाधव - ९७.८० टक्के (दुसरा), रत्नदीप कदम, ९७.३३ टक्के (तिसरा).

**सुयश विद्यालय : सिद्धांत तेलकर प्रथम**

सुयश विद्यालय मधील एकूण ४३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १२ विद्यार्थी हे ९० टक्केच्या पुढे आहेत. तर १२ विद्यार्थी हे ८० टक्के पर्यंत गुण मिळविले आहेत. यशस्वी विद्यार्थी आणि कंसात गुण टक्के याप्रमाणे - सिद्धांत तेलकर - प्रथम (९८ टक्के), तुलसी बंडीवडार - द्वितीय (९७ टक्के), समृद्धी कुंभार - तृतीय (९६.६० टक्के), तेजस माहुले (९६.६० टक्के).

**सुयश सेंट्रल स्कूल : अथर्व पवार प्रथम**

दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा निकाल आज लागला. त्यात सुयश सेंट्रल स्कूल मधील एकूण ३६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३ विद्यार्थी हे ९० टक्केच्या पुढे आहेत. तर ३३ विद्यार्थी हे ८० टक्के पर्यंत गुण मिळविलेले आहेत. यशस्वी विद्यार्थी याप्रमाणे - अथर्व पवार - ९१ टक्के (पहिला), समिक्षा कापसे - ९.४० टक्के (दुसरी), गणेश गिराम-९०.२० टक्के (तिसरा). संस्थेचे सचिव केशव शिंदे, मुख्याध्यापिका विद्या शिंदे आणि सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# इंदिरा कन्या प्रशालेची प्रगती जानराव ९७.८० टक्के गुण घेऊन प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१३ मे-**

दहावीच्या परीक्षेत येथील इंदिरा कन्या प्रशालेची प्रगती रत्नदीप जानराव हि ९७.८० टक्के गुण घेऊन प्रथम आली. नेताजी प्रशालेची साक्षी नारायण नीळ ९६.४० टक्के गुण घेत द्वितीय तर नागनाथ विद्यालयाची प्रिया बब्बन काळे हि ९६ टक्के गुण घेऊन तिसरी आली. मोहोळ शहरातील राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशालेचा दहावी निकाल याप्रमाणे : प्रथम-प्रगती रत्नदीप जानराव ९७.८० टक्के, द्वितीय- गरगडे स्नेहल शिवदास ९६.२० टक्के, तृतीय- अथर्व प्रवीण डोके ९४ टक्के, नेताजी प्रशाला : प्रथम- साक्षी नारायण नीळ ९६ .४० टक्के, दुसरा- तृप्ती उदय काळे ९५ टक्के, तिसरा - अर्चित शहाजी सोनटक्के ९१.८० टक्के, नागनाथ विद्यालय : प्रथम-प्रिया बबन काळे ९६ टक्के, दुसरा- सृष्टी अतिन क्षीरसागर ९४.६० टक्के, तिसरा-अब्दुल रहमान फिरोज शेख ९२.८० टक्के, विवेकानंद प्रशाला : प्रथम-दीपक सोमनाथ बनसोडे ७०.४० टक्के, द्वितीय गीतांजली सचिन कुंडे६६.४० टक्के, तृतीय -वैष्णवी दादा सरवदे ६०.८० टक्के, संभाजीराव गरड हायस्कूल( इंग्रजी माध्यम) : प्रथम -पायल राजेंद्र राऊत ९२.६० टक्के, द्वितीय -निर्मिती नितीन पाटील ९२ टक्के, तृतीय - पूजा ओम कळसे ८८.६० टक्के. मराठी माध्यम : प्रथम - प्रतीक्षा बाळासाहेब इंगोले ९१.६० टक्के, द्वितीय हुमेरा शकील अहमद बागवान - ८९.२० टक्के, तृतीय - श्रावणी संतोष थोरात ८९ टक्के. शंकरराव बाजीराव पाटील प्रशाला अनगर : प्रथम- प्रतीक प्रशांत शिंदे ९६ टक्के, द्वितीय - ईश्वरी मुकुंद गोटे ९५.४० टक्के, तृतीय रचना राजेंद्र मते आणि तनिष्का गणेश सोनटक्के दोघींनाही ९४.६ टक्के .गुण मिळाले.

# छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी




### संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या दि. २७ डिसेंबर २०२३ रोजीचे शासन परिपत्रकानुसार उद्या दि. १४ मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती आहे. मात्र बऱ्याच शासकीय व निमशासकीय कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी केली जात नाही. महापुरुषांची जयंती साजरी करणे हे शासन निर्णयानुसार बंधनकारक आहे; तरी देखील काही कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी केली जात नाही. यामुळे अशा अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी न केल्याने काही शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडून शिवप्रेमी व शंभूप्रेमींच्या भावनेचा अवमान केला जातो. तरी आपण तात्काळ जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना उद्या दि. १४ मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्याचे आदेश द्यावेत, जेणेकरुन शंभूप्रेमींच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत व शासन परिपत्रकाचा अवमान होणार नाही. यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला जिल्हाध्यक्षा मीनल दास, उपशहर प्रमुख माधुरी चव्हाण, जिल्हा सचिव दिलीप निंबाळकर, शहर संघटक सतीश वावरे, उपाध्यक्ष सिद्धाराम सावळे आदी उपस्थित होते.

# ट्रक जबरदस्तीने चोरून नेणाऱ्यास अटक

### माळशिरस येथील यादव पेट्रोल पंपाजवळील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे -**

पेट्रोल संपल्याचा बहाणा करून ट्रकमध्ये बसल्यानंतर चालकाचा चाकूचा धाक दाखवून लोखंडी अँगल आणि म लट्रक असा ६१ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेणाऱ्या तरुणास माळशिरस पोलिसांना अटक केली. ही घटना माळशिरस येथील यादव पेट्रोल पंपाजवळ घडली. विशाल धोंडीराम मदने (वय २१, रा. माऊली चौक, माळशिरस) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत शरीफ अहमद निसार अहमद (वय ५४, रा. राजीव गांधी नगर, एम डी रोड, मिरा डातर दर्गा, मुंबई) यांनी फिर्याद दाखल केली आहे. शरीफ अहमद हे ट्रकचालक असून १२ मे रोजी पहाटे दीडच्या सुमारास ते त्यांच्या ताब्यातील डीडी ०३ ए ९७१४ क्रमांकाच्या ट्रकमध्ये लोखंडी अँगल घेऊन माळशिरस येथील यादव पेट्रोल पंपाजवळून जात होते. त्यावेळी शरीफ हे चहा पिण्यासाठी पेट्रोल पंपाजवळील चहा टपरीवर थांबले असताना विशाल मदने हा त्यांच्याजवळ आला. मदने याने शरीफ यांना माझ्या मोटारसायकलमधील पेट्रोल संपले आहे असा बहाणा करून तो शरीफ यांच्या ट्रकमध्ये बसला. त्यानंतर मदने याने शरीफ यांना चाकूचा धाक दाखवून त्यांना ठार मारण्याची धमकी देऊन शिवीगाळ करीत मारहाण केली. मदने याने शरीफ यांच्या ताब्यातील मालट्रक थांबविण्यास भाग पाडून शरीफ यांना खाली उतरवून ४० लाख रुपये किंमतीचा ट्रक व त्यातील २१ लाख १ हजार ५४० रुपये किंमतीचे लोखंडी अँगल जबरदस्तीने चोरून नेले. याबाबत शरीफ यांनी माळशिरस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर मदने यास पोलिसांनी अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक गोसावी पुढील तपास करीत आहेत.

# जलकोटी महेश्वर येथील महाराजांची सहारा वृद्धाश्रमास भेट

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १३ मे -**




लोकप्रतिष्ठा विचार मंच गौडगाव मागील ५ वर्षापासून सुरु केलेल्या सहारा वृद्धाश्रमामध्ये आज उत्तर प्रदेशातील साधमुनींनी प्रथम सदिच्छा भेट देऊन राजभर मुक्काम करुन वृद्धाश्रमातील वृद्धांचे विचारपूस करुन त्यांच्यावर झालेल्या त्यांच्या आप्तेष्टाकडून होणाऱ्या दुःखाचे जाणीव करुन घेतले. तसेच त्यांना मानसिक आधार देऊन त्यांना शास्त्रातील काही गोष्टी ही सर्वांना आशीर्वाद देऊन आपल्याला पायी प्रवासाला निघून गेले. मागील काही महिन्यांपासुन २० राज्य चालत धार्मिक स्थळाला भेटी देत आज त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. काहीही आधार नसताना सर्वांना आधार देणाऱ्या तसेच सहारा वृद्धाश्रमाचे संचालक राहुल भड यांचं कौतुक करुन कार्यकर्त्याची दखल घेतली.

# मनिषा माने-मुसळेला १५ मे पर्यंत पोलिस कोठडी

### डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे -**



एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या मनिषा माने-मुसळे या महिलेस मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रमसिंग भंडारी यांनी मंगळवारी सदर बझार पोलिसांच्या म ागणीनुसार दोन दिवस म्हणजे १५ मे पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

मनिषा महेश माने उर्फ मुसळे (वय ४५, रा. ८०, बसवराज नेले नगर, जुळे सोलापूर) असे पोलिस कोठडी मिळालेल्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी मनिषा माने हिच्या पोलिस कोठडीचा हक्क अबाधित ठेवत २५ एप्रिल रोजी १४ दिवसाच्या न्यायालयीन कोठडीची मागणी न्यायालयाकडे केली होती. त्यानुसार न्यायालयाने मनिषा मानेला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला होता.

मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरीष पद्माकर वळसंगकर (वय ७०, रा. १५८ सी, रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी १८ एप्रिल २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातील स्वतःच्या बेडरूमला अटॅच असलेल्या बाथरूममध्ये स्वतः च्या परवाना असलेल्या पिस्तलमधून कानशिलामध्ये गोळी घालून घेऊन आत्महत्या केली आहे. डॉ. वळसंगकर यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीनुसार, ज्या माणसाला मी शिकवून आज ए ओ केले आहे आणि चांगला पगार देतो आहे, त्याने खोटारडे आणि घाणेरडे आरोप करून मला धमकावले आहे, त्याचे मला आतीव दुःख आणि म्हणून मी माझे जीवन संपवत आहे, असे लिहून आत्महत्या केली. त्यामुळे याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर (वय ४५, रा. एस पी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस, वळसंगकर हॉस्पिटल, मोदी रेल्वे क्रॉसिंग, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मनिष माने-मुसळे हिच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी मनिषा मानेला अटक केली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अजित लकडे करीत आहेत.

याप्रकरणात सरकारपक्षाच्यावतीने ॲड. श्रीमती मांजरे यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. प्रशांत नवगिरे काम पाहात आहेत.

> **आर्थिक व्यवहाराची तक्रारच नव्हती : ॲड. नवगिरे**
>
> या गुन्ह्यातील आरोपी मनिषा माने-मुसळे हिचे वकिल ॲड. प्रशांत नवगिरे यांनी याप्रकरणात आर्थिक व्यवहाराची तक्रारच नसल्याचे सांगितले. डॉ. वळसंगकर यांनी आर्थिक व्यवहारातून आत्महत्या केली असे केसच नाही. फिर्यादीमध्येही आर्थिक व्यवहाराचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे मनिषा माने यांच्या व्यवहाराचा कुठेही संबंध येत नाही. त्यामुळे त्यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे त्यांच्या पोलिस कोठडीची गरज नव्हती असे ॲड. नवगिरे यांनी सांगितले.

### या मुद्द्यांवर होणार पोलिसांचा तपास

- डॉ. वळसंगकर हॉस्पीटलचे सी ए गिरीचंद्र चाफळकर यांच्याकडे तपास करताना मनिषा माने हिने अनधिकृतपणे ८ एप्रिल २०२२ ते ७ डिसेंबर २०२४ या कालावधीत तिच्या बँक खात्यावर ३९ लाख ८७ हजार ६८० रुपये इतकी रक्कम स्वतःच्या खात्यावर भरून घेतली असल्याचे दिसून आले आहे. ती रक्कम आरोपीकडे कोणत्या कारणास्तव आली आहे.
- वळसंगकर हॉस्पीटल येथे कामास असलेल्या कर्मचाऱ्यांना आरोपीने सदर रकमा रोख स्वरूपात देऊन त्या रकमा कर्मचाऱ्यांच्या खात्यावरून आरोपीच्या खात्यावर ऑनलाईन ट्रान्सफर करण्यात आले असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून या रोख रकमा कोठून आल्या.
- मनिषा माने हिने तिचे इन्कम टॅक्स रिटर्न भरतेवेळी ७० लाख ४३ हजार १६० रुपये इतकी रक्कम खात्यात असल्याचे दाखविले नाही. या रकमेच्या उत्पन्नाचा स्रोत तपासणे.
- आरोपीने मोठ्या प्रमाणात तिच्या उत्पन्न स्रोताशिवाय रक्कम तिच्या खात्यावर असल्याचे निष्पन्न झाल्याने ही रक्कम कोठून आली.
- आरोपीने हॉस्पीटलमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असून त्याची माहिती मयत डॉ. वळसंगकर यां मिळाल्याने त्यांनी आरोपीचे अधिकार काढून घेतले. म्हणून आरोपीने स्वतः आत्महत्या करून तुम्ही मिळविलेली इज्जत धुळीला घालवते असे म्हणल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्याबाबत तपास करणे.
- आरोपीस हॉस्पीटलमध्ये गैरव्यवहार करण्यास कोणी सहकार्य केले आहे काय.
- आरोपीस डॉ. वळसंगकर यांची बदनामी करण्यासाठी कोणी मदत केली आहे का, आरोपीने त्यांचीशी कट केला होता का याबाबत तपास करणे.
- आरोपीने तिच्या उत्पन्न स्रोतापैकी प्राप्त केलेली रक्कम कोठे वापरली किंवा तिचा कशाप्रकारे विनियोग केला याबाबत तपास करणे.



## वडिलांच्या मृत्यूनंतरचा विधी करून परतताना अपघातात मुलाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१३ मे**

कर्नाटक येथील बेंगलोर मध्ये रेल्वेमधून पडून झालेल्या अपघातामध्ये वडिलांच्या मृत्यूनंतरचा विधी उरकून परत गुजरातकडे येत असताना झालेल्या रस्ते अपघातात मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला.

हर्षद झंकार योगी (वय ३५) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. या अपघातात दिनेश हिरा नाथयोगी (वय ४०), कृष्णा गोरबहादुर कुवर (वय ५०), पुष्कर झंकर योगी (वय ३०) तिघेही राहणार वापी (गुजरात) व निशा हर्षद योगी (वय ३५) रा. बेंगलोर(कर्नाटक) असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. हा अपघात आज दि. १३ मे रोजी करमाळा-कुर्डूवाडी रस्त्यावरील वरकुटे जवळ पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास झाला. या अपघातात चार जण जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, गुजरात येथील एक नेपाळी कुटुंब हे बेंगलोर कर्नाटक येथे रेल्वेतून पडून झालेल्या अपघातातील झंकर योगी यांचा मृत्यूनंतरचा विधी करायला गुजरात वरून बेंगलोर येथे वाहनाने गेले होते. तेथे त्यांचा अंत्यविधी उरकून ते परत गुजरातकडे निघाले होते. त्यावेळी कुर्डूवाडीजवळ वरकुटे नजीक कार आली असता रस्त्याच्या कडेवरील लिंबाच्या झाडावर जाऊन आदळली. यामध्ये एक जण जागीच ठार झाला तर चार जण जखमी झाले. याची खबर पोलिसांच्या ११२ क्रमांकावर करण्यात आली. यावेळी मेजर आनंद पवार, हवालदार आप्पा लोहार, सतीश इंगोले व ॲम्बुलन्स चालक माजी सैनिक साजिद शेख यांनी तातडीने अपघात स्थळी धाव घेतली. तेथील मयत व जखमींना बाहेर काढून त्यांना करमाळा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. यामध्ये दोघा गंभीर जखमींना खाजगी दवाखान्यात उपचार करण्यात आले. इतरांवर उपजिल्हा रुग्णालयातच उपचार चालू आहेत. यामध्ये या कुटुंबाकडे झालेल्या अपघातामध्ये कोणीही नातेवाईक व्यवस्थित नसल्याने ॲम्बुलन्स चालक माजी सैनिक साजिद शेख यांनी त्यांची सर्व सुश्रुषा केली. याबाबत करमाळा पोलिसांमध्ये अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत माने हे करीत आहेत.

## फिरस्त्या मुलांच्या पुनर्वसनासाठी सरकार फिरते पथक योजना राबविणार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ मे:**

रस्त्यावर राहणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' ही सर्वंकष योजना राज्यात नियमित स्वरूपात राबविण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयासह ६ महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

राज्यातील रस्त्यावर राहणाऱ्या हजारो बालकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि नवजीवनाची संधी मिळणार असून ही योजना बालहक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकेत प्रत्येकी एक व मुंबई महानगरपालिकेमध्ये पुर्व व पश्चिम उपनगरांसाठी प्रत्येकी एक अशी एकूण ३१ फिरती पथके सुरू करण्यात येणार असून, आगामी काळात याची व्याप्ती राज्यात वाढविण्यात येणार आहे.

या योजनेचा उद्देश रस्त्यावर राहणाऱ्या, एकल, अनाथ व दुर्लक्षित बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना शिक्षणाची गोडी लावणे, वैद्यकीय सेवा पुरवणे आणि त्यांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी आवश्यक त्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आहे.

सुरुवातीला मिशन वात्सल्य अंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक अशा सहा जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर ही योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विशेषतः बाल स्नेही बस/व्हॅनद्वारे ही सेवा दिली जाणार आहे. या व्हॅनमध्ये समुपदेशक, शिक्षक, महिला कर्मचारी, वाहनचालक व काळजीवाहक अशी चार जणांची टीम असणार असून बसमध्ये जीपीएस ट्रॅकिंग व उउढत कॅमेरा देखील असणार आहे. मुलांचे सामाजिक अन्वेषण अहवाल तयार करून त्यानुसार त्यांच्या गरजांनुसार वैयक्तिक पुनर्वसन आराखडा तयार केला जाईल. मुलांना वयाप्रमाणे अंगणवाडीत, शाळांमध्ये प्रवेश मिळवून देणे, त्यांच्या आरोग्याची तपासणी करून लसीकरण, पोषण आहार, औषधोपचार, स्वच्छतेच्या सवयी आणि व्यसनमुक्तीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. त्याचबरोबर त्यांना विविध कला व शिक्षणावरील उपक्रमांत गुंतवले जाणार आहे.

## आ. सुभाष देशमुख यांच्या आंदोलनाला यश

# पाणी सोडण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

जोपर्यंत सीना कोळेगांव धरणातून सीना नदीत पाणी सोडले जात नाही, शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी दिले जात नाही, तोपर्यंत सिंचन भवनसमोर बेमुदत आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आ. सुभाष देशमुख यांनी दिल्यानंतर लवकरच पाणी सोडण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवणी, पाकणी, तिऱ्हे, पाथरी, तसेच मोहोळ तालुक्यातील शिरापूर, टाकळी, शिंगोली, तरटगांव आदी गावातील ग्राम स्थांनी व शेतकऱ्यांनी ५ मे रोजी सोलापूर शहरातील उजनी सिंचनभवन मधील प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले होते. त्यावेळी आ. देशमुख यांनी अधीक्षक अभियंत्यांना पाणी सोडण्यास सांगितले होते. मात्र अद्यापपर्यंत पाणी सोडण्यात आले नाही. त्यामुळे आ. देशमुख हे स्वतः मंगळवारी सिंचन भवन येथे आंदोलनास बसले. यावेळी त्यांच्यासमवेत अनेक शेतकरी होते. उजनी धरणातून बोगद्याद्वारे सीना नदीत उन्हाळी आवर्तनाचे पाणी सोडले होते पण सध्या धरणाची पाणी पातळी वजा १९ झाली आहे. त्यामुळे उत्तर आणि दक्षिणमधील शेतकऱ्यांची अवस्था दयनीय होत आहे. ऊस व इतर पिकांना पाण्याची आवश्यकता आहे.तीन तालुक्यातील ग्रामस्थांसाठी पिण्याचा पाण्याचा, जनावरांसाठी पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.



शेती, जनावरे व स्थानिक ग्रामस्थांचा विचार करून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी आ. देशमुख यांनी केली. यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी लवकरच पाणी सोडण्यात येईल असे सांगितले. यावेळी मुरारी शिंदे, गुरंण्णा तेली, अतुल गायकवाड, अशोक कांबळे, राम जाधव, विशाल जाधव, संजय वाघमोडे, विशाल जाधव, भागवत लामतुरे, राहुल पुजारी, राधाकृष्ण बंडगर, श्यामराव हांडे यांच्यासह उत्तर, दक्षिण मधील शेतकरी उपस्थित होते.



पौर्णिमा भांगे | सिफा तांबोळी | ओंकार राऊत | आर्या कुलकर्णी | इंद्रनिल चव्हाण | गौरांग जामदार

## शिक्षण प्रसारक मंडळाचे परिक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१३ मे-**

दहावीच्या परीक्षेत शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचा निकाल ९५.११ टक्के लागला. संस्थेच्या ३३ शाखेतून २ हजार ६९७ विद्यार्थी परीक्षेला बसले. यापैकी २ हजार ५६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

संस्थेत जिजामाता कन्या प्रशालेची पौर्णिमा संग्रामसिंह भांगे हि ९८.२० टक्के गुण घेत प्रथम आली. सिफा सिकंदर तांबोळी जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, व ओंकार दत्तात्रय राऊत महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर हे दोघे ९७ टक्केगुण घेत द्वितीय आले. तर आर्या गुरुनाथ कुलकर्णी, जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, इंद्रनिल अनिल चव्हाण, गौरांग उदय जामदार सदाशिवराव माने विद्यालय अकलूज हे ९६.८० टक्के गुण घेत तृतीय आले. जिजामाता कन्या प्रशालेतील आर्या गुरुनाथ कुलकर्णी हिने गणित विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवले. संस्थेच्या विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय विझोरी, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय कोथरूड, श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय कोळेगाव, समर्थ रामदास विद्यामंदिर शिवथर या सहा शाखांचा निकाल शंभर टक्के लागला. श्री गणेश विद्यालय पिंपळनेर ९९ टक्के, श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर ९८.११ टक्के ,लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर ९८.८ टक्के, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय वेळापूर ९७.९८ टक्के, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय मांडवे ९७.८७ टक्के, श्रीनाथ विद्यालय लोंढे मोहितेवाडी ९६.९७ टक्के, श्री पळशेश्वर विद्यालय पळसमंडळ ९६.७७ टक्के, प्रतापसिंह मोहिते पाटील विद्यालय शिवपुरी ९६.६७ टक्के, श्री विजयसिंह मोहिते विद्यालय वाघोली ९६.३६ टक्के, सदाशिवराव माने विद्यालय माणकी ९६.१५ टक्के ,श्री बाणलिंग विद्यालय फोंडशिरस ९६.४ टक्के, मोरजाई विद्यालय मोरोची ९५.९३ टक्के , श्री चक्रेश्वर विद्यालय चाकोरे ९५.५६ टक्के, कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर ९५.२१टक्के, सदाशिवराव माने विद्यालय अकलूज ९४.८५ टक्के, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय नातेपुते ९४.५२ टक्के, कृष्णानंद विद्यामंदिर पाटीलवस्ती ९०.९१ टक्के, संत तुकाराम विद्यालय बोंडले ९०.७० टक्के, रामलिंग विद्यालय कुरबावी ८९.४७ टक्के, श्री शंभू महादेव विद्यालय उंबरे दहिगांव ८८.२४ टक्के ,श्री सावतामाळी विद्यालय माळेवाडी ८६.९६ टक्के, श्री हनुमान विद्यालय लवंग ८६.८९ टक्के ,श्री संभाजीबाबा विद्यालय इस्लामपूर ८४.२१टक्के, श्री काळभैरवनाथ विद्यालय गुरसाळे ८३.८७ टक्के, अकलाई विद्यालय अकलूज ६९.३९ टक्के, मोहनराव पाटील विद्यालय बोरगाव ६६.६७ टक्के ,रात्र प्रशाला अकलूज ५७.६९ टक्के निकाल लागला आहे. सर्वांचे अभिनंदन होत आहे.

## सोलापूर भाजपात तडवळकर, चव्हाण, केदार-सावंतांना संधी

- माजी पदाधिकारी काळे, आ. कल्याणशेट्टी पायउतार
- भाजपा शहराध्यक्षपदावर प्रथमच महिलेस संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनेमध्ये राष्ट्रीय स्तरापासून सोलापूर शहरापर्यंत बदलाचे वारे वाहत असून, सोलापुरात या वेळी महिलांकडे शहराध्यक्षपदाची संधी दिली आहे तर सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्षपदी शशिकांत चव्हाण आणि सोलापूर पश्चिम जिल्ह्यासाठी चेतनसिंग केदार-सावंत यांची पुन्हा वर्णी लागली आहे. प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांनी ही नियुक्ती केली आहे.

यापूर्वी भाजपा सोलापूर शहराध्यक्षपदी नरेंद्र काळे आणि पूर्व जिल्हाध्यक्षपदी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी काम पाहिले होते. त्यांच्या कार्यकालात दोघांनीही पक्षसंघटनेसाठी आपापली जबाबदारी योग्य पध्दतीने पार पाडली मात्र आ. कल्याणशेट्टी यांनी सोलापूर बाजार समितीमध्ये भाजपाच्या बुजुर्ग आमदारांच्या (दोन्ही देशमुखांना) भाजप पुरस्कृत पॅनलला डावलून विरोधी पक्षातील नेत्यांशी जवळीक सर्वपक्षीय पॅनल केला आणि बाजार समिती भाजपाच्या हातून गेल्याने भाजप पक्षाने त्यांना या पदासाठी डावलल्याची चर्चा सध्या जिल्ह्यात सुरू आहे. विधानसभा निवडणुकीनंतर प्राथमिक सदस्यत्व नोंदणीची मोहीम हाती घेण्यात आली असून, या मोहिमेत नरेंद्र काळे यांनी स्थानिक आमदारांना घेवून सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणात नोंदणी केली होती मात्र पक्षस्तरावर त्यांनाही डावलण्यात आले आहे.




दरम्यान, भाजपाकडून यावेळी सोलापूर शहराध्यक्षपदी जेष्ठ नेत्या रोहिणी रामचंद्र तडवळकर यांना संधी दिली आहे. तडवळकर या लहानपणापासून राष्ट्रसेविका समिती तसेच महाविद्यालयीन काळात विद्यार्थी परिषदेच्या कामात अग्रभागी होत्या. महाविद्यालयीन आणि शैक्षणिक आंदोलनामध्ये मोठा सहभाग. त्या भाजपाकडून ४ वेळा नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. इतकेच कायतर विरोधी पक्ष नेता, भारतीय जनता पार्टी महिला आघाडी शहर अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी काम केलेले आहे. त्याचप्रमाणे शुक्रवार पेठ भागात राणी लक्ष्मी बाई महिला पतसंस्थेच्या माध्यमातून या भागात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या क्षेत्रातही आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे. यामुळे भाजपाकडून त्यांना संधी दिली आहे.

## लक्ष्मी-आनंद विद्यामंदिर प्रशालेचे दहावी परीक्षेत गौरवशाली यश

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१३ मे-**

टेंभुर्णी येथील श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाज सेवा मंडळ संचलित, लक्ष्मी-आनंद विद्या मंदिरमध्ये इयत्ता दहावीत आरती आबासो मस्के ९६.४० टक्के (प्रथम), किशोरी आबासो मस्के ९४.२० टक्के (द्वितीय), सिद्धी प्रदीप तळे ९३.४० टक्के (तृतीय), तसेच राबिया पटेल ८७.४० टक्के, शौर्य राठोड ८६ टक्के, प्रज्ञा पवार (८४.४० टक्के, शिवराज मस्के ८२.८० टक्के, समर्थ व्यवहारे ८०.६० टक्के, श्रद्धा खराडे ८० टक्के , श्रुती शिंदे ७९ टक्के, सिया कुलकर्णी ७८.६० टक्के, श्रुतिका कोकाटे ७८.२० टक्के, कोमल महाडीक ७७.४० टक्के, प्रांजल निंबाळकर ७६.८० टक्के या विद्यार्थ्यांनी ७५ टक्केच्या पुढे गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.



आरती मस्के | किशोरी मस्के | सिद्धी तळे

संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिव सुरजा बोबडे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले .पुढील वाटचालीकरिता सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी प्रशालेचे प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे सह इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वळसंगच्या शंकरलिंग प्रशालेचा ९४ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग, दि. १३ मे-**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग प्रशालेचा निकाल ९४.४० टक्के लागला असून या परीक्षेस सेमी इंग्रजीत ५४, मराठी माध्यमात ५६ व कन्नड माध्यमात १५ असे एकूण १२५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३६ विद्यार्थी विशेष प्राविण्य, प्रथम श्रेणी ४४ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी ३५ विद्यार्थी व तीन विद्यार्थी तृतीय श्रेणीत असे एकूण ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सेमीचा निकाल १०० टक्के लागला असून प्रशालेत व सेमी माध्यमात कुमारी रश्मी श्रीशैल यागंटे ९५.२० टक्के गुण मिळवून प्रथम, अनिकेत प्रमोद अंटद ९२ टक्के गुण मिळवून द्वितीय तर सोमनाथ शिवानंद खराडे ८८ टक्के गुण मिळवून प्रशालेत तृतीय क्रमांक आलेला आहे. मराठी माध्यमाचा निकाल ८७.५० टक्के लागला असून मराठी माध्यमात ताहेरा अजमुद्दिन मुजावर ८४.६० टक्के मिळून प्रथम, अस्मिता बसवराज चिंचोळी व नंदिनी धोंडीबा गायकवाड ८२.२० टक्के मिळवून द्वितीय, इमामबाशा इन्नुस पठाण ७६ टक्के गुण मिळवून तृतीय आलेला आहे. कन्नड माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला असून कन्नड माध्यमातून श्रावणी श्रीशैल रोट्टे ८१.८० टक्के मिळवून प्रथम, उषा पंडिताराध्या हिरेमठ ७७.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, श्वेता शाणय्या कलाल ७६.८० टक्के गुण मिळवून तृतीय आली.. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, सदस्य विश्वनाथ थळंगे माजी प्राचार्य शिवशरण प्याटी, रामेश्वर बिज्जरगी, रमेश दूधगी, प्रकाश दुधगी,संजय दुधगी, मल्लिनाथ थळंगे, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# बार्शी तालुक्याचा दहावीचा निकाल ९४.३५ टक्के

- गेल्या वर्षीच्या तुलनेत १.८४ टक्क्यांनी निकालात कमतरता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ मे-**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा बार्शी तालुक्याचा निकाल ९४.३५ टक्के इतका लागला. तालुक्यातील १०९ शाळांमधून बार्शी तालुक्यातील १०९ माध्यमिक शाळेतील ५५६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती त्यापैकी ५२४६ विद्यार्थी इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. २०४८ विदयार्थी डिस्टींक्शनमध्ये, १८०९ विदयार्थी प्रथम श्रेणीत, ११३० विदयार्थी द्वितीय श्रेणीत तर २५९ विदयार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले. ३३ शाळेतील शंभर टक्के विदयार्थी उत्तीर्ण झाले. तर एकुण ८२ शाळेचा निकाल ९० टक्के पेक्षा जास्त आहे.**

**तालुक्यातील शाळांचा टक्केवारी निहाय निकाल पुढीलप्रमाणे -**

मॉडेल हायस्कूल ६५.९५, सिल्व्हर ज्यूबिली हायस्कूल ९८.६४, सुलाखे हायस्कूल ९२.७३, म आदर्श न्यू इंग्लिश स्कूल गौडगाव ९३.९०, विद्यामंदिर वैराग ९५.२३, महाराष्ट्र विद्यालय बार्शी ९६.२१, शाह कन्या शाळा बार्शी ९६.८७, सर्वोदय विद्यामंदिर पांगरी १००, वखारिया विद्यालय उपळे (दु) ९४.३३, शेठ अगरचंद कुंकूलोळ हायस्कूल बार्शी ८९.१०, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय चिखर्डे ९२.५९, लोकसेवा विद्यालय आगळगाव १००, बार्शी टेक्नीकल हायस्कूल ८८.२८, यमाईदेवी विदयामंदीर कोरफळे ९६.६६, कर्मवीर एन.एच. गडसिंग गुरुजी माध्य. मळेगांव ९८.९६, संत तुकाराम विद्यालय पानगांव ९२.४२, कर्मवीर विद्यालय चारे ९४.६८, जनसेवा हायस्कूल बार्शी ४२.१०, ग्लो उर्दू हायस्कूल बार्शी १००, महात्मा गांधी विद्यालय काटेगांव ९७.५३, रामगिरी विद्यालय जवळगांव १००, विद्यामंदिर कन्या प्रशाला वैराग ९८.४१, संत ज्ञानेश्वर विद्यालय भातंबरे १००, लोकसेवा विद्यालय श्रीपतपिंपरी ९३.०२, यशवंतराव चव्हाण प्रशाला तडवळे ९६, साकत प्रशाला साकत ९७.१४, छत्रपती शिवाजी हायस्कूल खामगांव १००, नागनाथ हायस्कूल घारी ९२.३०, तुळशीदास जाधव प्रशाला वैराग १००, जनाबाई जाधव प्रशाला राळेरास १००, सरस्वती विद्यामंदिर नारी ७९.४८, विदयासाधना प्रशाला वैराग १००, शेळगांव हायस्कूल ९७, श्री शिवाजी विद्यालय कारी १००, न्यू हायस्कूल देवगाव ९४.४४, जीवन विकास विद्यामंदिर सासुरे ९७.९१, आनंदराव पाटील विद्यालय मालवंडी १००, नवीन माध्यमिक प्रशाला धामणगांव दु. ९३.३३, किसान कामगार विद्यालय उपळाई ८९.५५, ॲड. दिलीप सोपल विद्यालय सुर्डी ९८.५९, जिजामाता कन्या प्रशाला बार्शी ९७.३३, बळवंतराव घाटे प्रशाला यावली १००, यशवंत विद्यालय खांडवी ८७.५०, ज्ञानदीप माध्य. आश्रमशाळा,तांबेवाडी तांडा ९२.१८, अभिनव विद्यालय बार्शी ८४.४८, आदर्श हायस्कूल शेंद्री १००, भगवानबाबा विदयालय चुंब ९३.३३, आदर्श विद्यालय रातंजन ९३.५४, शारदादेवी प्रशाला वैराग ९५.९१, न्यू इंग्लीश स्कूल उंडेगांव १००, साधना कन्या प्रशाला बार्शी ८१.२५, विदया विकास विद्यालय भालगांव १००, शरदचंद्रजी पवार विद्यालय बावी ८८, शरदचंद्रजी पवार प्रशाला सारोळे १००, यशवंत विद्यालय शिराळे ८४.६१, न्यु हायस्कूल कुसळंब ९६.९६, कासारी विद्यालय ९५, जामगांव माध्यमिक विद्यालय ९६.१५, न्यू हायस्कूल पिंपळवाडी ८७.५०, न्यु माध्यमिक प्रशाला मंडेगांव ९७.०५, सरस्वती विद्यामंदिर उक्कडगांव १००, माध्यमिक आश्रमशाळा सर्जापूर ९८.४८, पिंपरी प्रशाला पिंपरी १००, मुंगशी विद्यालय ९२.८५, सौ. माई सोपल माध्यमिक विद्यालय ९४.५९, स्वामी विवेकानंद विद्यालय गोरमाळे १००, नागनाथ प्रशाला जामगांव ९७.२९, लक्ष्मणराव डुरे पाटील प्रशाला इर्ले ९३.५४, हनुमान विद्यामंदिर कव्हे ७८, सौ.शोभाताई दिलीपराव सोपल विदयालय घाणेगांव ९६.२९, माध्यमिक विद्यालय वैराग ६६.६६, दिलीपराव सोपल माध्यमिक विद्यालय हळदुगे १००, छत्रपती शिवाजी विद्यालय, जवळगांव १००, छत्रपती विदयामंदीर पांगरी ९५.५५, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय बाभुळगांव ९१.३०, दिलीपराव सोपल विद्यालय तावडी ७८.७८, श्रीराम विद्यालय धोत्रे ९५.२३, भैरवनाथ माध्य.विदयालय गुळपोळी १००, जय मल्हार हायस्कूल पिंपळगांव ९०.९०, स्वामी विवेकानंद विद्यालय रुई १००, कै. शोभाताई सोपल विद्यालय सौंदरे ७१.४२, नरसिंह प्रशाला काळेगांव ९३.७५, श्री. बबनराव शिंदे माध्यमिक विद्यालय शेलगांव (मा) ९०, सोजर इंग्लीश स्कूल बार्शी १००, सरस्वती कराड माध्यमिक विद्यालय उंबरगे ७६.६६, माध्यमिक विद्यालय खामगांव ७८.७८, दिलीप सोपल विद्यालय कासारवाडी ७५.८६, माध्यमिक आश्रमशाळा खामगांव ९६.३६, माध्यमिक आश्रम शाळा इंदिरानगर वैराग ८७.८०, पुण्यश्लोक विदयालय हिंगणी ८९.६५, चांगदेव पाटील माध्यमिक विद्यालय दहिटणे ८८.८८, कै. सी. एल. घोडके माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मालेगांव १००, राजर्षी शाहू हायस्कूल मानेगांव ६९.५६, ममदापूर माध्यमिक विद्यालय ९२.८५, रणजितसिंह मोहिते पाटील माध्य. विदयालय लाडोळे १००, जय हनुमान प्रशाला झरेगांव ८८.८८, कै. शहाजीराव काकडे प्रशाला ढोराळे १००, भोईंजे माध्यमिक विद्यालय ६०, ॲड. दिलीपराव सोपल प्रशाला, बार्शी ८६.२०, सुलाखे इंग्लीश मेडियम स्कूल बार्शी ९८.१४, बालाघाट पब्लिक स्कूल उक्कडगांव १००, अर्णव माध्यमिक विद्यालय सासुरे ९६.७७, शिवप्रभा माध्य.विदयामंदीर १००, सुयश विदयालय तांदुळवाडी १००, डॅफोडिल्स इंग्लिश मेडियम स्कूल वैराग १००, राजीव गांधी आश्रमशाळा पांगरी ७२.२२, सुयश विदयालय बार्शी १००, जिजाऊ प्रा.ॲण्ड ज्यु.कॉलेज खांडवी ९६.६६, दि. लिटल स्कॉलर्स इंग्लिश मिडीयम स्कूल, बार्शी १०० टक्के याप्रमाणे तालुक्यातील शाळांची निकालाची टक्केवारी आहे.



## भारताच्या १५ लाख वेबसाईटवर पाक हॅकर्सचा सायबर हल्ला

**मुंबई, १३ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर भारतातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या वेबसाईटवर १५ लाखांहून अधिक सायबर हल्ले करण्यासाठी जबाबदार असलेल्या सात ॲडव्हान्स्ड पर्सिस्टंट थ्रेट गटांची ओळख महाराष्ट्र सायबरने पटवून दिली आहे. यापैकी केवळ १५० हल्ले यशस्वी झाले.

वेबसाईट्सना सायबर हल्ल्यांचा सामना करावा लागत आहे. हॅकर्सनी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून डेटा चोरल्याचे आणि महानगरपालिका प्रणाली हॅक केल्याचे आणि निवडणूक आयोगाच्या वेबसाईटला लक्ष्य केल्याचे दावे पत्रकारांना संबोधित करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खोडून काढले. भारतीय सशस्त्र दलांनी दहशतवादाविरुद्ध याच नावाने सुरू केलेल्या लष्करी कारवाईअंतर्गत तयार केलेल्या 'रोड ऑफ सिंदूर' या अहवालात, पाकिस्तानशी संबंधित हॅकिंग गटांनी सुरू केलेल्या सायबर युद्धाची सविस्तर माहिती दिली.

## अग्रलेख...

# मोदींच्या संबोधनाचा अन्वयार्थ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी रात्री समस्त भारतीयांना संबोधित करताना वापरलेली भाषा ही निर्णायक, स्पष्ट, कठोर होती आणि तेवढीच पाकिस्तानचा थरकाप उडवणारी होती. यापूर्वी भारतावर अनेकदा दहशतवाद्यांचे हल्ले झाले. स्फोट घडवून आणले गेले. तत्कालीन पंतप्रधानांची त्यानंतर जनतेला दिलासा देणारी भाषणेही झाली. परंतु, 'ऑपरेशन सिंदूर'च्या पृष्ठभूमीवर, विशेषतः शस्त्रसंधी झाल्यावरचे पंतप्रधान मोदी यांचे संबोधन हे सर्वार्थाने ऐतिहासिक होते. त्यांनी केवळ पाकिस्तानलाच सुनावले नाही तर जागतिक समुदायालाही इशारे दिले. आमच्या बहिणींच्या कुंकवाला हात लावणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही, असा इशारा एकीकडे आणि शक्तिशाली असणे ही शांततेची पूर्वअट आहे, ही तात्त्विक मांडणी दुसरीकडे, असा त्यांच्या संबोधनाचा बाज होता. एकप्रकारे ते जगाला संबोधित करीत होते. त्यांच्या संपूर्ण मांडणीतून भारत आता पूर्वीसारखा दहशतवाद्यांचे थैमान सहन करणारा देश राहिलेला नसून, त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देणारा देश बनला आहे, हे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारतीय लष्कराने पाकिस्तानला जो काही धडा शिकविला, त्याचा संबंध दहशतवाद्यांच्या क्रौर्याशी तर होताच; शिवाय तो पाकिस्तानला भारताचे सामर्थ्य नेहमीसाठी लक्षात राहावे, यासाठीही होता. यापूर्वी असे कधीच झाले नव्हते की, भारताने दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्यासाठी थेट पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले आणि त्या देशाची इतर प्रकारची हानी करतानाच असंख्य आतंक्यांना यमसदनी पाठविले. आम्ही भारतीय सैन्याला दहशतवाद्यांच्या विरोधातील कारवाई करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले होते... आणि आता प्रत्येक दहशतवाद्याला, प्रत्येक दहशतवादी संघटनेला आमच्या आया-बहिणी आणि कन्यांच्या सौभाग्याशी खेळ केला तर काय परिणाम होतात, हे लक्षात आलेले आहे, असे पंतप्रधान म्हणाले. या वाक्याचा अन्वयार्थ असा आहे की, भारताला आता कुणीही डिवचले तर तो शांत बसणार नाही. पाकिस्तान रात्री जिहादला पाठिंबा देतो आणि दिवसा शांततेची भाषा बोलतो, हे साऱ्या दुनियेला ठाऊक आहे. असा फसवा डाव भारत आता सहन करणार नाही, हेच पंतप्रधानांनी सांगितले आहे.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत सीमावर्ती भाग आणि व्याप्त काश्मिरातील दहशतवाद्यांचे अड्डेच नव्हे, तर त्या पलीकडे विमानतळ नष्ट करण्याचा पराक्रम भारतीय सैन्याने गाजविला. भारताच्या लष्करी सिद्धतेत, सामर्थ्यात आणि रणनीतिक क्षमतेत किती वाढ झालेली आहे, याचे प्रतिबिंब या पराक्रमात दिसले. भारतीय लष्कराची बौद्धिक, मानसिक क्षमताही जगाने पाहिली. पाकिस्तानच्या आंतरिक भागात झालेले भारताचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले या केवळ लष्करी कारवाया नव्हत्या; तो तत्काळ केला गेलेला न्याय होता. तो दहशतवाद्यांना तडाखा तर पाकिस्तानच्या सरकारसाठी धडा होता. भारतीय सैन्याने बहावलपूर आणि मुरीदके येथील दहशतवाद्यांचे सुरक्षित अड्डे उद्ध्वस्त केले. ही जागतिक दहशतवादाची विद्यापीठे आणि नरसंहाराची प्रशिक्षण स्थळे भारताने नष्ट केली. त्या तुलनेत पाकिस्तानचे प्रत्युत्तर, जे देण्याचे कोणतेही नैतिक कारण आजही त्या देशाला सांगता येणार नाही, अगदीच पुचाट होते. त्यांचे मिसाईल्स, ड्रोन्स सगळे भारतीय लष्कराने हवेतल्या हवेतच ध्वस्त करून टाकले. ७२ तासांच्या आत भारताच्या हल्ल्यात पाकिस्तानचे महत्त्वाचे हवाई तळ नष्ट झाले. पाकिस्तानचा लष्करी अहंकार साफ चेपला गेला. 'हा एक नवीन भारत आहे. आम्ही दहशतवाद्यांना शोधून संपवितो. आम्ही त्यांची वाट पाहत नाही', हे शब्द केवळ पाकिस्तानसाठी नव्हे, तर भारताकडे वाकडी नजर करून पाहणाऱ्या जगातील इतर देशांसाठीही होते. आता भारत पाशवी तत्त्वांची थेट शिकार करेल. केवळ प्रतिक्रिया देणार नाही. भारत दहशतवादी छावण्या थेट नष्ट करेल, त्यांचा केवळ निषेध करणार नाही आणि जर पाकिस्तानला असे वाटत असेल की, अण्वस्त्रे ही त्या देशाची ढाल आहे, तर भारताचे धैर्य, बुद्धिमत्ता आणि नैतिकता हे त्याचे उत्तर आहे. आण्विक शक्तीच्या वापरासंबंधी ब्लॅकमेल करून पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना समर्थन देणे खपवून घेतले जाणार नाही, असेही मोदींनी स्पष्ट केले. एका अर्थाने 'ऑपरेशन सिंदूर' हा दहशतवादाबद्दल 'झिरो टॉलरन्स'च्या नव्या नीतीचा जन्म आहे. हा एक लष्करी सिद्धांत आहे आणि तोच यापुढच्या काळात भारताची ढाल असेल, हाही मोदींच्या संबोधनाचा अन्वयार्थ आहे. गेल्या अनेक दशकांपासून पाकिस्तानच्या लष्कराने, सरकारने आणि आतंकवाद्यांनी भारताच्या विरोधात दहशतीचा खेळ मांडलेला आहे. शेकडो लहान-मोठे हल्ले झाले, स्फोट झाले, हजारो जीव गेले. भारताने प्रत्येक वेळी जगाचा शांतिपाठ ऐकून घेणे हीच दशकभरापूर्वीची रीत होती. आता नवा सामर्थ्यवान भारत शांतिपाठ तर ऐकवितोच आणि गरज असेल तर शांततेच्या प्रस्थापनेसाठी रट्टेही देतो, हे जगाने पाहिले. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर शांततेच्या बाता करायच्या आणि त्याच वेळी दहशतवाद्यांना भारताच्या विरोधात 'सामरिक उपकरणे' म्हणून पोसायचे, जिहादींना निधी द्यायचा आणि पुन्हा पाश्चात्त्यांकडे, जागतिक नाणेनिधीकडे, जागतिक बँकेकडे मदतीची याचना करायची इतका निलाजरेपणा पाकिस्तान आजवर करीत आला. यावेळी त्याचे हे स्वरूप पूर्णपणे उघडे पडले. पाकिस्तानी लष्कर हेच एकप्रकारे जिहादी लष्कर आहे आणि तेच दहशतवाद्यांना पोसते आहे, हे जगाला पूर्णपणे कळून चुकले. त्यामुळेच आताच्या स्थितीत आंतरराष्ट्रीय मदत पाकिस्तानला मिळू नये, असा सूरही जगात उठला. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या अन्त्ययात्रेचे आयोजन करण्याचे पातक तिथल्या सरकारी यंत्रणेने केले. त्याची छायाचित्रे जगात सर्वांनी पाहिली. पाकिस्तानची उरली सुरली इज्जत मातीत मिळाली. आता इतक्या दबंग पद्धतीने भारताने पाकिस्तानची मुजोरी संपविल्यावर पंतप्रधानांनी घेतलेली भूमिका फार महत्त्वाची आहे. यापुढे पाकिस्तानशी चर्चा होणारच असेल तर ती केवळ दहशतवाद आणि व्याप्त काश्मीरवर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आता निरर्थक बैठका आणि संवाद होणार नाहीत. चहापाणी होणार नाही आणि हवापाण्याच्या बाताही होणार नाहीत. भारताच्या संयमाची मर्यादा संपल्यामुळे मोदींनी आपल्या संबोधनातून पाकिस्तानसाठी रेड लाईन आखून दिलेली आहे. त्या रेषेचे उल्लंघन झाले की, आपले अस्तित्व संपुष्टात येईल, हे आता पाकिस्तानला समजले पाहिजे. एका हाताने दहशतवाद्यांना घास भरवणे आणि दुसऱ्या हाताने शांततेवर चर्चा करण्यासाठी आवतन देणे हा दोगलेपणा चालणार नाही, हेही पाकिस्तानच्या लक्षात यायला हवे. आंतरराष्ट्रीय समुदायानेदेखील आता या विषयाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, हाही मोदींच्या संबोधनातील एक सूर होता. त्याचा अर्थ असा की, दक्षिण आशियात शांतता हवी असेल तर आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानकडे खोडकर मुलासारखे पाहू नये. ते खोडकर मूल नाही; तो बदमाशांचा, क्रूर दहशतवाद्यांचा देश आहे, हे जगाने लक्षात घेतले पाहिजे. शांततेचा मार्ग शक्तीच्या माध्यमातून जातो, असे मोदींनी स्पष्ट केले. याचा अर्थ असा की, भारत हा शांतताप्रिय देश आहे. शांततेचे महत्त्व भारताला कळते. परंतु आवश्यक असल्यास भारत संघर्ष करेल आणि अहंकारासाठी नव्हे तर शांततेचे रक्षण करण्यासाठी नैतिक पद्धतीने शक्तीचा वापर करेल. दहशतवादाला दंडित करण्यासाठी वापरली जाणारी शक्ती म्हणजेच न्याय होय, ही भारताची भूमिका आहे. त्यामुळेच पाकिस्तानने लक्षात घेतले पाहिजे की, यापुढे भारतात किंवा भारतीयांच्या बाबतीत असे काहीही घडले तर ऑपरेशन सिंदूर कोणत्याही टोकापर्यंत जाऊन पाकिस्तानला नमवू शकेल. एकुणात पंतप्रधानांनी भारतीयांना उद्देशून केलेले संबोधन हे जागतिक पातळीवर दखलपात्र ठरेल, इतके महत्त्वाचे आहे. भारताने दहशतवादाचा फार त्रास आणि जाच सोसला आहे. अन्याय सहन करण्याची मर्यादा संपते तेव्हा सोसणाऱ्याचा संयमही संपतो. भारताचा संयम संपला तेव्हाच ऑपरेशन सिंदूर सुरू झाले. आता शस्त्रसंधी झालेली असली, तरी ऑपरेशन सिंदूर बंद झालेले नाही. ते कोणत्याही क्षणी पुन्हा सुरू होऊ शकते आणि आता जर ते सुरू झाले तर दक्षिण आशियाचा इतिहास आणि भूगोल बदलल्याशिवाय थांबणार नाही, हेच मोदींनी या संबोधनात सांगितले. हा अन्वयार्थ समजून घेण्याची बौद्धिक क्षमता पाकिस्तानचे राजकारणी आणि लष्करशहा यांच्याकडे आहे की नाही, हा प्रश्न मात्र कायम आहे.

## विशेष

# शेतीच्या यांत्रिकीकरणाची वाढावी गती

**प्रा. सुखदेव बखळे**

वेगवेगळ्या राज्यांमधील शेतीमध्ये यंत्रांचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने होत असतो. सामाजिक-आर्थिक परिस्थिती, भौगोलिक परिस्थिती, घेतलेली पिके आणि सिंचन सुविधा अशा अनेक घटकांवर तो अवलंबून असतो. भारतातील शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि लहान शेतकऱ्यांना यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कृषी यंत्रसामग्री बँक आणि कस्टम हायरिंग सेंटर योजना चालवत आहे. यामागील उद्देश असा की, जे लहान आणि सीमांत शेतकरी महागडी कृषी यंत्रे खरेदी करू शकत नाहीत, ते भाड्याने घेऊन शेती सोपी करू शकतात; पण प्रश्न असा पडतो की, ही यंत्रे खरोखरच शेतकऱ्यांच्या आवाक्यात आहेत का, ही योजना फक्त सरकारी अहवालांपुरती मर्यादित आहे? या प्रश्नाचा खोलात जाऊन विचार करावा लागेल. शेती सुलभ करण्यासाठी सरकारने २०२३ मध्ये 'फार्म मशिनरी बँक' (एफएमबी)/फार्म मशिनरी हब (एफएमएच) योजना सुरू केली. ही योजना 'फार्म मेकॅनायझेशन अंब्रेला योजनें'तर्गत आणण्यात आली. शेतकऱ्यांना कृषी यंत्रे भाड्याने देणे हा त्याचा उद्देश आहे. मशीन बँक उघडण्यासाठी सरकार आठ लाख रुपयांपर्यंत मदत देते. ती एकूण खर्चाच्या ८० टक्के असावी; पण एकूण खर्च किमान १० लाख रुपये असावा. या १० लाख रुपयांमध्ये मशीन, शेड, देखभाल आणि विम्याचा खर्च समाविष्ट आहे. उर्वरित २० टक्के पैसे स्वतः गुंतवावे लागतात. एकूण खर्चाच्या पाच टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम शेड बांधण्यासाठी खर्च करता येणार नाही आणि इतर किरकोळ खर्चांसाठी १० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम खर्च करता येणार नाही.

अर्जदाराने एकूण खर्चाच्या किमान २५ टक्के रक्कम बँकेत मार्जिन मनी म्हणून जमा करणे आवश्यक आहे. उर्वरित रक्कम बँक कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध असेल. सरकार स्वतः कोणतेही मशीन किंवा उपकरण खरेदी करणार नाही; परंतु लाभार्थीने खरेदी केलेल्या मशीनवरच अनुदान देईल. अनुदान थेट बँकेच्या अनुदान राखीव निधी/कर्ज खात्यात डीबीटीद्वारे हस्तांतरित केले जाते. सरकारी पोर्टलवर नमूद केलेल्या मशीन उत्पादक आणि डीलर्सकडून खरेदी केलेल्या मशीनवरच अनुदान उपलब्ध आहे. लाभार्थी किंवा त्याच्या/तिच्या जोडीदाराला मागील अनुदान मिळाल्यापासून चार वर्षांनीच नवीन अनुदानासाठी अर्ज करण्याची परवानगी आहे. सरकारने २०१४-१५ पासून कृषी यांत्रिकीकरण उप-मिशन (एसएमएएम) नावाची योजना सुरू केली आहे. ही योजना केंद्र सरकारची आहे; परंतु ती राज्य सरकारांमार्फत चालवली जात आहे. या योजनेत शेतकऱ्यांना कृषी यंत्रे आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी आर्थिक



मदत दिली जाते. सरकारने २०१८-१९ पासून 'पीक अवशेष व्यवस्थापन' (सीआरएम) योजना सुरू केली आहे. एसएमएएम योजना सुरू झाल्यापासून २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सरकारने विविध राज्यांना ८११०.२४ कोटी रुपये दिले आहेत. राज्यांनी शेतकऱ्यांना १९.५१ लाखांहून अधिक यंत्रे आणि अवजारे दिली आहेत. वेगवेगळ्या राज्यांमध्ये ५२ हजारांहून अधिक 'कस्टम हायरिंग सेंटर्स' (सीएचसी), 'हाय-टेक हब्स' आणि 'फार्म मशिनरी बँक्स' (एफएमबी) उघडण्यात आल्या आहेत. २०१८-१९ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत खत व्यवस्थापन योजनेसाठी (सीआरएम) ३६०७.८८ कोटी निधी जारी करण्यात आला आहे. विशेषतः पीक अवशेष व्यवस्थापनासाठी ४१ हजार ९०० पेक्षा अधिक 'कस्टम हायरिंग सेंटर्स' (सीएचसी) स्थापन करण्यात आली आहेत. या 'सीएचसी' आणि वैयक्तिक शेतकऱ्यांना ३.२३ लाखांहून अधिक गवत व्यवस्थापन यंत्रे देण्यात आली आहेत. देशात शेतीमध्ये किती यंत्रसामग्री वापरली जात आहे आणि शेतकरी भाड्याने यंत्रसामग्री कशी घेत आहेत, हे जाणून घेण्यासाठी सरकार एक सर्वेक्षण करीत आहे. या सर्वेक्षणाद्वारे सरकारला शेतकऱ्यांना यंत्रांची किती गरज आहे आणि ते त्यांचा वापर कसा करीत आहेत हे कळेल. सर्वेक्षणाच्या निकालांच्या आधारे शेतीमध्ये यंत्रांचा वापर वाढविण्यासाठी नवीन योजना आखल्या जाऊ शकतात. 'भारतीय मानक ब्यूरो (बीआयएस) ने कृषी यंत्रसामग्रीसाठी २९६ नवीन मानके निश्चित केली आहेत. त्यांचे उद्दिष्ट चांगल्या, सुरक्षित आणि विश्वासार्ह मशिन्स प्रदान करणे आहे. या नियमांनुसार मशीन तपासण्याचे आणि प्रमाणपत्र देण्याचे काम केले जाते. सरकार फक्त अशाच मशिन्सना प्रोत्साहन देते ज्यांची या संस्थांमध्ये चाचणी झाली आहे. भारतात सरासरी ४७ टक्के शेतीची कामे यंत्रांद्वारे केली जातात. शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी यंत्रांचा वापर करण्यात अनेक अडचणी आहेत. आधुनिक यंत्रे खूप महाग असून चालवण्यास कठीण आहेत, असे लहान शेतकऱ्यांना वाटते. शेतकऱ्यांना यंत्रांच्या दुरुस्ती आणि देखभालीबद्दल ज्ञान नसल्यामुळे ते त्यांचा योग्य वापर करू शकत नाहीत. ग्रामीण भागात चांगले रस्ते, वीज आणि यंत्रांच्या सुटे भागांची उपलब्धता यासारख्या सुविधांचा अभाव आहे. मशीन दुरुस्त करण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी तंत्रज्ञांची कमतरता आहे. शेतकऱ्यांसाठी यंत्रे खरेदी करणे ही मोठी गुंतवणूक असते. शेतकऱ्यांना यासाठी स्वस्त कर्जाची आवश्यकता असते. भारतात बहुतेक कृषी कामांमध्ये यांत्रिकीकरणाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय कृषी विस्तार अभियानाचा एक प्रमुख भाग म्हणून कृषी यांत्रिकी उपअभियान राबविण्यात येत आहे. या उपअभियानांतर्गत नवी कृषी यंत्रे आणि अवजारे यांचा प्रसार करण्यात येत असून भरपूर अनुदान देण्यात येत आहे. कृषी यांत्रिकीकरणामुळे मजुरांची कमतरता भरून काढली जाते. त्याचबरोबर त्याचा मुख्य उद्देश म्हणजे निर्विष्ठांचा कार्यक्षम वापर, वेळेवर शेती कामाची पूर्तता, उत्पादन खर्चात घट, शेतीतील कट कमी करणे आणि नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन करणे हा आहे. बदलत्या हवामानानुसार जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन, पावसाच्या पाण्याच्या नियोजनासाठी मशागतींची पद्धत, वेळेवर व योग्य मात्रेत खते-बियाणे पेरणी, आंतरमशागत, फवारणी, काढणी, मळणी, प्राथमिक प्रक्रिया, साठवण, वाहतूक आणि विक्री इत्यादी कामे करण्यासाठी अत्याधुनिक कृषी यंत्रांची गरज आज प्रकर्षाने जाणवत आहे. नवसंशोधित अवजारे आणि यंत्रे संशोधन केंद्रात उपलब्ध आहेत. यंत्रांची मागणी वाढत असली, तरी त्यानुसार पुरवठा होत नाही. भारतातील मागणी लक्षात घेऊन अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मागील काही वर्षांमध्ये देशात त्याचे उत्पादन सुरू केले आहे. तसेच, परदेशातून मोठ्या प्रमाणात आयातही होत आहे. परदेशातून आलेली यंत्रे आपल्या देशात जशीच्या तशी उपलब्ध होत नाहीत. त्यासाठी स्थानिक गरजेनुसार बदल करणे आवश्यक आहे. विशेषतः ऊसतोडणी यंत्र, भातरोवणी यंत्र, पॉवर स्प्रेयर या आयात यंत्राचा बऱ्यापैकी वापर होताना दिसत आहे. कापूस वेचणी यंत्राचेही प्रयोग सुरू आहेत. ही सर्व प्रक्रिया मागील काही वर्षांमध्ये वेग घेताना दिसत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# कर्तृत्व कुणाचं; पाठ थोपटतोयं कोण?

हाडकुळा माणूस चांगला दिसत नाही. म्हणून थोडं मांस अंगावर आलं की, सगळे जण कौतूक करतात. पण तोच लठ्ठपणा अवाढव्य वाढला की, आलेली सूज माणसाला विद्रूप करते. शिक्षण क्षेत्राचेही असेच काहीसे झाले आहे. कधीकाळी मर्यादित पण गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था होत्या. आज व्याप वाढला, सांख्यिकी दृष्टीने आकडे वाढले; पण बाजारीकरण आले. ज्ञानदानाच्या पवित्र कार्याला अर्थार्जनाची काजळी चढली आणि पावित्र्य संपले. आज चित्र असे आहे, विद्यार्थी शाळेत येत नाहीत तरी उत्तीर्ण होतात आणि मग श्रम न करता यशाचे श्रेय घेण्यासाठी स्पर्धा लागते! अशावेळी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय नेमके कुणाचे हा प्रश्न उरतोच!

नि:स्वार्थ भावाने व्यक्ती घडविण्याचा कारखाना म्हणून शिक्षण संस्थांकडे कधीकाळी पाहिले जात होते. शाळा म्हणजे विद्येचे मंदिर आणि या मंदिरातून मिळणारे ज्ञान म्हणजे आयुष्यभरासाठी शिदोरीरूपी प्रसाद होता. शाळांची संख्या कमी होती. पण ज्या होत्या, त्या खऱ्या अर्थाने विद्येचे मंदिर होत्या. त्यात व्यावहारिकता नव्हती, विद्यादान आणि विद्यार्जनाला पैशात मोजले जात नव्हते. होता तो केव ळ नि:स्वार्थ भाव! पण आज स्थिती काय आहे? शिक्षण संस्थांचा व्याप वाढला. अनेक प्रकारच्या शिक्षणाची दालने प्रचंड संख्येत उघडली गेली. पण त्यात आला तो व्यापार. शिक्षणाचे बाजारीकरण झाले. शाळेत प्रवेश घेण्यासाठी शाळा निधी किंवा अन्य गोंडस नावाखाली लाखो रुपयांची घेतली जाणारी मदत इथपासून ते शिक्षकांची भरती करताना जुळवून आणला जाणारा लक्ष्मीदर्शनाचा योग इथपर्यंत सर्व काही बदलले. शाळांचे बाजारीकरण झाले अन् शिक्षणाचा बाजार मांडला गेला. काहींना ते महत्त्व जपले असेलही, पण बाजारीकरणाच्या गर्दीत त्यांना तग धरताना बरेच काही सहनही करावे लागत असावे. शिक्षण संस्था चालकांची बदललेली मानसिकता पाहून नवे फॅड उदयास आले. खाजगी शिकवणी म्हणजे कोचिंगने शाळांची अवस्था बिकट केली. आज शून्य उपस्थितीत म्हणजे 'झिरो अटेंडन्स'वर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. वर्षभर मुलं खाजगी शिकवण्यांमध्ये शिकतात. जणू काही तीच त्यांची शाळा असते. पण ज्यावेळी दहावी- बारावीचा निकाल लागतो, त्यावेळी ज्या शाळेत विद्यार्थी कधीच गेला नाही, ती शाळा आणि शिकवणी वर्ग दोघेही विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय स्वतःच्या पदरी पाडून घेत आपलीच पाठ आपण थोपटून घेतात. शाळेने यशाची परंपरा राखली असे सांगताना त्यांना हा विसर पडतो की, यशस्वी विद्यार्थी तर कधीच आपल्या शाळेत येऊन बसला नाही. शिकवण्यांचेही मोठमोठे फलक गावात झळकतात.




आता खरंच त्या विद्यार्थ्यांच्या यशाचे खरे हकदार कोण? ती शाळा, ज्यात विद्यार्थी तासभरही बसला नाही की त्या शिकवण्या? शाळेशी साटेलोटे करून विद्यार्थ्यांना आपल्याकडे ओढून घेणाऱ्या शिकवण्या विद्यार्थ्यांमागे शाळांना टक्केवारी देते अन् शाळाही शून्य उपस्थितीवर प्रवेशास तयार होते. ही शिक्षणाच्या मूळ हेतूशी प्रतारणा नव्हे का? कधीकाळी आपल्या विद्यार्थ्यांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या संस्था विद्यार्थ्यांचे तोंडही वर्षभर पाहात नाही आणि त्याच्या यशात मात्र आपला वाटा गृहीत धरून आनंद साजरा करत असतील तर आपलीच पाठ आपण थोपटून घेण्याचा हा प्रकार बाजारीकरणामुळे संस्थांची झालेली केविलवाणी अवस्था सांगण्यास पुरेशी आहे. हा सर्व प्रकार उघड उघड होत आहे. शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी असलेल्या यंत्रणेला म्हणजे शिक्षण विभागाला याची जाण नाही, असे नाही. शाळांची संख्या वाढली, त्याच तोडीने खाजगी शिकवण्यासाठीसुद्धा वाढल्या. शाळांपेक्षा शिकवण्यांमध्ये गर्दी वाढत असल्याचेही त्यांच्या नजरेदेखत आहे. मग शून्य उपस्थितीवर शाळा चालविणे शिक्षण विभागाच्या नियमात आहे का? हे स्पष्ट व्हायलाच हवे. नाहीतर मग 'एकमेका साह्य करू' या धोरणावर हे सगळं सुरू आहे, हे आपसूकच सिद्ध होते. एकीकडे नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले आहे. शिक्षण क्षेत्र अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत असताना विद्यार्थ्यांच्या यशात श्रेय कुणाचे हे कोडेच जर सुटणार नसेल तर घडणारे विद्यार्थी कसे घडतील, हा प्रश्नच आहे. शाळेत न जाता जाहिरातींच्या फलकावर फोटो लावून घेण्यात आनंद मानणारे विद्यार्थीच नव्हे, तर त्यांच्या पालकांसाठीही हे विचार करण्यासारखे आहे.

९७६३७१३४१७

## प्रासंगिक

# रोहिणी तडवळकर : सर्वव्यापी, सडेतोड, आक्रमक व अभ्यासू नेतृत्व

**तिन्ही आमदारांसह नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची मोट बांधण्याची कसोटी**

आपल्या गतिशील सामाजिक व राजकिय कार्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून गाजत असलेल्या व आगामी काळात गाजणाऱ्या सौ. रोहिणी रामचंद्र तडवळकर यांची सोलापूर भाजपच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे,त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा. सोलापूर भाजपच्या इतिहासात पहिल्यांदाच सौ.रोहिणी तडवळकर यांच्या रुपाने महिला अध्यक्ष झाल्या आहेत. त्या अध्यक्षपदाच्या स्पर्धेत नव्हत्या,त्यांनी दुसऱ्याचेच नाव त्या पदासाठी सुचविले होते आणि इतर काही मंडळींनीही जातीची समीकरणे पुढे करून आपले घोडे पुढे दामटले होते, त्या गर्दीत व संघर्षात भाजप पक्षश्रेष्ठींनी सौ.रोहिणी तडवळकर यांना संधी दिली आहे. सौ.रोहिणी तडवळकर ह्या मिळेल त्या पदाला न्याय संधीचे सोने करणाऱ्या कार्यकर्त्या-नेत्या आहेत,हे त्यांनी प्रत्येकवेळी दाखवून दिले आहे.

मुळात त्या विद्यार्थि परिषदेच्या मुशीत तावून सुलाखून निघालेल्या कार्यकर्त्या आहेत, त्याची बाजू व भूमिका भक्कम होती,आहे व राहणार आहे.त्यांच्या रुपाने एक वाघीण व रणरागिणीच भाजपच्या शहर अध्यक्ष पदावर रुजू झाली आहे. अंगभूत आक्रपणा व सडेतोडपणा, अभ्यासुवृत्ती हे त्यांचे खास वैशिष्टये आहेत.त्यांच्या सर्वस्पर्शी कामाची व संपर्काची सर्वांवरच भुरळ आहे.केवळ भाजप व संघ परिवारच नाही तर समाजाच्या सर्व घटकांशी त्याचबरोबर सर्व राजकीय पक्षातील नेते,कार्यकर्ते यांच्यासह त्यांच्या घरातील लोकांशी त्यांचा वैयक्तिक नाते,मैत्री व स्नेह आहे.त्यांच्या सर्वस्पर्शी संपर्काचा व नेतृत्वाचा त्यांना व भाजपाला नक्की फायदा होणार आहे. सद्या केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता असल्याने सोलापूर महापालिकेतही सत्ता सहजच येईल,असे म्हणणे सोपे आहे पण त्यांच्यासमोर पक्षातील जबरदस्त आव्हान आहे ते म्हणजे त्यांना आ.विजयकुमार देशमुख आ.सुभाषबापू देशमुख व आ.देवेंद्रदादा कोठे यांच्यासह नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची व्यवस्थित मोट बांधावी लागणार आहे तर दुसऱ्या बाजूला शहर वासियांचे विकासाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवावे लागणार आहेत.तसेच महापालिका निवडणुकीसाठी महायुती झाली तर त्यांना प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्त्याना न्याय देण्यासाठी खूप कसरत करावी लागणार आहे,तेव्हा त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे.

विशेष म्हणजे गेल्या निवडणुकीत त्यांचे तिकिट कापण्यात आले होते मात्र आगामी काळात त्यांना सारा राग,अन्याय विसरून केवळ पक्षाच्या हितासाठी बेरजेचेच राजकारण करावे लागणार आहेत. सौ.रोहिणी तडवळकर यांचा थोडक्यात परिचय: शिक्षण:बीकॉम,डीबीएम व एम एसडब्ल्यू. एसलहानपणापासून राष्ट्रसेविका समिती तसेच महाविद्यालयीन काळात विद्यार्थी परिषदेच्या कामात अग्रभागी. महाविद्यालयीन आणि शैक्षणिक आंदोलनामध्ये मोठा सहभाग. १९९२ ला सोलापूर महापालिकेला शुक्रवार पेठ परिसरातून भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या. १९९२ ते १९९७ त्यानंतर महापालिका परिवहन समिती सदस्य, २००२ ते २००७ पुन्हा तुळजापूर वेस, बाळीवेस परिसरातून नगरसेविका म्हणून निवडून आल्या. २०१२ ते २०१७ नगरसेविका आणि विरोधी पक्ष नेता,भारतीय जनता पार्टी महिला आघाडी शहर अध्यक्ष म्हणून देखील काम केलेले आहे. त्याचप्रमाणे शुक्रवार पेठ भागात राणी लक्ष्मीबाई महिला पतसंस्थेच्या माध्यमातून या भागात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या क्षेत्रातही आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे. याशिवाय पुण्यश्लोक अहिल्या अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर,राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र स्तरावर अपंग कार्यक्षेत्रात त्यांच्या कामाची नोंद आहे. रोटरी मूकबधिर विद्यालय सोलापूर, येथून प्राचार्य म्हणून निवृत्त झालेल्या आहेत.

**- दशरथ वडतिले,**
माजी अध्यक्ष,सोलापूर श्रमिक पत्रकार संघ

## वाचक पत्रे

### पाकिस्तानचे अस्तित्व नष्ट केले पाहिजे

'निर्णायक धडा शिकवाच' हा अग्रलेख वाचला आणि पटलाही. पहलगाममध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या नृशंस हत्यांनंतर भारतीय सैनिकांनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानात असलेल्या नऊ अतिरेकी तळांना उद्ध्वस्त केले. तरीही पाकिस्तानात आणखी बरीच अतिरेकी प्रशिक्षण केंद्रे असल्याचे भारत सरकारने सांगितले आहे. या हल्ल्यांमुळे हादरलेल्या पाकिस्तानची परिस्थिती कठीण झाली आहे. भारताविरोधात काहीही करण्याची क्षमता, हिंमत आणि तयारी नसल्यामुळे पाकिस्तान सरकार हतबल झाले आहे. या हल्ल्यानंतर काहीही केले नाही तर पाकिस्तानी नागरिकांच्या संतापाला तोंड दाखवणे अवघड होणार आहे. म्हणूनच पाकिस्तानी संरक्षणमंत्री भारताला माघार घेण्यास सांगत आहेत. भारताने तसे केले तर त्याबद्दल पाकिस्तानात खोट्या बातम्या पसरवून पाकिस्तानी सरकार आपली कातडी वाचवण्याचा प्रयत्न करेल. मात्र, आता भारतात काँग्रेसचे सरकार नसून नरेंद्र मोदींचे सरकार आहे, हे पाकिस्तानने लक्षात घेतले नाही. पहलगाममध्ये हल्ला करून पाकिस्तानने कुरापत काढली आहे. त्यावर भारताने सडेतोड उत्तर देऊन पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील अनेक अतिरेकी तळ उद्ध्वस्त करून शेकडो अतिरेक्यांना यमसदनी पाठवले आहे. याच संधीचा फायदा घेऊन भारताने पाकिस्तानचे अस्तित्व कायम नष्ट करावे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### विरोधाकरिता विरोध देशासाठी घातक

'निंदकाचे घर असावे शेजारी' अशी एक म्हण आहे. पण ते शेजारी त्रासदायक नसावे. निंदा केली तरी चालेल, पण त्यात सूडबुद्धी नसावी. भारतीय राजकारणाचे तसेच आहे. विरोधी पक्षाची त्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका आहे. सरकारचे धोरणात्मक निर्णय चुकत असतील तर जागृत विरोधी पक्ष या नात्याने सूचना करणे अपेक्षित आहे. पण तसे होताना दिसत नाही. केवळ विरोधाकरिता विरोध करण्याच्या भूमिकेतून परिस्थितीचा विपर्यास करताना दिसतात. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर हल्ला केला. त्यात २६ पर्यटक मारले गेलेत. ही घटना दुर्दैवी आणि मनाला वेदना देणारी आहे. सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी देशाच्या कानाकोपऱ्यातून होऊ लागली. केंद्र सरकारने लगेच सर्व विरोधी पक्षांना चर्चेसाठी आमंत्रित केले. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सरकारला संपूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. सरकारने विरोधी पक्षांच्या या सकारात्मक भूमिकेबद्दल आभार मानले.

७ मे पासून 'ऑपरेशन सिंदूर' सुरू झाले आणि केवळ ७२ तासांच्या आत पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली. ११ मे ला तिन्ही सेना दलाच्या डीजीएमओंनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या कारवाईची विस्तृत माहिती दिली. शस्त्रसंधीची माहिती दिली. या घटना सर्वांना माहीत असताना भारताच्या शस्त्रसंधीच्या निर्णयावर टीका करणे, हा निर्णय अमेरिकेच्या दबावात घेण्यात आला असून पंतप्रधान मोदींना परत एकदा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात येत आहे. ही विरोधकांची भूमिका योग्य वाटत नाही. भारताचे माजी अर्थमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी म्हटले आहे की, मोदींच्या धोरणामुळेच ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले. अशीच सकारात्मक भूमिका अन्य विरोधी पक्षांचे नेते घेतील तर भारताचा सर्वांगीण विकास व्हायला वेळ लागणार नाही.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

### 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'

समर्थांनी म्हटले आहे की, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' याचा अर्थ आहे की, नुसत्या बोलण्याने किंवा दिखाऊपणाने काहीही उपयोग होत नाही. या पंक्तीस शोभून दिसणारे काही राजकीय नेते आपल्या राज्यात विशेषतः आजूबाजूला वावरताना सहज दिसतात. यापैकी एक उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत. कुठल्याही समयी, कोणत्याही प्रसंगी, कसल्याही विषयावर अगदी अधिकारवाणीने भरभरून बोलत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य. समोरच्या व्यक्तीची मन:स्थिती अथवा परिस्थिती याचे भान न ठेवता एकतर्फी बोलत राहत आपली प्रतिक्रिया देत राहाणे अशी हुशारी देवाने जणू त्यांनाच दिली आहे.

दुसरे म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे. यांच्या बाबतीत काहीच भरवसा नाही. कुठली भूमिका घेतील, केव्हा सोडतील याचा पत्ता लागत नाही. यांची राजकीय भूमिका कधीच पक्की नसते. त्यामुळे राजकारणात धरसोडवृत्तीसाठी ते प्रसिद्ध आहेत. आपल्या भाषणात जोरदार टिंगल करत आपल्या विरोधकांची टर उडविणे या पलीकडे पुढे त्यांची गाडी कधीच पुढे सरकत नाही. परिणाम निवडणूक निकालात जागा शून्य मिळतात. कोणीही इतरांपेक्षा आपल्या ज्ञानाची कक्षा किती विस्तृत आहे हे दाखवण्याचा अट्टहास बाळगतात आणि आपल्या बोलण्याच्या कलेला स्वतःचे बलस्थान समजू लागतात. या अतिरेकाचा परिणाम म्हणजे सर्वसामान्य लोक यांना आपल्या करमणुकीसाठी समजतात. आजच्या राज्याच्या राजकारणात या दोघांची अवस्था हीच झाली आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### पुल्ली कन्या प्रशालेचे दहावी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १३ मे-**

सौ.भू. म. पुल्ली कन्या प्रशालेचा दहावीचा निकाल ९८.८३ टक्के इतका लागला. २५८ पैकी २५५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून सुहाना खरादी (प्रथम) ९४.४० टक्के, आरती कदम (द्वितीय) ९१.४० टक्के, खुशी जवळकर (तृतीय) ९०.२० टक्के, गौरी जक्कन (तृतीय) ९०.२० महालक्ष्मी बंडा (चतुर्थ)९० टक्के, विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण ५८. प्रथम श्रेणीत ९२ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष आदरणीय ॲड श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, मुख्याध्यापिका गीता सादुल, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक परमेश्वर बाबळसुरे यांनी अभिनंदन केले.

जल ही अमृत स्पर्धेत

# सोलापूर महापालिकेला ४ व ५ स्टार गुणांकन

### केंद्र शासनाकडून मिळणार 13 कोटींचे बक्षीस

### आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केले अधिकाऱ्यांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

केंद्र शासनाच्या अमृत अभियानाअंतर्गत राबविण्यात येणा-या जल ही अमृत स्पर्धेमध्ये सोलापूर महापालिकेला ४ व ५ स्टार गुणांकन (रेटिंग) मिळाले आहे. मलनित्सारण केंद्रास मिळालेल्या रेटिंगच्या आधारे केंद्र शासनाकडून महापालिकेला प्रोत्साहनपर बक्षिसापोटी अंदाजे १३ कोटी रुपये प्राप्त होणार आहेत.

केंद्र शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत राबविण्यात येणा-या जल ही अमृत स्पर्धेमध्ये सोलापूर महापालिकेने सहभाग नोंदवला होता.



या स्पर्धेमध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या देगांव, प्रतापनगर व कुमठे येथील मलनित्सारण केंद्रांचे मुल्यांकन करण्यात आले आहे. या मुल्यांकनामध्ये मलनित्सारण केंद्रामध्ये प्रक्रिया करण्यात येणा-या सांडपाण्याची गुणवत्ता, सांडपाण्याचा पुर्नवापर, स्काडा मॉनिटरिंग, सोलार यंत्रणा इत्यादी बाबींची तपासणी करण्यात येऊन त्याअधारे अमृतच्या संकेतस्थळावर मलनित्सारण केंद्रास दिलेले रेटिंग (गुण) घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये देगांव व प्रतापनगर मलनित्सारण केंद्रास ०५ स्टार रेटिंग व कुमठे मलनित्सारण केंद्रास ०४ स्टार रेटिंग प्राप्त झाले आहे, मलनित्सारण केंद्रास मिळालेल्या रेटिंगच्या आधारे केंद्र शासनाकडुन प्रोत्साहनपर बक्षिसापोटी अंदाजीत १३ कोटी रुपये प्राप्त होणार आहे. हा निधी मलनित्सारण केंद्राच्या नुतणीकरणाकरिता व देखाभाल दुरुस्ती करिता वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील ३ वर्षाकरिता महापालिकेस स्वनिधीचा निधी खर्च करावा लागणार नाही.

जल ही अमृत स्पर्धेमध्ये महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी संदिप कारंजे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, सहाय्यक अभियंता रामचंद्र पेंटर, सहाय्यक अभियंता नितीन अंबिगार, कनिष्ठ अभियंता राहुल शिंदे यांनी परिश्रम घेतले आहेत. या स्पर्धेमध्ये मिळालेल्या यशाबद्दल आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडील मलनित्सारण विभागाचे सर्व अधिकाऱ्यांचे पुस्तक देऊन अभिनंदन केले आहे. यावेळी महापालिकेचे अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

# मान्सून कालावधीत शासकीय यंत्रणांनी समन्वय ठेवावा

### जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.१३ मे-**

मान्सून कालावधीत मोठ्या प्रमाणात किंवा मुसळधार पाऊस झाल्याने पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते तसेच जिल्ह्यातील मध्यम व मोठे पाणी प्रकल्प भरल्यानंतर अतिरिक्त पाणी नदीमध्ये सोडल्यानंतर नदीकाठच्या गावामध्ये पूर परिस्थिती येऊ शकते, त्या अनुषंगाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. तसेच सर्व गाव, तालुका व उपविभागीय स्तरावरील यंत्रणांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मान्सून पूर्वतयारी २०२५ आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, महसूल उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने, सुमित शिंदे अमित माळी, भूजल चे वरिष्ठ भू वैज्ञानिक श्री. शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सर्व तहसीलदार व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, पूर परिस्थिती हाताळण्यासाठी रचनात्मक उपाययोजना म्हणून मोठे व मध्यम तसेच जिल्ह्यातील सर्व प्रकल्पाचे इन्स्पेक्शन करून आवश्यक दुरुस्ती करावी. तसे नैसर्गिक पाणीसाठे, प्रकल्पाचे कालवे व सांडव्याची आवश्यकता दुरुस्ती करून घ्यावी. संभाव्य पूर परिस्थितीच्या अनुषंगाने लोकांमध्ये जनजागृती करावी. एनसीसी, एनएसएस विद्यार्थी आणि स्वयंसेवक, नागरिक यांना प्रथम प्रतिसाद करता दर्जेदार प्रशिक्षण द्यावे. ग्राम सुरक्षा यंत्रणेमार्फत एकाच वेळी मास कॉलिंग द्वारे जिल्ह्यातील १०३९ गावे आणि चार नगरपरिषदा यातील जवळपास १५ लक्ष नागरिकापर्यंत पूर्व सूचना दिल्या जाऊ शकतात, त्या अनुषंगाने पूर्वतयारी करावी असेही त्यांनी सुचित केले.

जिल्हा नियंत्रण कक्षाशी गाव व तालुकास्तरीय यंत्रणांनी संपर्क ठेवावा. त्याप्रमाणेच ग्राम व तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठका मे महिन्यात घ्याव्यात. संभाव्य पूरस्थिती मध्ये जिल्ह्यातील १०५ गावे येतात. या सर्व गावांमध्ये संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने संबंधित तालुकास्तरीय यंत्रणांनी योग्य उपाययोजना करून ठेवाव्यात. विजेपासून होणारी हानी टाळण्यासाठी नागरिकांनी काय करावे व काय करू नये याबाबत लोकांचे प्रबोधन करावे. जिल्ह्यामध्ये होणाऱ्या सर्व यात्रेचे नियोजन हे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत करावे. सर्व तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीने आपले आराखडे अद्यावत करावे, अशाही सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. प्रारंभी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्याधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी मान्सून पूर्वतयारी २०२५ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कक्षाने केलेल्या तयारीची माहिती पीपीटीद्वारे दिली.

## काडादी प्रशालेचा निकाल ९३.२८ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

अण्णप्पा काडादी प्रशालेचा दहावी परीक्षेचा निकाल ९३.२८ टक्के लागला. प्रथम श्रुती कोरे ९४ टक्के, द्वितीय सुप्रिया राठोड ९३.८० टक्के, तृतीय सृष्टी बागडे ९०.६० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. कन्नड माध्यममध्ये प्रथम अमूल्या मूळसावळगी ७६.६० टक्के, द्वितीय श्रेया कल्याणशेट्टी ७५.६० टक्के, तृतीय भाग्यश्री सुतार ६५.८० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन, डॉ. प्रभाकर कोरे, के. एल. ई. संस्थेचे सर्व संचालक मंडळ, प्रशालेच्या स्थानिक नियामक मंडळाच्या चेअर पर्सन सिंधू काडादी, मुख्याध्यापक अनिल पाटील, उपमुख्याध्यापिका सुरेखा म्हमाणे, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील, प्राथमिकचे मुख्याध्यापक सचिन पाटील यांनी अभिनंदन केले.

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने संस्थापक अध्यक्ष बंटी सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली अरविंद धाम पोलीस वसाहत निराळे वस्ती रोड येथे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी अ. भा. वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे, माजी उपमहापौर नाना काळे, वैभव गंगणे, हिंदूश्री बापू वाडेकर, पुरुषोत्तम बरडे, अमोल शिंदे, श्रीकांत घाडगे, ज्ञानेश्वर सपाटे, शिवाजी भोसले, सुरेश आवताडे, अक्षय शिंदे, लहू गायकवाड, रोहित नलावडे, अमोल गरड, गोविंद कांबळे, प्रवीण पवार, प्रशांत गायकवाड, मनोज गंगणे, संभाजी आरमारचे श्रीकांत डांगे, तात्या वाघमोडे, श्रीकांत वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुमित सोनके, अरविंद सोनके, किशोर कोरके, सौरभ कन्हेरी, ओंकार उकरंडे, समर्थ पेटकर, उमेश माने, कृष्ण शिंदे, अमोल सोनके, विशाल गंगणे, व बी. एस. मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद खोबरे यांनी केले तर आभार गोविंद कांबळे यांनी मानले.

### जाहीर प्रगटन

प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस जाहिररीत्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. प्रकाश ईश्वर पाटील व राजेंद्र ईश्वर पाटील, रा. मुगाव, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा (ग्रामीण), ता. परंडा येथील मिळकत जमिन सर्व्हे गट नंबर २४५/४ या गटातील त्यांच्या नावे असलेले सामाईक क्षेत्र ०० हे. १० आर चे जमीन क्षेत्राचे विक्री करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालयास अर्ज दिला आहे.

तरी अर्जदार श्री. प्रकाश ईश्वर पाटील व राजेंद्र ईश्वर पाटील. रा. मुगाव, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा (ग्रामीण), ता. परंडा येथील जमीन सर्व्हे गट नंबर २४५/४ या गटातील त्यांच्या नाव मिळकत असलेले सामाईक क्षेत्र ०० हे. १० आरचे जमीन क्षेत्राचे विक्री करण्या बाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदरच्या कार्यवाहीस काही आक्षेप, उजर, तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत लेखी स्वरूपात संबंधीत ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयात किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप, उजर, तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यासाठी कुणाचाही आक्षेप, उजर, तक्रार नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप, उजर, तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**तसिलदार, परंडा**

### जाहीर नोटीस

रे.सि.अ.नं. १७/२०२२
निशाण नंबर १५
पु.ने. ता. २१/६/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**

**श्रीमती लक्ष्मीबाई दत्तु साळुंखे, वगैरे-२** - **अपेलंट**
रा. उपळाई (खुर्द) ता. माढा, जि. सोलापूर
विरूध्द
**श्री. दत्तू विठोबा साळुंखे, वगैरे-५** - **रिस्पॉंडट**
रा. उपळाई (खुर्द) ता. माढा, जि. सोलापूर

ज्याअर्थी यातील अपेलंट यांनी प्रस्तुतचे अपील मे. कोर्टात दाखल केलेले आहे. यातील रिस्पॉंडट नं. १, ३, ४, ५ यांना नोटीसीची बजावणी होऊन मे. कोर्टात हजर आहेत. परंतु रिस्पॉंडट नं. २ यास नमूद पत्यावर यातील अपेलंट यांनी या अपिलाची नोटीस काढून रिस्पॉंडट नं. २ श्री. अविनाश वसंत काशिद वय ७० वर्षे, धंदा - शेती, रा. आंतरभारती शेजारी, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

यास या प्रकरणाची समज देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापी यातील रिस्पॉंडट यास नमूद पत्यावर या प्रकरणाची नोटीस बजावली गेलेली नाही. कारण रिस्पॉंडट नं. २ हा सदर पत्यावर राहत नसून मुंबई येथे राहतो असा बेलिफानी मे. कोर्टात अहवाल दाखल केलेला आहे. परंतु मुंबई येथे कोठे राहतो कोणीही सांगणेस तयार नाही त्यामुळे अपिलामधील पत्यावरच जाहीर नोटीस काढणे आवश्यक आहे.

त्याअर्थी रिस्पॉंडट नं. २ यास या जाहीर नोटीस / समन्सद्वारे अशी समज देण्यात येते की, या प्रकरणी पुढील नेमलेली तारीख २१/०६/२०२५ रोजी नेमणेत आलेली आहे. तरी तुम्ही नेमलेल्या तारखेस अपीलामध्ये स्वतः अगर विधीज्ञामार्फत हजर राहून आपला कायमचा पत्ता मे. कोर्टात द्यावा सदर कामी रितसर म्हणणे व बचावात्मक कारवाई करावी नेमले तारखेस तुम्ही हजर न राहिलेस अपेलंटचे अपीलास आपले काहीही म्हणणे देणे नाही असे गृहीत धरून अपेलंटचा अपीलामध्ये पुरावा घेवून अपील एकतर्फी निकाली केले जाईल याची नोंद घ्यावी.

ही जाहीर समन्सची नोटीस प्रसिध्द केली असे दि. ०८/०५/२०२५

**सही /-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मे. जिल्हा न्यायाधिश सो. बार्शी**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः तालुका व शहर बार्शी पैकी बार्शी येथील लोकांस व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता.बार्शी पैकी बार्शी नगरपालिका हद्दीतील गट नं. ८९९/२/४/१ यापैकी प्लॉट नं. ४ याचे क्षेत्रफळ १८०.०० चौ.मी. यासी चतुःसिमा :- पुर्वेस ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ३, पश्चिमेस - ग.नं. ९८८/२ व उत्तरेस प्लॉट नं.५ येणेप्रमाणे बिनशेती खुला प्लॉट मिळकत याची पाणी व वागणुक पुर्व बाजुचे रस्त्याने जाते व आहे. आतील तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह

वर नमूद मिळकत ही चंद्रकांत बजरंग थोरे, रा. शेंडगे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी यांचे खरेदी मालकी कब्जे वहिवाटीची व स्वसंपादीत असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. आमचे अशिलानेही सदर मिळकत खरेदी घेणेचे ठरवलेने उभयतांनी सदर मिळकतीची आजचे बाजारभावाने साक्षीदारासमक्ष किंमत ठरवली व ती उभयपक्षी मान्य व कबुल करुन विद्यमान मालकांनी आमचे खरेदीदार अशिलाकडून सदर व्यवहाराचा भाग म्हणून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे व कायम खुष खरेदीचा व्यवहार ठरवलेला आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचा भरवसा विद्यमान जमीन मालकांनी आमचे खरेदीदार अशिलास दिलेला आहे.

याही उपर सदर मिळकतीबाबत जर कोणाचा काही गहाण, दान, साठेखत, बँक लोन, खासगी सावकारी, वहिवाटीचे हक्क, बक्षिस, मृत्यूपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा कोणताही हस्तांतराचा दस्त, हक्क वा कर्जबोजाचे व्यवहार अगर दस्त असलेस अथवा कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबीत असलेस संबंधीतानी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात हरकत कळवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस वरील मिळकती निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कसलीही तक्रार आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. १३/०५/२०२५

**सही/-**
**ॲडव्होकेट श्री. एच.एच. बोधले**
**ॲडव्होकेट श्री. जी.एम. फावडे**
**अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं.८४५९४७८३३१**
**(खरेदीदार अशिलातर्फे)**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. १९/२०२५
नि.नं. ६

**बार्शी येथील मे. सि. ज. सि. डि. सो. यांचे कोर्टात**

**१) अविनाश बन्सीलाल तोष्णीवाल,**
वय - ५४ वर्षे, धंदा - व्यापार,
रा. सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) अभिजीत बन्सीलाल तोष्णीवाल,**
वय ५२ वर्षे, धंदा - व्यापार, रा. सदर
**३) अनिता नागेश भुतडा,**
वय - ५५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. अहमदपूर, ता. अहमदपूर, जि. लातूर
— **सामनेवाला**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

अर्ज - अर्ज वारस दाखला मिळणेबाबत

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल बन्सीलाल जगन्नाथ तोष्णीवाल हे दि. १७/०७/२०२२ रोजी व त्यांची आई विजया बन्सीलाल तोष्णीवाल या दि. १२/०५/२०२० रोजी बार्शी, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. त्यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ व २ ही मुले व अर्जदार नं. ३ ही मुलगी असे जवळचे व कायदेशीर वारस आहेत. त्यांना सदर कामातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे शिवाय जवळचे दुसरे कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. मयत बन्सीलाल जगन्नाथ तोष्णीवाल यांनी त्यांचे हयातीमध्ये खालील प्रमाणे म्युचअल फंडाची व भारतीय स्टेट बँक, शाखा सुभाषनगर, बार्शी यांचेकडे रक्कम व लॉकरमध्ये चीजवस्तू ठेवलेल्या आहेत, त्याचा तपशिल - अ) महेश मुलराज अशर ए.एम.एफ. आय. रजिष्टर्ड म्युचअल फंडस डिस्ट्रीब्युटर को. ऑप ऑफिस बार्शी यांचेकडे म्युचअल फंडची जमा असलेली रक्कम रु. २,८२,६२९ रु. ५१ पैसे. ब) भारतीय स्टेट बँक शाखा सुभाषनगर, बार्शी यांचेकडील खाते नंबर ३१५९३४६९२७१ मधील लॉकर लेनची प्रिन्सिपल अमाउंटची रक्कम रु. १२,१९४/- क) तसेच स्टेष्ट बँक ऑफ इंडिया शाखा सुभाषनगर, बार्शी यांचेकडील लॉकर नं. १४७ मधील रक्कम, कागदपत्र व इतर चीजवस्तू. वरप्रमाणे रकमा मयत बन्सीलाल जगन्नाथ तोष्णीवाल यांचे नांवे जमा आहेत. सदरच्या जमा असलेल्या रक्कमा, ठेवीच्या रक्कमा व लॉकरमधील चीजवस्तू, ऐवज वगैरे मिळणेकामी यातील अर्जदार नं. १ ते ३ यांना मयत बन्सीलाल जगन्नाथ तोष्णीवाल यांचे पश्चात कायदेशीर वारस ठरवून वारस हक्काने मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला जरुरी असल्यामुळे अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत बन्सीलाल जगन्नाथ तोष्णीवाल यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ०३/०७/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्कयानिशी दिले असे. ता. ०९/०५/२०२५

**कोर्टाचा शिक्का**

**साही -**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दि. न्या. व. स्तर बार्शी, ता. बार्शी**

### मूळ खरेदीखतमधील पाने हरवलेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मसले चौधरी, पोस्ट नानज्ज व शहर सोलापूर, तसेच ता. मोहोळ, व जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मौजे मसले चौधरी येथे ग्रामपंचायत घर नं. २७७ ड /१ याचे क्षेत्र ६१.८० चौ.मी. व ग्रामपंचायत घर नं. २७७ ड /२ याचे क्षेत्र ४२.३७ चौ.मी. या मिळकती श्री. महाबळेश्वर मनोहर साखरे, रा. मसले चौधरी, पोस्ट नानज्ज, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांच्या खरेदी मालकीच्या असून त्या मिळकती बाबतचे खरेदीदस्त क्र. ३४४३/२०१९/मोहोळ या मूळ खरेदीदास्तामधील पं क्र. २० ते २८ अशी एकूण ०९ पाने मूळ स्वरूपात श्री. महाबळेश्वर मनोहर साखरे यांच्याकडून दि. १४/०३/२०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, रंगभुवन चौकजवळ या परिसरात पडून गहाळ झाले आहेत, त्याबाबत त्यांनी सोलापूर शहर पोलीस स्टेशन येथे दि. १३/०५/२०२५ रोजी तक्रार दिली असून त्याचा गहाळ रजि. नं. ३३४२/२०२५, असा पडला आहे.

परंतु मूळ खरेदीदस्त क्र. ३४४३/२०१९/मोहोळ, या मूळ खरेदीदास्तामधील पं क्र. २० ते २८ अशी एकूण ०९ पाने हे मूळ स्वरुपात हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावरती संपर्क साधून परत द्यावी, अथवा आमचे अशील याच्या दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या घर जागे बाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासुन ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन सदर मिळकत दुय्यम प्रत आधारे बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता हि जाहिर नोटीस दिली. दि. १३/०५/२०२५.

**श्री. महाबळेश्वर मनोहर साखरे**
**रा. मसले चौधरी, पोस्ट नानज्ज,**
**ता. मोहोळ, जि. सोलापूर**

**सही -**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर**
**ऑफिस पत्ता :- ३९४५/१. भवानी पेठ,**
**सोलापूर रोड बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

### मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, भारताच्या राष्ट्रपती यांच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या / कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत: निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-01, तारीख: 09/05/2025. कामाचे नाव त्याच्या परिसरासह : डीडी-डब्ल्यूडी: सोलापूर विभागातील दौंड-वाडी विभागात उपकरणांचा पुरवठा, खंदकीकरण, केबल केबल टाकणे आणि टर्मिनेशन इत्यादींसाठी सिग्नलिंगचे काम - 0.999 टीकेएम टीआरआर (एस) 18.165 टीकेएम आणि टीआरआर (पी) 54.177 टीकेएम (2025-26) कामे. निविदा क्रमांक: एसयूआर-एन-टी-2025-26-01. कामाची अंदाजे किंमत: रु.1,34,15,278.57. निविदेची किंमत फॉर्म: शून्य. जमा करावयाची बयाणा जमा करावयाची रक्कम: 2,17,100 रुपये. पूर्णत्व कामाचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 02.06.2025 15:30 नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक / काही सुधारणा असल्यास फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केले जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/ पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. कमाईच्या पैशाचे (EMD) पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक,**
**S&T शाखा मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-49

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

## ICAR-National Research Centre on Pomegranate
**NH-65, Solapur Pune Highway, Kegaon, Solapur 413255**

### Auction Notice

Public auction of various obsolete and unserviceable stores such as farm tools & implements, furniture, irrigation pipes, scientific / office equipments, Generators, plastic ware, metal scrap, Electrical items etc. will be held at ICAR-NRCP, Solapur on 22/05/2025 at 11.00 AM on as is where is basis.

Intending parties may participate in the auction on payment of Rs.1000/- (Rupees One thousand only) towards participation fee (non-refundable) by digital/ online payment mode only.

**sd/-**
**ADMIN. OFFICER**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता. बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु. पल हद्दितील मिळकत याचा जुना गट नं. १६०, नवीन गट नं. १५७ याचे एकूण क्षेत्र १ हे. ३८ आर पो.ख. ०२ आर एकूण ०१ हे. ४० आर. आकार ०४ रु. ८९ पै. यापैकी मधील बाजूची जमीन यांचे क्षेत्र दीड आर, आकार ०३ पै. याचे मोजमाप दक्षिण उत्तर फूट १४.८ व पूर्व पश्चिम फूट १८ याचे एकूण क्षेत्रफळ चौ. फूट १७०१ मी.मी. १५८.०८ याची चतुःसिमा पूर्वेस श्री. मुलगे यांची जमीन, दक्षिणेस सदर गट नं. पैकी श्री. वाघमारे यांचे क्षेत्र, पश्चिमेस ३ फूट रुंदीचा वाघमारे यांना सोडलेला रस्ता व उतरेस बार्शी आरणगांव रस्ता, याचे पाणी व वागणूक व वहिवाट उत्तर बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. असा संपूर्ण खुला प्लॉट येणेप्रमाणे वरील वर्णनाचा खुला प्लॉट यामध्ये दक्षिण बाजूस एक पत्र्याचे तात्पुरत्या स्वरुपाचे शेड आहे. सदर जागा आतील सर्व तदंगभूत वस्तूसह वहिवाटीच्या हक्कासह अधिकारांसह आज रोजी ७/१२ उताऱ्यास मालक सदरी आशिष भिमराव राजगुरु व सुशिल भिमराव राजगुरु, रा. बार्शी यांचे नावाची नोंद आहे. व सदर क्षेत्र प्रत्यक्ष वहिवाटीस आहे. व आज रोजी प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकत ही आशिष भिमराव राजगुरु व सुशिल भिमराव राजगुरु यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर जागा खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल यांनी सदर जागा खरेदी घेणेबाबत तोंडी बोलणी केलेली आहे व खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून रक्कमेचा स्वीकार केलेला आहे. व आमचे अशिलास सदर जागेच्या विक्रीबाबत आश्वासन दिलेले आहे व उरलेली रकम घेवून सदर जागेचे खरेदीखत हे आमचे अशिलाचे हक्कात लिहून देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे व सदर जागा निर्वेध निजोखमी, बिनजोखमी खरेदी देण्याचे ग्वाही जागा मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे. तरी वर नमूद मिळकतीवर कोणाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास सदर जागेसंदर्भात कोणी साठेखत, गहाणखत, नजरगहाण, मुदत खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजामी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. तारीख : १३/०५/२०२५

**सही/-**
**ॲड. सैफुद्दीन इस्माईल भोरी,**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**मनगिरे मळा, मंगळवार पेठ, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं. ९४२१०२७३९२**
**खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.**

## Union Education Society's Mahila Mahavidyalaya, Solapur AIDED

(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur).

Applications are invited for the following CLOCK HOUUR BASIS (CHB) Posts for the Academic Year 2025-26

| Sr. No. | Course | Subject | Designation | Total No CHB Posts |
|---|---|---|---|---|
| Humanities Faculty | | | | |
| 1 | B.A | English | Assistant Professor | 2 CHB |
| 2 | B.A | Urdu | Assistant Professor | 4 CHB |
| 3 | B.A | Hindi | Assistant Professor | 3 CHB |
| 4 | B.A | Persian | Assistant Professor | 1 CHB |
| 5 | B.A | Sociology | Assistant Professor | 1 CHB |

1. The above posts are open to all however candidates from any category can apply for the post.
2. All the above posts are purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2025-2026 & subject to workload approvel of Jt. Director of Education. HE. Solapur Region, Solapur for Senior College section.
3. Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification did. 18th July 2018, Govt of Maharashtra Resulation No. Mise-2018/C.R.56/18UNI-Idts. 8 March 2019 and University Circular Nu PAHSUS/ Estt/7"pay/2019/2285/dtd. 25 March 2019,
4. Remuneration the above posts will be as per Govt. Resulation No. संकिर्ण-2018/ (185/18) मशि-3, dated 14 November 2018 und University Circular No. सोविसो/शि.मा./परिपत्रक /2018-19/10949/ dtd.24 December 2018, and University Circular No, सोविसो/शि.मा./ परिपत्रक /2018-11/10949/ dtd.24 December 2018. And Govt. Resulation No. सकिर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-1 dated 17 October 2022
5. Applications with full details should reach to the Principal Union Education Society's Mahila Mahavidyalaya, Solapur within 8 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained
6. This is University approved advertisement

The interested candidates have to appear for interview on 22/05/2025 at 11.00 am in the Office of Principal, U.E.S. Mahila Mahavidyalaya, Solapur along with original documents & attested photo copies. No TA/DA will be given.

**Solapur - 14/05/2025**

**Sd/-**
**Principal**

## महत्त्वाचे

### दीक्षा एलईटी ऑर्डर ऑफ मेरिटच्या अव्वल-१० मध्ये



**सेऊल** : भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरने येथे झालेल्या अरामको कोरिया गोल्फ स्पर्धेत ५२ वे स्थान मिळवले असले तरी, लेडीज युरोपियन टूरच्या ऑर्डर ऑफ मेरिटच्या अव्वल-१० मध्ये स्थान कायम ठेवले आहे. व्यावसायिक गोल्फर म्हणून २४ वर्षीय दीक्षाने न्यू कोरिया कंट्री क्लबमध्ये सहा-ओव्हर २२२ गुणांसह कामगिरी केली. दीक्षाने लेडीज युरोपियन टूरवर दोनदा आणि तिच्या होम टूर, हिरो वुमेन्स प्रो-गोल्फ स्पर्धेत अनेक वेळा विजय मिळवला आहे. २०२० मध्ये एकदा वगळता, दीक्षा नेहमीच एलईटीच्या अव्वल-६० मध्ये राहिली आहे. सर्वोत्तम दोन फिनिश २०१९ मध्ये १४ वे स्थान होते व त्या वर्षी तिने आपले पहिले एलईटी जेतेपद जिंकले होते आणि २०२३ मध्ये तिसरे स्थान होते.

### महाराष्ट्राच्या मुलींची रूपेरी यशाला गवसणी



जुई नारकर



आनंदी सांगळे

**राजगीर** : महाराष्ट्राच्या मुलींनी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत मंगळवारी सायकलिंगमध्ये एक, तर भारोत्तोलनामध्ये २ रौप्यपदकाची कमाई करीत दिवस गाजविला. सायकलिंगमध्ये मुंबईच्या जुई नारकरने, तर भारोत्तोलनामध्ये ग्रीष्मा थोरात व आनंदी सांगळेनेही रौप्यपदक जिंकले. मुलींच्या २० किलो मीटर रोड रायकलिंग स्पर्धेत जुई नारकर हिने ३२ मिनिटे ४९.२९१ सेंकद वेळेसह महाराष्ट्राला कांस्यपदक जिंकून दिले. राजस्थानच्या मंजू चौधरी हिने ३२ मिनिटे १५.१४२ सेंकद वेळेसह सुवर्णपदक, तर राजस्थानच्याच रुख्मणीने ३३ मिनिटे ४०.२३३ सेंकद वेळेसह कांस्यपदक मिळविले. भरोत्तोलनात महाराष्ट्राच्या ग्रिष्मा थोरात हिने रौप्यपदकाची कमाई केली. ठाण्याच्या या खेळाडूने ७६ किलो गटात स्नॅचमध्ये ७७ किलो, तर क्लिन ॲण्ड जर्कमध्ये ९५ किलो असे एकूण १७२ किलो वजन उचलून हे रूपेरी यश संपादन केले. उत्तर प्रदेशच्या किर्ती कुमारी हिने एकूण १८३ किलो वजन उचलत सहजपणे सुवर्णपदक जिंकले. तमिळनाडूची हसीना शरीनने एकूण १६५ किलो वजन उचलत कांस्यपदक पटकाविले. मनमाडच्या आनंदी सांगळे हिने एकूण १७५ किलो वजन उचलून रूपेरी यश संपादन केले.

### अल्काराझ, ड्रॅपर उपांत्यपूर्व फेरीत

**रोम** : येथे सुरु असलेल्या इटालियन ओपन २०२ टेनिस स्पर्धेत स्पेनचा युवा टेनिसपटू कार्लोस अल्काराझ व जॅक ड्रॅपरने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. कार्लोस अल्काराझने करेन खाचानोव्हवर ६-३, ३-६, ७-५ असा विजय मिळविला. बार्सिलोना ओपनच्या अंतिम फेरीत उजव्या पायाच्या दुखापतीमुळे अल्काराझने गत महिन्यात माद्रिद ओपनमधून माघार घेतली होता. चार वेळचा ग्रॅण्ड स्लॅम विजेता अल्काराझ आता पुढील फेरीत पाचवा मानांकित जॅक ड्रॅपरशी खेळेल. ड्रॅपरने कोरेंटिन मौटेटचा १-६, ६-४, ६-३ असा पराभव केला.

### इंग्लंड वन-डे, टी-२० संघाची घोषणा

**लंडन** : वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठी इंग्लंडने आपल्या संघांची घोषणा केली आहे. आयपीएलला जाणाऱ्या जोस बटलर, जॅक्स, बेथेल, फिल सॉल्ट यांचाही समावेश या संघात समावेश करण्यात आला आहे. या चौघांशिवाय जोफ्रा आर्चरला वन-डे संघात समाविष्ट करण्यात आले आहे, तर फिल सॉल्टला टी-२० सामन्यांमध्ये स्थान देण्यात आले आहे. वेस्ट इंडीजचा इंग्लंड दौरा २९ मे रोजी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसह सुरू होणार आहे आणि त्यानंतर ६ जूनपासून तेवढ्याच टी-२० सामन्यांसह खेळवण्यात येणार आहे. ही मालिका आयपीएल २०२५ च्या सुधारित वेळापत्रकाशी जुळते - ही स्पर्धा १७ मे रोजी पुन्हा सुरू होणार आहे आणि ३ जून रोजी संपणार आहे. आयपीएलची साखळी फेरी २७ मे रोजी संपेल, तर प्लेऑफ एक दिवसानंतर सुरू होतील. बटलर (गुजरात टायटन्स), बेथेल (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू), विल जॅक्स (मुंबई इंडियन्स) आणि सॉल्ट (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू) हे तिघेही आपापल्या आयपीएल संघांसोबत प्लेऑफमध्ये स्थान मिळविण्याच्या शर्यतीत आहेत. आर्चर (राजस्थान रॉयल्स) आणि ओव्हरटन (चेन्नई सुपर किंग्ज) यांना मात्र राष्ट्रीय कर्तव्यांपूर्वी मोकळीक मिळेल कारण त्यांच्या फ्रॅन्चायझी आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडल्या आहेत. इंग्लंडच्या मर्यादित षटकांच्या कर्णधारपदी हॅरी ब्रूकचीही ही मालिका सुरू होईल.

# महाराष्ट्राच्या पदकांचे शतक

## सातवी खेलो इंडिया युवा स्पर्धा ● ४१ सुवर्णपदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थान



अस्मिता ढोणे



रोहित बिन्नर

◆ **पाटणा, १३ मे**

तब्बल ७ स्पर्धा विक्रमाची नोंद करीत सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने पदकांचे शतक झळकावले. ४१ सुवर्णांसह एकूण १०१ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने पदकतालिकेतील आपले अव्वल स्थान आणखी बळकट केले.

भारोत्तोलनापाठोपाठ ॲथ्लेटिक्समध्येही स्पर्धा विक्रमाला गवसणी घालत महाराष्ट्राच्या क्रीडापटूंनी खेलो इंडिया स्पर्धेत आपले वर्चस्व कायम राखले आहे. स्पर्धेच्या ९ व्या दिवशी महाराष्ट्राने पदकाचे शतक झळकविण्याचा पराक्रम सलग दुसऱ्या स्पर्धेत केला. ४१ सुवर्ण, ३२ रौप्य व २८ कांस्य पदकाची कमाई करीत एकूण १०१ पदकाचा पल्ला महाराष्ट्राने गाठला आहे. महाराष्ट्राच्या पाठोपाठ राजस्थान, कर्नाटक व हरयाणाची क्रमवारी आहे. नवव्या दिवशी सकाळच्या सत्रात जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राने ५ सुवर्णांसह १० पदके जिंकून पदकांचे शतक पूर्ण केले.

पदकांचे शतक पूर्ण केल्याबद्दल क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी सर्व पदकविजेत्यांचे अभिनंदन केले आहे. खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने सर्वच खेळात वर्चस्व गाजवले आहे. १०० पेक्षा अधिक पदके जिंकून विजेतेपदही महाराष्ट्र जिंकणार याचा प्रत्यय दिला आहे, असे भरणे म्हणाले.

स्पर्धा विक्रमातही महाराष्ट्र आघाडीवर आहे. भारोत्तोलक अस्मिता ढोणेने २ , साईराज परदेशीने ३, ॲथ्लेटिक्समध्ये सैफ चाफेकर, रोहित बिन्नारने प्रत्येकी १ असे एकूण ७ स्पर्धा विक्रम प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या नावापुढे झळकले आहे. कराडच्या अस्मिता ढोणेने ४९ किलो वजनी गटात क्लिन ॲण्ड जर्कमध्ये ७३, एकूण १६२ किलोची कामगिरी करीत नवा राष्ट्रीय विक्रम नोंदविला. मनमाडच्या साईराज परदेशीने विक्रमाची हॅट्ट्रिक केली. साईराजचे ८१ किलो वजनी गटात स्नॅचमध्ये १३९ किलो, क्लिन ॲण्ड जर्कमध्ये १७१, एकूण ३११ किलो असे ३ विक्रमाची नोंद केली. गत तामिळनाडू स्पर्धेतही साईराजने स्पर्धा विक्रमाचा पराक्रम केला होता.

ॲथ्लेटिक्समध्ये आहिल्यानगरच्या रोहित बिन्नारने ३००० मीटर धावण्याच्या शर्यतीत ८ मिनिटे २४.९ सेंकद वेळात सुवर्ण धाव घेत नवा स्पर्धा विक्रमाचे शिखर गाठले. ११० मीटर अडथळा शर्यतीत मुंबईच्या सैफ चाफेकरने १३.४८ सेकंदाची विक्रमी धाव घेतली. (वृत्तसंस्था)

### नागपूरच्या जान्हवी हिरुडकरला सुवर्ण, कशीश भगतला कांस्यपदक



जान्हवी हिरुडकर



कशीश भगत

महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या हिंदू मुलींच्या शाळेचे विद्यार्थिनी १८ वर्षाखालील मुलींच्या गटात जान्हवी हिरुडकरने सुवर्णपदक पटकावले, तर महात्मा गांधी इंग्लिश मिडीयम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या कशिश भगतने कांस्यपदक मिळविले.

कशीशने १८ वर्षाखालील मुलींच्या गटात ४०० मीटर शर्यतीत ५६.८३ सेकंद अशी वेळ नोंदविली व कांस्यपदक पटकावले. सुवर्णपदक तामिळनाडूच्या अडविना जाह्सनने ५५.९० सेकंद वेळेसह, तर हरयाणाच्या दीपिकाने ५६.६६ सेकंद वेळ नोंदवत रौप्यपदक प्राप्त केले.

हिंदू मुलींच्या शाळेचे विद्यार्थिनी १८ वर्षाखालील मुलींच्या गटात जान्हवी हिरुडकर ने १५०० मीटर दौडीत सुवर्णपदक ४.३५.५९ सेकंद अशी वेळ नोंदविली, तर रौप्यपदक दिल्लीच्या माहि ने ४.४२.८९ सेकंद वेळेसह तर कर्नाटकच्या प्रणीथी ने ४.४५.०८ सेकंद वेळे नोंदवत कांस्यपदक प्राप्त केले. नागपूर जिल्हा ॲथ्लेटिक्स संघटनेचे सचिव डॉ. शरद सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले. जान्हवीला अश्फाक शेख यांचे, तर कशीशला रामचंद्र वाणी यांचे प्रशिक्षण लाभले आहे.



मथुरेच्या वृंदावन येथील श्री हित राधा केली कुंज आश्रमात प्रेमानंद जी महाराज यांची भेट घेताना क्रिकेटपटू विराट कोहली व अभिनेत्री पत्नी अनुष्का शर्मा

# विराट कोहली सपत्नीक वृंदावनमध्ये

## आध्यात्मिक गुरू प्रेमानंद गोविंद शरण जी महाराज यांची भेट घेतली

◆ **मथुरा, १३ मे**

कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर मंगळवारी, भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि त्याची अभिनेत्री पत्नी अनुष्का शर्मा यांनी वृंदावनमध्ये आध्यात्मिक गुरू प्रेमानंद गोविंद शरण जी महाराज यांची भेट घेतली.

संतांकडून आशीर्वाद घेत असलेल्या जोडप्याचा व्हिडीओ गुरु प्रेमानंद महाराज यांच्या शिष्यांनी मायक्रो-ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्स वर सामायिक केला.

या व्हिडीओमध्ये कोहली दाम्पत्य व आध्यात्मिक गुरू यांच्यातील एक संक्षिप्त संवाद होता. यात गुरुंनी कोहलीला विचारले की, तू आनंदी आहे का. प्रेमानंद जी यांनी आंतरिक चिंतनाचे महत्त्व व आंतरिक शांती आणि आध्यात्मिक मुक्ती मिळविण्यासाठी भक्तीने देवाचे नाव जपण्याच्या परिवर्तनीय शक्तीवर भर दिला तेव्हा कोहली आणि अनुष्काने लक्षपूर्वक ऐकले.३६ वर्षीय कोहली आणि त्याचे कुटुंब या वर्षाच्या सुरुवातीलाही लोकप्रिय संतांना भेटायला गेले होते. (वृत्तसंस्था)

# जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राला १२ पदके

## ५ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्यपदके



बॉल प्रकारात कौशल्य दाखवताना सुवर्णपदक विजेती किमया कार्ले

◆ **नवी दिल्ली, १३ मे**

महाराष्ट्राच्या युवा जिम्नॅस्टसने दमदार कामगिरी करीत सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील जिम्नॅस्टिक प्रकारात पाच सुवर्णपदकांसह बारा पदकांची लयलूट करीत मंगळवारचा दिवस गाजविला.

नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये ओव्हर ऑल प्रकारात मुंबईची परिनाने मदनपोत्रा हिने ८३.६५० गुणांसह सुवर्ण जिंकले, तर मुंबईच्याच शुभश्री मोरे हिने ८०.२०० गुण घेत रौप्यपदक मिळवले. दिल्लीच्या राचेलदीपच्या वाट्याला कांस्यपदक आले.

हूप प्रकारातही परिना हिनेच बाजी मारली. तिने दिल्लीच्या राचेलदीप (१९.३००) हिला मागे टाकून २१.०५० गुण मिळवले. महाराष्ट्राची देवांगी पवार (१८.७२५) कांस्यपदकाची मानकरी ठरली. बॉल प्रकारात आपली सहकारी परिनाला मागे टाकून किमया कार्ले हिने २०.५०० गुणांसह सुवर्ण आपल्या नावे केले. परिनाने २०.१५० गुण मिळवले. दिल्लीच्या राचेलने कांस्य मिळवले.

क्लब प्रकारात मुंबईची शुभश्री मोरे अव्वल ठरली. तिने २०.६०० गुण घेत परिनाला मागे टाकले. परिनाने १९.७५० गुणांची कमाई केली. हरयाणाच्या मिष्काने १९.५०० गुणांसह कांस्यपदक मिळवले. रिबन प्रकारात बाजी मारत परिनाने स्पर्धेतील तिसऱ्या सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केले. रिबनमध्ये तिने २०.६५० गुण, तर रौप्यविजेत्या शुभश्री मोरेने १९.८५० गुण घेतले.

रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राच्या मुलींनी सुवर्णपदकांची लयलूट केली असतानाच आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक प्रकारामध्ये मात्र सुवर्णपदक हुकले. मुंबईच्या अनुष्का पाटीलने ४२.०६७ गुण घेत रौप्यपदक मिळवले. तेलंगणाच्या निशिका अगरवाल हिने ४४.३३३ गुण घेत सुवर्णपदक पटकावले, तर ४१.२३३ गुण मिळवणारी ठाण्याची सारा राऊळ कांस्यपदकाची मानकरी ठरली. (वृत्तसंस्था)

# कुस्तीत महाराष्ट्राला १ सुवर्ण, २ रौप्य, ३ कांस्य

## अकोल्याच्या स्मृती श्रीनाथनला कांस्य

◆ **पाटणा, १३ मे**

मराठमोळ्या कुस्तीपटूंनी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पदकांचा षट्कार झळकावले. महाराष्ट्राच्या कुस्तीपटूंनी १ सुवर्ण, २ रौप्य अन् ३ कांस्य अशी एकूण ६ पदकांची कमाई केली.

ज्ञानभवन सांस्कृतिक हॉलमध्ये सुरू असणाऱ्या कुस्ती स्पर्धेत ग्रीको रोमन प्रकारातील ८० किलो गटात सांगलीच्या परम माळी याने अंतिम लढतीत हरयाणाच्या सचिनकुमारचा भारव्दांज डावावर ५-० गुणांनी मात करून सुवर्णपदक पटकावले.

मुलांच्या ५१ किलो प्रीस्टाईल प्रकारात कोल्हापूरतील राधानगरीच्या प्रणव घारेला चुरशीच्या अंतिम लढतीत हरयाणाच्या हर्षकुमारकडून पराभव स्वीकारावा लागला. ९२ किलो प्रीस्टाईल अंतिम लढतीत पुण्याच्या सुरज चोरगेवर हरयाणाच्या अर्जुनकुमारने ०-६ गुणांनी मात केली. मुलींच्या ६२ किलो प्रीस्टाईल गटात अकोला येथील स्मृती श्रीनाथने राजस्थानच्या चंचल माळीवर १०-० गुणांनी मात करीत कांस्यपदकावर नाव कोरले. ५५ किलो ग्रीको रोमनच्या कांस्य पदकाच्या लढतीत कोल्हापूरच्या आदित्य ताटेने कर्नाटकच्या हनुमंत तुंगलवर १०-० गुणांनी एकतर्फी मात केली. रिक्षा चालकाचा मुलगा असाणाऱ्या आदित्यचे हे खेलो इंडिया स्पर्धेतील दुसरे कांस्य पदक आहे. कोल्हापूरच्याच १५ वर्षीयहर्षवर्धन जाधवने ५१ किलो प्रीस्टाईल प्रकारात उत्तरप्रदेशच्या मुकेश यादवला ६-१ गुणांनी नमवून कांस्य पदकावर नाव कोरले. (वृत्तसंस्था)



### संजीवनी कॉर्पोरेट प्रीमियर लीग

# श्री गणेश ज्वेलर्सला विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

श्री गणेश ज्वेलर्सने महालक्ष्मी ज्वेलर्सला नमवून संजीवनी कॉर्पोरेट प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

संजीवनी सोशल फाउंडेशनने आयोजित केलेल्या या स्पर्धेत ४0 वर्षांवरील निमा, चार्टर्ड अकाउंटंट, ॲड. लिगल वॉरियर्स, महालक्ष्मी ज्वेलर्स, भावसार, जोडभावी पेठ पोलीस , टीचर्स ११ व श्री गणेश ज्वेलर्स अशा आठ संघांनी भाग घेतला होता.

दयानंद कॉलेजच्या स्टेडियम वर झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन माजी प्राचार्य डॉ. व्ही.पी. उबाळे व पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण, मुख्य फायर ऑफिसर राकेश साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. संजीवनी सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राकेश उदगिरी यांनी प्रास्ताविक केले. पारितोषिके अरविंद साका व निलेश धाराशिवकर यांच्या हस्ते झाले.

हे सामने यशस्वी करण्यासाठी संजीवनी सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राकेश उदगिरी, सतीश सुरवसे, आनंद खमितकर, सचिन गायकवाड, चंद्रशेखर उदगिरी, सिद्धराम तंबाके, सचिन गबुरे, अमोल शेट्टी, संतोष पेद्दी, कल्याणी नन्ना, कुमार कुडाभोई, अमन निरंकारी, सुरज रघुवंशी, अक्षय फुलारी व फाउंडेशनचे इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.

**२३५ केशर आंब्याची एक बाग निर्माण करणार**

एक षटकार एक झाड ! एक गडी बाद एक झाड ! अशी संकल्पना घेऊन संजीवनी सोशल फाउंडेशनने याचे आयोजन केले होते. या मालिकेमध्ये १४२ गडी बाद तसेच ९३ षटकार मारण्यात आले असे एकूण २३५ केशर आंब्याची एक बाग निर्माण करण्याचे नियोजन जून महिन्यात संजीवनी सोशल फाउंडेशन कडून होणार आहे.

# डब्ल्यूटीसी अंतिम फेरीसाठी कोन्स्टास, ग्रीनचा समावेश

◆ **मेलबर्न, १३ मे**

पुढील महिन्यात लंडनमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या १५ सदस्यीय संघात चमकदार सलामीवीर सॅम कोन्स्टास व तंदुरुस्त झालेला अष्टपैलू कॅमेरून ग्रीनला स्थान मिळाले आहे. या संघात पॅट कमिन्स व त्याचे सहकारी खेळाडू प्रतिष्ठित गदा कायम ठेवण्याचे लक्ष्य ठेवतील.

संघात फारसे आश्चर्य नाही. या वर्षाच्या सुरुवातीला भारत आणि नंतर श्रीलंकेविरुद्ध खेळलेल्या सामन्यांसारखेच आहे.

दशकात पहिल्यांदाच भारताला पराभूत करून तितक्याच जोरदार उन्हाळ्यात संघाने श्रीलंकेत प्रभावी मालिका विजय मिळवून जागतिक कसोटी चषकाचे चक्र संपविले, असे निवड समितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांनी सांगितले.



सॅम कोन्स्टास



कमेरून ग्रीन

त्या मालिकांमध्ये दोन वर्षांच्या कालावधीत सातत्यपूर्ण कामगिरी झाली आणि आता आम्हाला जागतिक कसोटी अजिंक्यपद (११ ते १५ जून लॉर्ड्स येथे) राखण्याची अविश्वसनीय रोमांचक संधी मिळाली आहे.

'अंतिम फेरी गाठणे हा गटासाठी खूप अर्थपूर्ण आहे व लॉर्ड्स येथे दक्षिण आफ्रिका ऑस्ट्रेलियाला आव्हान देईल, याची आम्हाला खूप उत्सुकता आहेत,'' असे ते पुढे म्हणाले. संघात स्थान मिळवण्यात अपयशी ठरल्यानंतर कोन्स्टासला श्रीलंकेच्या दौऱ्यावरून घरी पाठवण्यात आले होते व तो न्यू साऊथ वेल्सकडून खेळत होता. मेलबर्नमधील चौथ्या कसोटीत त्याने भारताविरुद्ध रोमांचक पदार्पण केले, परंतु नंतर तो वेग कायम ठेवू शकला नाही. गेल्या वर्षी पाठीच्या दुखापतीमुळे ग्रीनला शस्त्रक्रियेची आवश्यकता होती. नियमित नॅथन लियोनच्या जागी फिरकी गोलंदाज मॅट कुहनेमनचा समावेश करण्यात आला आहे, तर प्रवासी राखीव खेळाडू म्हणून ब्रेंडन डॉगेटची निवड करण्यात आली आहे.

त्यानंतर २५ जूनपासून बार्बाडोस, ग्रेनाडा आणि जमैका येथे होणाऱ्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी हाच संघ वेस्ट इंडीजला रवाना होणार आहे.

दुखापतीमुळे श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतून आणि त्यानंतरच्या चॅम्पियन्स चषकातून बाहेर पडलेले कमिन्स व जोश हेझलवूड इंडियन प्रीमियर लीग दरम्यान यशस्वीरित्या पुनरागमन केल्यानंतर संघात परतले आहेत.

मिशेल स्टार्क व स्कॉट बोलॅण्ड उर्वरित वेगवान गोलंदाजांची जबाबदारी सांभाळतील. दुखापतीमुळे दुखापत झाल्यास दक्षिण ऑस्ट्रेलियाचा डॉगेट बॅकअप वेगवान गोलंदाज असेल. (वृत्तसंस्था)

# प्रेरणादायी विराट

विराट कोहलीचा फिटनेस म्हणजे शारीरिक ताकदीचा, तर चिकाटी म्हणजे मानसिक ताकदीचा सर्वोत्तम नमुना आहे. त्याच्या या दोन्ही गुणांमुळेच तो आजचा परफॉर्मन्स आयकॉन ठरला आहे. आजचा तरुण वर्ग त्याच्याकडे केवळ क्रिकेटपटू म्हणून नव्हे, तर एक प्रेरणादायक व्यक्तिमत्त्व म्हणून पाहतो. खेळ हे केवळ शरीराची क्षमता मोजणारे माध्यम नाही, तर मनसिक ताकदीची आणि सातत्याचीही खरी कसोटी असते. खेळाडू होणं सोपं नसतं ही म्हण विराट कोहलीसारख्या महान क्रिकेटपटूच्या कारकिर्दीकडे पाहताना अगदी खरी वाटते. त्याच्या खेळातली जिद्द, चिकाटी, शिस्त, आणि अपार मेहनत यामुळेच तो फक्त भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात आदराने पाहिला जातो.

विराट कोहलीचा क्रिकेटमधील प्रवास दिल्लीच्या गल्ली क्रिकेटपासून सुरू झाला. वयाच्या लहानशा वयातच त्याने आपल्या खेळकौशल्याने सर्वांचे लक्ष वेधले. २००८ साली भारताने अंडर-१९ वर्ल्ड कप जिंकल्यावर विराटची ओळख जागतिक क्रिकेटला झाली. त्यानंतरचा प्रवास हा केवळ यशाचा नव्हता, तर त्यात अपयश, टीका, आणि मानसिक संघर्षही होता.

**जिद्द आणि सातत्य - विराटचा खरा चेहरा**

विराट कोहलीची फलंदाज म्हणून शैली केवळ तांत्रिकदृष्ट्या व ती मानसिकदृष्ट्याही प्रेरणादायक आहे. त्याने अनेकदा भारतीय संघासाठी अशक्य वाटणाऱ्या परिस्थितीत सामने जिंकून दिले आहेत. विशेषतः एकदिवसीय सामन्यांत त्याचा रन चेस करताना जो आत्मविश्वास असतो, तो संपूर्ण जगात दुर्लभ मानला जातो.

त्याच्या शतकांची संख्या, धावसंख्या, आणि उच्च सरासरी ही आकडेवारी त्याच्या सातत्याची साक्ष देते. मात्र हे आकडे त्याच्या मेहनतीची, मानसिक तडजोडीची आणि आत्मअनुशासनाची फळं आहेत.

कोहलीने भारताचा कर्णधार म्हणूनही जबाबदारी लीलया पार पाडली. त्याच्या आक्रमक नेतृत्वामुळे भारतीय संघ अधिक लढाऊ आणि आत्मविश्वासू झाला. परदेशात कसोटी सामने जिंकण्याची सवय भारतीय संघाला त्याच्याच नेतृत्वात लागली. संघाचा फिटनेस स्टँडर्ड उंचावण्यात त्याचा सिंहाचा वाटा होता.



**यशामागची किंमत**

कोहलीचा प्रवास काही सहज झाला नाही. त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतरही तो मैदानात उतरला. त्याला अनेकदा फारशी फॉर्म नसलेले दिवस पाहावे लागले. टीकाकारांनी त्याच्यावर अनेकदा बोट दाखवलं. पण त्या प्रत्येक कठीण प्रसंगातून त्याने स्वतःला सिद्ध केलं - मानसिक आरोग्य, विश्रांती आणि परतफेड या गोष्टी तो प्राधान्याने हाताळतो, हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठं वैशिष्ट्य आहे.

**एक प्रेरणास्थान**

आज विराट कोहली म्हणजे केवळ क्रिकेटचा चेहरा नाही, तर मेहनतीचं, चिकाटीचं, आणि स्वप्नासाठी झगडण्याचं प्रतीक आहे. खेळाडू होणं सोपं नसतं याचा अर्थ विराटच्या जीवनाकडे पाहिल्यावर स्पष्ट समजतो - कारण त्याने केवळ खेळात नव्हे, तर जीवनातही एक विजेता बनून दाखवलं आहे.

**फिटनेससाठी केलेला प्रवास**

विराट कोहली हा आजच्या घडीला जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम फिट खेळाडूंमध्ये गणला जातो. त्याचा फिटनेस म्हणजे केवळ शरीराची तंदुरुस्ती नाही, तर मानसिक शिस्त आणि सातत्य यांचं प्रतीक आहे. करिअरच्या सुरुवातीला विराट कोहलीसुद्धा इतर सामान्य खेळाडूंप्रमाणेच होता - जरा वजनदार आणि फिटनेसकडे फारसं लक्ष नसलेला. मात्र २०१२ साली त्याने स्वतःच्या शरीराकडे गांभीर्याने पाहायला सुरुवात केली. त्याने आहार, झोप, आणि वर्कआउट यामध्ये मोठे बदल केले.

**डाएट कंट्रोल :** कोहलीने फास्ट फूड, साखर आणि जास्त तेलकट पदार्थ पूर्णपणे बंद केले. त्याच्या आहारात प्रोटीन, फायबर्स, आणि नैसर्गिक पदार्थ असतात.

**वर्कआउट रुटीन :** तो नियमित व्यायामशाळेत वर्कआउट करतो. कार्डिओ, वेट ट्रेनिंग, आणि कोअर स्ट्रेंथ यावर तो विशेष भर देतो.

**फिल्ड फिटनेस :** मैदानात त्याची ऊर्जा, वेगवान रनिंग, आणि फील्डिंगमधील तडफदार हालचाली यामुळे तो फिटनेसचा आदर्श मानला जातो.

**चिकाटी आणि मानसिक ताकद**

फिटनेससारखीच विराटची मानसिक ताकद आणि चिकाटीही वाखाणण्याजोगी आहे. अनेकदा खराब फॉर्म, वैयक्तिक दुःख, आणि टीका यांचा सामना करतानाही त्याने कधीही हार मानली नाही.

वडिलांच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशी रणजी सामना खेळणे ही त्याच्या चिकाटीची आणि समर्पणाची सर्वोच्च उदाहरण आहे. २०२०-२०२२ दरम्यान शतक नसलेल्या काळातही तो डगमगला नाही, तर संयम बाळगून मेहनत करत राहिला. मानसिक आरोग्यावर भर देत त्याने स्वतःला वेळ दिला आणि पुनरागमन करत पुन्हा आपली सर्वोत्तमता सिद्ध केली.विराट कोहलीचं यश हे त्याच्या नैसर्गिक कौशल्यामुळे नाही, तर त्याने घेतलेली मेहनत, अंगी बाणवलेली शिस्त आणि खेळाप्रती असलेलं निस्सीम प्रेम यामुळे आहे. शेवटी एवढंच म्हणेन - आपण विराट कोहलीकडून शिकायचं असेल, तर त्याच्या फिटनेसपेक्षा त्याची चिकाटी आणि न झुकणारी मानसिकता ही खरी प्रेरणा आहे.

**- सावता घाडगे,**
अरण धनुर्विद्या प्रशिक्षक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्वाचे...




## सांगोला विद्यामंदिरचे दहावीच्या परीक्षेत दैदीप्यमान यश

**सांगोला, दि.१३ मे-**

सांगोला येथील सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे ५०८ पैकी ५०० विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल ९८.४२ टक्के लागला आहे. तनुजा चोपडे ९९.२० प्रथम, समृद्धी भोसले ९९ द्वितीय, ओजस्वी नवले ९८.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. ९५ टक्के ४१, ९० टक्के मिळवणारे ९२ विद्यार्थी आहेत. विशेष श्रेणीत २४४, प्रथम श्रेणीत १५३, द्वितीय श्रेणीत ८२ तर उत्तीर्ण श्रेणीत २१ विद्यार्थी आहेत. पैकीच्या पैकी मार्क मिळविणारे गणित विषयात ११, संस्कृत विषयात ४, विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयात १ विद्यार्थी असे उल्लेखनीय यश या विद्यार्थ्यांनी मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म ल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, सर्व संस्था सदस्य, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## तीन कोटी ३७ लाखांच्या फसवणूक प्रकरणी आरोपीची जामिनावर मुक्तता

**बार्शी, दि. १३ मे -**

करमाळा येथील फिर्यादी बाळासाहेब पोपट राऊत, रा. घोटी, ता. करमाळा यांनी यातील मुख्य आरोपी रेव्वननाथ लक्ष्मण ननवरे, रा. घोटी, ता. करमाळा व इतर दोन यांचे विरुध्द करमाळा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलेला होता. यामध्ये फिर्यादीने आरोपींने शेअर्स मार्केटमध्ये गुंतवणुक करुन चांगला परतावा मिळवुन देतो या आमिषाने फिर्यादी व करमाळा तालुक्यातील लोकांची रक्कम रुपये ३,३७,३४,१५६/- (तीन कोटी सदोतीस लाख चौतीस हजार एकशे छप्पन्न रुपये) ची फसवणुकी बाबतची फिर्याद दिलेली होती. तदनंतर यातील आरोपी रेवननाथ लक्ष्मण ननवरे यांनी ड. भारत कट्टे, सोलापूर व ड. गणेश जगताप, बार्शी यांनी सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र दाखल झालेले असून यातील आरोपींने कुठल्याही स्वरुपाचे यातील गुंतवणुकदारास आमिष दाखविलेले नाही. यातील आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही असा युक्तीवाद ग्राह्य धरुन अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. चव्हाण साहेब यांनी यातील आरोपींची पाच लाख रूपयांच्या जातमुचलक्यावर जामीनावर मुक्तता केली. या प्रकरणामध्ये आरोपी तर्फे ॲड.भारत कट्टे, सोलापूर व ॲड. गणेश जगताप, बार्शी व ॲड. अक्षय धस, बार्शी यांनी काम पाहिले.

## नूतन विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि. १३ मे -**

फेब्रुवारी २०२५ मध्ये पार पडलेल्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत आष्टी येथील नूतन विद्यालयाचा निकाल १००% लागला. परीक्षेला प्रविष्ट ११२ विद्यार्थ्यांपैकी सर्व ११२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी ५५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, ३२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, २४ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर १ विद्यार्थिनीने उत्तीर्ण श्रेणी संपादन केली. प्रशालेतून प्रथम तीन क्रमांक पटकावलेले गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे प्रथम गाडे अनुष्का हनुमंत ९२ टक्के, द्वितीय, व्यवहारे आदित्य रामचंद्र ९१.४० टक्के, तृतीय व्यवहारे रोहन मधुकर ९०.६० टक्के निकालाची विशेषता : ९ विद्यार्थी ९० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवून यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षकांचे ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा, सोलापूर संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पराग शहा, प्रशालेचे मुख्याध्यापक अजित हेरले, पर्यवेक्षक धैर्यशील पवार यांनी अभिनंदन केले.

## डोणज येथे जन्मदात्या आईची चार वर्षीय मुलीस जीवे मारून गळफासाने आत्महत्या

**मंगळवेढा दि.१३ मे**

डोणज येथे जन्मदात्या आईने आपल्या चार वर्षीय मुलीस जीवे मारून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडल्याने मंगळवेढा तालुक्यात एकच खळबळ उडाली असून या घटनेची नोंद मंगळवेढा पोलिसात झाली आहे.दरम्यान आत्महत्येचे कारण अस्पष्ट असल्याने पोलिसांनी व्हिसेरा राखून ठेवला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहीती आशी यातील मयत आई स्नेहा श्रीधर तेली (वय २५ ) हिने तिची चार वर्षाची मुलगी मैथली हिला जीवे मारून दिनांक १३ रोजी सकाळी ८ पूर्वी आई-वडिलांच्या घरी स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली आसल्याची खबर चन्नाप्पा देवपुरे यांनी पोलीसात दिली आहे. गेली दोन वर्षापासून मयत आई-वडिलाकडेच राहात आसल्याची माहीती मिळतेय.आत्महत्येचे कारण अस्पष्ट आसल्याने पोलीसांनी व्हिसेरा राखून ठेवला आहे.आधिक तपास बोराळे बिटचे पोलीस हवालदार नवले करीत आहेत.

## सुरेखा कल्याणशेट्टी प्रशालेची यशाची परंपरा कायम

**अक्कलकोट दि १३ मे-**

सुरेखा कल्याणशेट्टी प्राथमिक व उच्च माध्यमिक प्रशाला अक्कलकोट शाळेने उत्तुंग यशाची परंपरा कायम ठेवीत सेमी विभागाचा निकाल ९५.६५ मराठी माध्यमाचा ९६.१५ टक्के तर कन्नड विभागाचा दहावी परिक्षेचा निकाल ६४.२० टक्के लागला आहे. सेमी विभागात वेदांती माशाळकर ९६ टक्के मिळवून प्रथम क्रमांक मराठी विभागात समर्थ सुतार ८४ ६० टक्के कन्नड विभागात आकाश निंगदळी ६४.२० टक्के मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला .द्वितीय सेमी विभागात श्रेया बिराजदार ९४.२०टक्के मराठी विभागात मल्लय्या हिरेमठ ८२.६० टक्के तर कन्नड विभागात कृष्णाबाई कुलारी ५७.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. सेमी विभागात तृत्तीय क्रमांक मयुरी हळगोदे ९१.४० टक्के मराठी विभागात पुजा बदिछोडे ७९.६० टक्के कन्नड विभागात तृतीय क्रमांक सुदिप मणुरे ५० टक्के गुण मिळविले. यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी प्राचार्य मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी सर्व शिक्षक वृदांनी अभिनंदन केले आहे.

# पंढरपूर तालुक्यातील २३ शाळांचा १०० टक्के निकाल

## दहावीच्या परीक्षेत ६ हजार ५६९ विद्यार्थी उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ मे-**

पंढरपूर शहर व तालुक्यातील दहावी परीक्षेत तब्बल ९२.९० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पंढरपूर शहर व तालुक्यातील तब्बल १०५ शाळांमधून ७ हजार ७१ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यातील ६ हजार ५६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्यातील २३ शाळांचा १०० टक्के निकाल लागला आहे.

लोकमान्य विद्यालय पंढरपूर ७१.०५, रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब ९९.२१, यशवंत विद्यालय भोसे ९८.३१, गौतम विद्यालय पंढरपूर ५८.८२, विवेक वर्धिनी विद्यालय पंढरपूर ८७.३३, मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला पंढरपूर ९८, न्यू इंग्लिश स्कूल भाळवणी ९५.७१, द.ह. कवठेकर प्रशाला पंढरपूर ९८.६५, न्यू इंग्लिश स्कूल गादेगाव ९०.९०, एस. पी. मंडल, एसएमएस इंग्लिश स्कूल आंबे चिंचोली ९३.३३, ग्लो उर्दू हायस्कूल पंढरपूर ७५, न्यू इंग्लिश स्कूल रोपळे ९७.९७, यशवंत विद्यालय पंढरपूर ९९.२०, दौलतराव विद्यालय कासेगाव ८०.१२, साधना विद्यालय तावशी ९८, सीताराम महाराज विद्यालय खर्डी ९७.२७, तुंगेश्वर हायस्कूल तुंगत ७३.०१, जवाहरलाल नेहरू हायस्कूल सिद्धेवाडी ९७.६७, श्री दत्त विद्यामंदिर सुस्ते ९५.३७, सद्गुरू गाडगेबाबा विद्यालय पंढरपूर ८३.८७, श्री भैरवनाथ विद्यालय सरकोली ९७.५६, आण्णासाहेब पाटील विद्यालय तिसंगी ९८.४६, न्यू इंग्लिश स्कूल करकंब ९३.५४, विद्यामंदिर हायस्कूल गार्डी ९२.५९, नूतन विद्यालय कोर्टी ९४.५४, शेळवे कृषी विद्यालय शेळवे ९५.०४, संत प्रभू प्रशाला अजनसोंड ९३.७५, कै. आण्णाभाऊ साठे प्रशाला पंढरपूर ५४.५४, माध्यमिक आश्रमशाळा वाखरी ९८.०९, पटवर्धन कुरोली प्रशाला ९५.०८ के. ए. रावजी पाटील विद्यालय पंढरपूर ५९.३४, वसंतराव काले प्रशाला वाडीकुरोली ९६.६८, दर्लिंग विद्यामंदिर चळे ९६.६१, विलासराव देशमुख हायस्कूल उपरी ८१.३९, वामनराव माने प्रशाला भैरवनाथवाडी ८०.९५, विद्या विकास मंदिर उंबरे-पागे ९१.९५, मातोश्री ईश्वरम्मा विद्यालय पंढरपूर ९१.८३, न्यू इंग्लिश स्कूल अनवली ९८.४८, राजीव गांधी विद्यालय फुलचिंचोली ९७.८७, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय मुंढेवाडी ९२.८५, गोपाळकृष्ण विद्यामंदिर गोपाळपूर ८५.१८, जिजामाता प्रशाला आंबे ९६.६६, श्रीमंतराव काळे विद्यालय जैनवाडी ९३.९३, ज्ञानेश्वर माऊली विद्यालय खरसोळी ९२.५९, श्री दर्लिंग विद्यामंदिर मगरवाडी ८५.१८, भैरवनाथ विद्यालय कान्हापुरी ९५, आदर्श प्रशाला करकंब ९३.५८, विज्ञानंद माध्यमिक विद्यालय बार्डी ७५, पतंगराव कदम माध्यमिक विद्यालय पळशी ९१.८३, श्री गंगागिरी विद्यालय सांगवी ९२.८५, रेणुका विद्यालय बाभूळगाव ८५.७१, विद्याविकास प्रशाला लक्ष्मीटाकळी ९८.३६, मातोश्री रुक्मिणी गंगाराम होळकर विद्यालय होळे ७८.३३, डॉ. फाळके प्रशाला पांढरेवाडी ९०, हनुमान विद्यालय सुपली ९५.०८, मातोश्री सौ. सरूबाई माने विद्यालय भटुंबरे ९७.७०, यशकिर्ती विद्यालय पंढरपूर ९६.०७, श्री सिद्धनाथ विद्यालय सातवा मैल कासेगाव ९२.३०, माध्यमिक विद्यालय कौठाळी ९४.४४, कर्मयोगी माध्यमिक विद्यालय तारापूर ९४.५९, पेहे माध्यमिक विद्यालय पेहे ९६.७२, अहिल्या प्रशाला केसकरवाडी ९४.१७, शिरगाव विद्यालय ५५.५५, छत्रपती शिवाजी हायस्कूल पंढरपूर ५९.४५, कर्मयोगी सुधाकर परिचारक विद्यालय पुळूज ९७.४३, रत्नम हर्षी मोहिते-पाटील विद्यालय शिरसोडी ८४.२१, प्रोग्रेस माध्यमिक विद्यालय लिंकरोड ८१.२५, रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील विद्यालय मनीषानगर ६४, राहुल गांधी माध्यमिक विद्यालय कोर्टी ९७.५९, न्यू इंग्लिश स्कूल शेळवे ९२.७२, ज्ञानप्रबोधिनी विद्यालय पंढरपूर ७९.१६, प्रमिला माणिकराव देशमुख माध्यमिक विद्यालय पंढरपूर ९५.७१, स्व. धीरूभाई अंबानी विद्यालय शेगाव दुमाला ८३.७८, राजनंदिनी माध्यमिक विद्यालय कौठाळी ९०.३२, बोहाळी माध्यमिक विद्यालय बोहाळी ९३.९३, पंचरत्न इंग्लिश स्कूल पंढरपूर ९६.२९, कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूर ९७.९१, जिजामाता पब्लिक स्कूल न्ड ज्युनि. कॉलेज पळशी ८०, शिवरत्न पब्लिक स्कूल गादेगाव ६२.५०, ज्ञानदीप सेमी इंग्लिश स्कूल ९०.२४.

### १०० टक्के निकाल लागलेल्या शाळा

लिंगेश्वर विद्यालय पुळूज, आचार्य दोंदे विद्यालय ओझेवाडी, श्रीनाथ विद्यालय भंडीशेगाव, मोहसिन विद्यालय इसबावी, विठ्ठल प्रशाला वेणुनगर, श्रीनाथ विद्यालय सोनके, इंग्लिश मीडियम स्कूल मनिषानगर, भैरवनाथ विद्यालय आढीव, सिद्धेश्वर प्रशाला तपकिरी शेटफळ, श्री दुद्धेश्वर प्रशाला मेंढापूर, राजाराम इंग्लिश स्कूल पंढरपूर, रांझणी विद्यालय रांझणी, खेडभोसे विद्यालय खेडभोसे, मॉडर्न हायस्कूल पिराची कुरोली, सुधाकरपंत परिचारक माध्यमिक प्रशाला करकंब, माध्यमिक विद्यालय नांदोरे, माध्यमिक विद्यालय नेपतगाव, शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालय कोर्टी, पालवी ज्ञानमंदिर माध्यमिक विद्यालय, आदर्श माध्यमिक विद्यालय, शिवछत्रपती पब्लिक स्कूल १००, प्रोग्रेस इंग्लिश स्कूल कोर्टी १००, आदर्श माध्यमिक विद्यालय.



## श्रीपूर येथील चंद्रशेखर विद्यालयाचा ९५ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १३ मे -**

नुकत्याच झालेल्या माध्यमिक शालांत परिक्षेत चंद्रशेखर विद्यालयाचा ९४.४७ टक्के निकाल लागला असून श्रावणी ज्योतिराम मुटेकर हिने ९६ .४० टक्के गुण मिळवत प्रथम, प्रियदर्शनी संदीप घाडगे हिने ९५.६० टक्के गुण मिळवत व्दीतीय, अक्षरा बाहुबली हासुरे हिने ९५.२० टक्के गुण मिळवत तृतीय, सोम नाथ संदीप पवणे याने ९४. २० टक्के गुण मिळवत चतुर्थ तर कृष्णा दत्तराव आंभुरे याने ९३. ४ टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थांचे आबासाहेब देखमुख ट्रस्टचे अध्यक्ष डॉ .रामदास देशमुख, उपध्यक्षा तथा माळशिरस पंचायत समितीच्या माजी उपसभापती शुभांगीताई देशमुख, सचिव भारत कारंडे, सदस्य यशराज देशमुख, प्राचार्य पां. बा. बनसोडे, पर्यवेक्षक न. ह. अधटराव, क. महा. विभागप्रमुख सु . मा. गवळी, सि. भा. गुरव, तसेच शिक्षक पालक संघ यांनी अभिनंदन केले.

## मंद्रूपच्या महाराजस्व शिबिरात ५६ दाखल्यांचे वितरण

### विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयांतर्गत मंद्रूप मंडळ कार्यालयात घेण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात ४० उत्पन्नाचे, ११ रहीवाशी तर ५ जातीचे असे एकूण ५४ दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांसह पालक व नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन मंद्रूपचे मंडळ अधिकारी ज्योतिबा पवार योनी केले. यावेळी तलाठी रावसाहेब कोकरे, शेखर शेडयाळ, विश्वनाथ पवार यांच्यासह महा इ सेवा केंद्राचे विजय टेळे, महेश मेंडगुदले, नागेश मेंडगुदले, सुभाष सुतार, मल्लिनाथ बाळगी आदि उपस्थित होते. दहावी, बारावी उत्तीर्ण व इतर शालेय विध्यार्थ्यांसह नागरीकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या शिबिरात जात दाखला, रहिवाशी दाखला,उत्पन्न दाखला, नॉन क्रिमीलेअर, पॅनकार्ड, सेंट्रल ओबीसी दाखला यांच्यासह विविध दाखले काढण्यात आले. मंगळवारी सकाळी आठ वाजल्यापासून दुपारी दोन वाजेपर्यंत शिबिर सुरू होते. मंद्रूप, बरूर, नांदणी, बसवनगर, चिंचपूर, वडकबाळ, कुरघोट, टाकळी या गावातील विध्यार्थ्यांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



मंद्रूप कार्यालयांतर्गत घेण्यात आलेल्या महाराजस्व समाधान शिबिरात विद्यार्थ्यांच्या दाखल्यासह नागरीकांना विविध दाखले काढून देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार समाधान शिबिरास नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. **- रावसाहेब कोकरे, तलाठी मंद्रूप.**



## कन्हेरगांवात यशवंत शिंदे व डॉ. तन्वी साखरे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१३ मे-**

एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल यशवंत अशोक शिंदे तसेच कु. डॉ.तन्वी नागेश साखरे हिने एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल या दोघांचा नुकताच कन्हेरगांव ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कन्हेरगांव तालुका माढा येथे सत्कार समारंभ कार्यक्रमाचेआयोजन होते . हभप विष्णू महाराज डोके पाटील यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, हभप विष्णू महाराज डोके पाटील, महेश डोके पाटील, माजी सरपंच जालिंदर डोके पाटील, पद्माकर काशीद, माजी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कदम, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संजय डोके पाटील, समाधान पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य संपत चव्हाण, रामभाऊ कदम, बाळासाहेब डोके, शरद मोरे, अभिजीत डोके, शिवतेज डोके पाटील, मयुरी डोके, स्नेहल डोके, स्वाती साखरे, अर्चना डोके, निलावती डोके उपस्थित होते.

## दुचाकीवरील महिलेने धडक दिल्याने तरूणाचा हात फ्रॅक्चर

**सोलापूर, दि. १३ मे-**

सदर बझार परिसरातील तपस्या हॉस्पीटलसमोर दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेने धडक दिल्याने तरूणाचा हात फ्रॅक्चर झाला. याबाबत वैभव हणमंत जाधव (वय २३, रा. भागीरथी नगर, हडपसर, पुणे) या तरूणाच्या फिर्यादीवरुन एमएच १३ बी के ७५१३ क्रमांकाच्या दुचाकीवरील महिलेविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१२ मे रोजी साडेसातच्या सुमारास तपस्या हॉस्पीटलसमोर वैभव जाधव हे त्यांची पत्नीसाठी चहा घेऊन हॉस्पीटलकडे जात होते. त्यावेळी एमएच १३ बी के ७५१३ क्रमांकाच्या दुचाकीवरील महिलेने दुचाकी भरधाव चालवून जाधव यास पाठीमागून जोराची धडक दिली. यामध्ये जाधव यांच्या हाताचे हाड फ्रॅक्चर झाल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार मनोहर पुढील तपास करीत आहेत.

## विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेचा ठेका बीव्हीजी ग्रुपकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मे -**

विठ्ठल मंदिराला सुरक्षा रक्षक पुरवण्याचा ५ कोटी ७७ लाख रुपयांचा ठेका बीव्हीजी ग्रुपला मिळाला आहे. विठ्ठल मंदिरात यापुढे सुरक्षा रक्षक पुरवण्याची जबाबदारी या ग्रुपची असणार आहे, याबाबतची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

यापूर्वी ठेका असणाऱ्या ठेकेदाराकडून मंदिराचे नियम पाळले जात नसल्याने मध्यंतरी त्याचा ठेका रद्द करण्यात आला होता. यानंतर मंदिरांनी निविदा प्रसिद्ध केल्यावर देशभरातून आठ एजन्सीने यासाठी दर दिले होते. विशेष म्हणजे या आठही एजन्सीने सर्विस चार्जेस म्हणून ३.८५ इतका समान दर कोट केला होता. बीव्हीजी ग्रुप मंदिरासाठी जवळपास २२० सुरक्षारक्षक पुरवणार यानंतर समितीने निविदेत दिलेल्या नियमानुसार मार्किंग सिस्टीम ठरवली होती. यात आठ पैकी तीन एजन्सींना शंभर पैकी १०० गुण मिळाले. यानंतर मंदिराला ३०० पेक्षा जास्त माणसे पुरवणे या अटीमध्ये यातील दोन एजन्सी पात्र झाल्या.

अखेर शेवटच्या अटी नुसार या दोन मधील टर्नओव्हर मध्ये बीव्हीजी ही एकमेव एजन्सी पात्र झाली आणि त्यामुळे विठ्ठल मंदिराचा हा ठेका या बीव्हीजी कंपनीला देण्यात आल्याचे राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

आता मंदिरासाठी जवळपास २२० सुरक्षारक्षक पुरवण्याचे काम बीव्हीजी करणार असून यांचा वापर मंदिर दर्शन रांग आणि मंदिर परिसरातील परिवार देवता येथे केला जाणार आहे. याशिवाय यात्रेसाठी लागणाऱ्या जास्तीच्या सुरक्षारक्षकांची जबाबदारी ही बीव्हीजी वर असणार आहे. मंदिर आणि परिसरात सुरक्षा रक्षक पुरवणाऱ्या बीव्हीजी साठी ही समितीची नियमावली असून या नियमाचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी बीव्हीजीवर असणार असल्याची माहिती श्री.शेळके यांनी दिली.

### पंढरपूर हे महाराष्ट्रातील महत्वाचं धार्मिक स्थळ

पंढरपूर हे महाराष्ट्रातील महत्वाचं धार्मिक स्थळ आहे. दररोज लाखो भाविक या ठिकाणी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी येतात. आषाढी आणि कार्तिकी या मोठ्या वारीला पंढरपुरात ८ ते १० लाख भाविक जमा होतात. यावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. आषाढी वारीला आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराज आणि देहूतून संत तुकाराम महाराज यांची पालखी निघते. या पालखी बरोबर म हाराष्ट्रातील लाखो वारकरी चालत पंढरपूरमध्ये दाखल होत असतात. त्याचबरोबर अन्य ठिकाणाहून देखील मोठ्या प्रमाणात या वारीच्या वेळेस पालख्या येतात. त्यामुळं वारीच्या काळात वारकऱ्यांची मोठी गर्दी होत असते.

## मराठा सेवा संघाने सर्वांना पुढे घेवून जाण्याचा प्रयत्न करावा : मोहिते-पाटील

- ✓ जयसिंह मोहिते-पाटील छत्रपती शाहू पुरस्काराने सन्मानित
- ✓ जन्मेजयराजे भोसले, दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचाही विशेष सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.१३ मे-**

मराठा सेवा संघ हा केवळ मराठ्यांचाच आहे अशी समाजामध्ये जी भावना झाली आहे ती मोडून काढा. दुसऱ्या समाजातील चांगले गुण घ्या, त्यांचा आदर करा व छत्रपती शिवरायांप्रमाणे सर्वांना पुढे घेवून जाण्याचा प्रयत्न करा असे आवाहन सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

शंकरनगर-अकलूज येथील स्मृती भवन मध्ये म राठा सेवा संघाच्या वतीने तीन दिवसीय राज्यस्तरीय महाअधिवेशन आयोजित करण्यात आले होते.




अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर हे होते. या अधिवेशनाची आज मोठ्या उत्साहात सांगता झाली. मराठा सेवा संघाच्या वतीने जयसिंह मोहिते-पाटील यांना छत्रपती शाहू महाराज सामाजिक पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. त्याच बरोबर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले , सिने दिग्दर्शक नागराज मंजुळे, सिने कलावंत किरण माने, शिवशाहीर राजेंद्र कांबळे, जिजाऊ रथयात्रकार अर्जुन तनपुरे, सौरभ खेडेकर यांचा विशेष पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी स्वागताध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील, प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घोगरे, कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, प्रकल्प संचालक पुरुषोत्तम कडू आदींसह राज्यातील पदाधिकारी या तीन दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनास उपस्थित होते. सकाळी नवोदित कवींचे काव्यसंमेलन, त्यानंतर परिसंवाद झाला. त्यानंतर नाचू किर्तनाचे रंगी या विषयावर गंगाधर बनबरेसरांचे व्याख्यान, दुपारी महिलांचे जग आणि जगणे या विषयावर स्नेहा टोम्पे, यवतमाळ यांचे व्याख्यान, त्यानंतर नित्य नवे कायदे, नित्य नवा संघर्ष या विषयावर ॲड. मिलिंद पवार, पुणे यांचे व्याख्यान, कला क्षेत्रातील जातवाद आणि बहुजन समाज या विषयावर किरण माने सिने कलाकार यांचे व्याख्यान झाले. हे महा अधिवेशन यशस्वी करण्यासाठी केंद्रीय कार्यकारणी सदस्य उत्तमराव माने शेंडगे, धनाजी माने, जिल्हा सचिव हेमलाता मुळीक, मनोरमा लावंड, जिल्हा अध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड वनिता कोरटकर, प्रियाताई नागणे, शारदा चव्हाण, मनीषा जाधव, सुवर्णा घोरपडे, रवींद्र पवार, अशोकराव रणवरे, दिगंबर मिसाळ, नवनाथ कोडक, सिद्धेश्वर नागटिळक, डॉ विश्वनाथ आवड, शिवाजी शिंदे, बाळासाहेब पराडे, डॉ. अमोल माने, सचिव राजेंद्र मिसाळ, निनाद पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## महत्वाचे...

### पंढरपूर एसटी स्थानकात महिलेचे गंठण चोरीस

**सोलापूर, दि. १३ मे-**
एसटी बसमध्ये चढणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किंमतीचे १० ग्रॅमचे सोन्याचे गंठण चोरट्याने चोरून नेले. याबाबत सारिका पंडीत लोकरे (वय ४५, रा. अंबड, ता. माढा) या महिलेच्या फिर्यादीवरुन पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ मे रोजी सायंकाळी चारच्या सुमारस सारिका लोकरे या पंढरपूर येथील नवीन बस स्थानकामध्ये आई बायडाबाई गायकवाड यांच्यासोबत टेंभुर्णी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत सारिका यांच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरट्याने जबरदस्तीने चोरून नेले. म्हणून पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गोडसे पुढील तपास करीत आहेत.

### पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. १३ मे-**
पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून तरूणास फायटरने मारहाणक करणाऱ्या चौघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रथमेश पांडुरंग देवकर (वय २०, रा. तळे हिप्परगा, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अभि खरसडे (रा. अवंती नगर, सोलापूर), यशवर्धन कलकेरी, हर्षवर्धन कलकेरी, लोकेश आरकल (रा. वडार गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ मे रोजी रात्री प्रथमेश देवकर व अभि खरसडे याच्यात हॉटेल सूर्याजवळ पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून वादावादी होऊन मारामारी झाली होती. त्यानंतर प्रथमेश देवकर हा टिळक चौकातील महिंद्रा बँकेचे एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी त्याची मोटारसायकल थांबविली असता अभि खरसडे व त्याच्या साथीदारांनी देवकर यास हाताना व फायटरने मारहाण करून दगडाने मारहाण केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

### वसंत विहारमध्ये ७१ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. १३ मे-**
वसंत विहार परिसरातील राधाकृष्ण कॉलनीमधील बंद घर फोडून चोरट्याने ७१ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत रविराज राजाराम पवार (वय ३६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविराज पवार हे ९ मे रोजी दुपारी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. ते १० मे रोजी सकाळी परत घरी आले. या दरम्यान कुणीतरी चोरट्याने पवार यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा उचकटून घरात प्रवेश करून घरातील ७१ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. यामध्ये २ ग्रॅमचे मिनी गंठण, ४ ग्रॅमचे लहान व मोठी अंगठी, अर्धा ग्रॅमचे बदाम, अर्धा ग्रॅमची नथ व रोख रकमेचा समावेश असल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार परीट पुढील तपास करीत आहेत.

### विवाहितेचा छळ; पतीसह दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १३ मे-**
पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह दोघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पूजा दशरथ पिल्ले (वय ३०, रा. सोनी नगर, मोदी, हुडको, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती दशरथ जयराम पिल्ले, शिला जयराम पिल्ले (रा. गवंडी गौतम नगर, चेंबूर, मुंबई) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लग्नानंतर १० मार्च २०२३ ते १२ जून २०२४ या कालावधीत पूजा या सासरी नांदत होत्या. त्यावेळी लग्नात मानपान केला नाही, कपाट, बेड व इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तू दिलेल्या नाही, वस्तू घेण्यासाठी माहेरून दोन लाख रुपये घेऊन ये म्हणून पूजाचा पती व त्याच्या घरातील लोकांनी शारीरीक व मानसिक छळ केला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक माडे पुढील तपास करीत आहेत.

### पापड वाळू घालताना पत्र्यावरून पडल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. १३ मे-**
घराच्या पत्र्यावर पापड वाळू घालताना तोल जाऊन पडल्याने महिला जखमी झाली. हा प्रकार वालचंद कॉलेजवळील कमटम नगरात मंगळवारी सकाळी ७.१० वाजता घडला. सुमित्रा मल्लिकार्जुन निंबर्गी (वय ५८) असे महिलेचे नाव आहे. सुमित्रा या त्यांच्या कमटम नगरातील घराच्या पत्र्यावर मंगळवारी सकाळी सातच्या सुमारास पापड वाळू घालण्यासाठी चढल्या होत्या. अचानक त्यांचा तोल गेल्याने त्या पत्र्यावरून खाली पडल्याने डोक्याला जखम झाली तसेच नाकातून रक्त आल्याने सकाळी ७.४५ वाजता उमाकांत निंबर्गी याने उपचारास दाखल केले. मात्र त्यांची शुध्द हरपली असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# शहरातील विविध शाळांचे दहावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र दहावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल मंगळवारी जाहीर झाला. शहरातील विविध शाळांचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार करण्यात आला.**



### जैन गुरुकुल प्रशाला; तन्मय घाडगे प्रथम

श्री ऐ.प.दि. जैन पाठशाळा संचालित श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेचा एस. एस.सी बोर्ड परीक्षेचा निकाल ९९.५७ टक्के लागला असून एकूण प्रविष्ट २३६ विद्यार्थ्यांपैकी २३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी १४ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली. ९२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, ९१ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ३३ विद्यार्थी व्दितीय श्रेणी तर ५ विद्यार्थी तृतीय श्रेणीसह उत्तीर्ण झाले. प्रशालेतून तन्मय घाडगे याने ९७.६० टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळविला. मल्हार गुरव याने ९६.६० टक्के गुणांसह व्दितीय तर सुधर्म संतोष बोरगांवकर याने ९५ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. यावेळी प्रशालेत ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी व पालकांना पुष्पगुच्छ देऊन व पेढा भरवून प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुर आदींनी अभिनंदन केले.



### गांधीनाथा विद्यालय; साक्षी जिडगे प्रथम

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र दहावी परिक्षेत गांधीनाथा रंगजी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन करत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा निकाल ९७ टक्के लागला आहे. साक्षी जिडगे (प्रथम) ९५.२० टक्के वैष्णवी गुजले ( द्वितीय) ९२.८० टक्के गणेश वावरे (तृतीय) ९१.८० व जयश्री आळंदकर ९१.६० वैष्णवी ढेंगळे ९१.६० विद्यार्थ्यानी विशेष प्रावीण्य प्राप्त केले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता पुरवत प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी नागरत्ना एलिगार रेखा बोदार्डे दिपाली अनभुले वीरभद्र स्वामी शिवानंद सुतार मृणाली जैन रूपाली लामकाने भाग्यश्री बळ्ळे यांनी अभिनंदन केले.




### अहिल्याबाई प्रशाला; सुमेधा टिकूटे प्रथम

दहावीच्या बोर्ड परीक्षेत अहिल्याबाई प्रशालेने यंदाही आपली गुणवत्ता सिद्ध करत घवघवीत यश संपादन केले आहे. सुमेधा टिकूटे ८९ टक्के मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. अफनान शेख ८२ टक्के द्वितीय तर चेतन नरेश क्यारमकोंडा ७९.८० टक्के तृतीय क्रमांक तर १३ विद्यार्थी विशेष प्राविण्यांसह पास झाले तर ११ विद्यार्थी प्रथम वर्ग घेऊन उत्तीर्ण होत प्रशालेच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. संस्थेच्या वतीने संस्थापक हाजी बंदेनवाज शेख, मुख्याध्यापक इस्माईल शेख, वर्गशिक्षिका मंदाकिनी बसाटे , राज्यशेखर बमगोंडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### सरस्वती विद्यामंदिर प्रशाला; सिद्धात तुपेरे प्रथम



दहावी परीक्षेत स. हि.ने. प्रशालेचा निकाल ९६.९६ टक्के लागला. परीक्षेस प्रविष्ट झालेल्या ६६ विद्यार्थ्यांपैकी उच्च श्रेणीमध्ये १६, प्रथम श्रेणी मध्ये १४ व द्वितीय श्रेणीत १९ तर तृतीय श्रेणीत १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

प्रशालेतून तुपेरे सिद्धांत सारीपुत्र याने (८६ टक्के) गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक संपादन केला. तर मुजावर अरमान साहेबलाल (८४.६० टक्के) याने द्वितीय व अंजिखाने गौरी शीतल (८४.२० टक्के) हिने तृतीय क्रमांक संपादन केला. संस्थेचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग देशमुख, सचिव रोहिणी तडवळकर, उपाध्यक्ष मकरंद जोशी, रेवती कुलकर्णी, सहसचिव दत्तात्रय कुलकर्णी, खजिनदार सुधीर देव, संस्थेचे सदस्य ॲड. रघुनाथ दामले, शिरीष कुलकर्णी, प्रशांत बडवे, प्रिति चिलजवार, किरण वळसंगकर, मार्गदर्शक मोहन दाते, शशिकांत जिड्डीमनी, मंजिरी अंत्रोळीकर, राहुल औरंगाबादकर, सुनील कुलकर्णी, किशोर चंडक, राजेंद्र गांधी आदी मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.



### सुरवसे प्रशाला; अमन मुजावर प्रथम

सोलापूर: होटगी रोडवरील सुरवसे हायस्कूल सोलापूर या शाळेचा १० वी बोर्डाचा निकाल ९३.१६ टक्के लागला असून प्रथम क्रमांक मुजावर अमन अल्लाउद्दीन : ९६.८० टक्के द्वितीय म्हेत्रे समर्थ रवींद्र ९२.६० टक्के तर तृतीय भडकुंबे श्रेया विनायक ९०.६०% प्रशालेत यावेळीही मुलांनीच बाजी मारली असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक वृंदाचे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्ता सुरवसे, विद्यमान अध्यक्ष राजकुमार सुरवसे, सचिवा विजया सुरवसे, प्राचार्या उज्वला साळुंके यांनी अभिनंदन केले.



### श्राविका प्रशाला; गायत्री लोखंडे प्रथम

सोलापूर जिल्ह्यातील नामांकित उमाबाई श्राविका विद्यालयाने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा याही वर्षी राखली आहे. गायत्री भाग्यवान लोखंडे या विद्यार्थिनीने ९७.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक नक्षत्र कदम ९६.४० टक्के, समृद्ध भांडेकर ९६ टक्के यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. प्रशालेतील २० विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण, ३७ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले तसेच ५० विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये आले. यशस्वी संस्थेचे विश्वस्त यतीन शहा, देवई शहा, करण शहा, अंजली शहा, डॉ. रोहिणी शहा, मार्गदर्शिका दीप्ती शहा, अतुल शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, वर्गशिक्षक केतकी सोनटक्के, मीनाक्षी बेळ्ळे, सोनल आळंद आदींनी अभिनंदन केले.

## चंडक प्रशालेच्या तनिष्का सावंत हिने मिळविले १०० टक्के गुण

**सोलापूर, दि. १३ मे-**
एस. आर. चंडक प्रशालेची विद्यार्थिनी सावंत तनिष्का विवेकानंद (रा. सलगरवस्ती) हिने इयत्ता १० वीच्या परीक्षेत १०० गुण मिळवून १००% टक्के गुण मिळवण्याचा यश संपादन केले आहे. तनिष्काचे वडील केंद्रीय राखीव पोलिस दलात (CRPF) सेवानिवृत्त असून, आई गृहिणी आहेत. तिच्या या यशाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, वर्गमित्र, आजी-आजोबा व नातेवाईक यांनी तिचे अभिनंदन केले आहे.



माझ्या यशामध्ये माझ्या शाळेतील सर्व शिक्षकांचा मोठा वाटा आहे. मी दररोज सकाळ-संध्याकाळ मिळून किमान पाच तास सातत्याने अभ्यास केला. अभ्यासाबरोबरच मी थ्रो बॉलमध्ये राज्यस्तरावर प्रतिनिधित्व केले असून त्याचे मला अतिरिक्त १२ गुण मिळाले. पुढे उच्च शिक्षण घेऊन माझ्या आई-बाबांचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे. माझ्या यशामुळे कुटुंबातील सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू पाहून मला खूप समाधान वाटते.
**- तनिष्का सावंत**




### दुभाजकातील झाड कोसळले पण अनर्थ टळला

**सोलापूर : शहरात मंगळवारी दुपारी जुना एम्प्लॉयमेंट चौकातील कामत हॉटेल समोरील दुभाजकातील लिंबाचे झाड मुळासहित उखडून टेम्पोवर कोसळले. पण कोणतीही दुखापत व जीवित हानी झाली नाही. (छायाचित्र केवल तिवारी)**






# व्ही. आर. पवारमध्ये साडी खरेदी करताना ग्राहक समाधानी

### प्रमुख व्यवस्थापक राजेश पवार यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**
अंतःकरणापासून सांगायचं झालं तर व्ही. आर पवार यांच्या साड्या अगदी मनाला भावतात. मग एक साडी घ्यायला आलेली महिला ग्राहक दोन साड्या कधी घेते हे समजतच नाही. येथे खरेदी करून आम्ही समाधानी असतो, असे येथे खरेदी करिता आलेल्या महिला ग्राहक आवर्जून बोलतात. हेच आमच्या यशाचे गमक आहे, असे प्रमुख व्यवस्थापक राजेश पवार यांनी सांगितले.



चाटी गल्ली येथील भव्य अशा दालनात लग्नबस्ता खरेदीसाठी कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येताना दिसतात. याचे कारण महिला ग्राहकांना विचारले असता ते म्हणाले, आम्ही येथे वर्षानुवर्षे साडी खरेदी करण्याकरिता येतो आणि आता आमच्या भाचीचे लग्न आहे. त्यामुळे शालूसह इतर साड्या खरेदी करण्यासाठी आलोत. कारण इथे साड्या व त्यांची रेंज आणि त्याचे डिझाईन आणि साड्यांची दर्जा पाहता महिलावर्ग सुखावून जातात. साड्यांचा दर्जा आणि त्याचे डिझाइन्ससाठी आम्हीही खूप भावुक होऊन जातो. आणि येथील सेवक वर्ग कंटाळा न करता कितीतरी वेळा साड्या पाहण्यास सांगतात आणि त्याचे महत्त्व पटवून देतात. म्हणून येथेच लग्नबस्ता खरेदीसाठी आलो असे सोलापूर, धाराशिव आणि लातूर येथील महिला ग्राहकांनी आवर्जून सांगितले.

लग्नबस्ता व आहेराच्या साड्या खरेदी करण्यासाठी व्ही. आर. पवार मध्ये सध्या प्रचंड गर्दी आहे. सोलापूरसह, लातूर, धाराशिव, बीड तसेच पुणे, मुंबई येथील ग्राहकही मोठ्या प्रमाणात खरेदीला येताना दिसत असल्याचे पवार यांनी सांगितले. व्ही. आर. पवार सारीजमध्ये डिझायनर शालू, डिझायनर ब्रायडल लाच्या, सिंथेटिक, कॉटन, लिनन साड्या, डिझायनर ब्रायडल कंची आणि पैठणी सह ड्रेस मटेरियल, तसेच आहेर करण्याकरिता शूटिंग सुटिंग-शर्टिंगची खरेदी देखील मोठ्या प्रमाणात होत आहे. आपले मनपसंद साडी, शालू मिळवण्यासाठी आणि आहेराच्या साड्या खरेदी करण्यासाठी सोलापूर शहर व महाराष्ट्रातील ग्राहकांनी एक वेळ अवश्य भेट द्यावे, असे आवाहन अमर पवार, महेश पवार व गिरीश पवार यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री सरस्वती मंदिर संस्थेच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. पांडुरंग देशमुख; रोहिणी तडवळकर सचिव

**सोलापूर, दि. १३ मे-**

श्री सरस्वती मंदिर संस्थेची त्रिवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली असून अध्यक्षपदी अ‍ॅड. पांडुरंग देशमुख तर सचिवपदी रोहिणी तडवळकर यांची निवड झाली.



संस्थेचे अन्य पदाधिकारी असे : रेवती कुलकर्णी, मकरंद जोशी (उपाध्यक्ष), दत्ता कुलकर्णी (सहसचिव), सुधीर देव (खजिनदार), अ‍ॅड. रघुनाथ दामले, प्रीती चिलजवार, प्रशांत बडवे, अ‍ॅड. किरण वळसंकर , शशिकांत जिड्डीमनी, मंजिरी अंत्रोळीकर, शिरीष कुलकर्णी, राहुल औरंगाबादकर,सुनील कुलकर्णी (सदस्य).



# दहावीच्या परीक्षेत शहर-जिल्ह्यात 'बहिणच लाडकी'

- मुलींचीच बाजी : सरासरी निकाल ९६.१० टक्के
- ५९ हजार २७७ विद्यार्थी उत्तीर्ण
- शहरातील बहुतांश शाळांचा निकाल लागला १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १३ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र दहावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल मंगळवारी १४ मे रोजी दुपारी एक वाजता लागला. दहावी परीक्षेत जिल्ह्याचा ९२.८३ टक्के निकाल लागला आहे. त्यात मुलांचा ९०.०४ टक्के तर मुलींचा ९६.१० टक्के निकाल लागला आहे. दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातून ६४ हजार ४५४ विद्यार्थ्यांपैकी ६३ हजार ८४९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ३४ हजार ४३२ मुले तर २९ हजार ४१७ मुली असे ६३ हजार ८४९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यामध्ये ३१ हजार ५ मुले तर २८ हजार २७२ मुली असे ५९ हजार २७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

मुलींचा उतीर्ण होण्याचा टक्का हा ९६.१० तर मुलांचा ९०.४ टक्के आहे. त्यामुळे उत्तीर्ण होण्यात मुलांपेक्षा मुली आघाडीवर असल्याने मुलींच्या उत्तीर्ण टक्केवारीत वाढ झाली आहे. ही परीक्षा जिल्ह्यातील १८२ केंद्रावर झाली होती. यासाठी जिल्ह्यात भरारी पथके आणि प्रत्येक केंद्रावर बैठे पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. जिल्हा प्रशासनाने कॉफीमुक्त अभियान यशस्वीपणे राबविल्याने निकालावर परीणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. बारावीचा निकाल कमी लागल्याने दहावीच्या निकालावरही परीणाम होणार असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र दहावीचा जिल्ह्याचा निकाल चांगला लागला असल्याने विद्यार्थ्यांनी पेढे वाटून जल्लोष केला.

जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण विभाग व पोलीस प्रशासनाने संयुक्त पथक तयार करून दहावी परीक्षा भयमुक्त व शांततेच्या वातावरणात होण्यासाठी प्रयत्न केला होता. कॉपीमुक्त अभियान राबविताना परीक्षा केंद्रावर ड्रोणद्वारे नजर ठेवणे, पर्यवेक्षकांच्या मोबाईलद्वारे ब्लॉकमधील प्रत्येक परीक्षार्थींवर नजर, संयुक्त बैठे पथकद्वारे नजर ठेवण्यात आली होती. परीक्षा केंद्रावरील घडामोडींवर जिल्हा कार्यालयातून लक्ष ठेवण्यात आले होते. त्यामुळे दहावीच्या निकालावर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती मात्र कॉपीमुक्त अभियानाचा निकालावर परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. कॉपीवर नियंत्रण मिळविण्यात प्रशासनाला यश आले असले तरी उत्तीर्ण निकाल अपेक्षेप्रमाणे चांगला लागला आहे.



**सोलापूर : शहरात मंगळवारी दुपारी दहावीचा निकाल जाहीर होताच दमाणी शाळेतल्या विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. (छायाचित्र केवल तिवारी)**

### ● तालुकानिहाय निकाल

- **अक्कलकोट :** ४,१७२ पैकी ३,५८३ विद्यार्थी उत्तीर्ण, ८१ टक्के निकाल
- **बार्शी :** ५,५६० पैकी ५,२४६ विद्यार्थी उत्तीर्ण, ९२.७६ टक्के निकाल
- **करमाळा :** ३,०६७ पैकी २,८७४ विद्यार्थी उत्तीर्ण, ९१.१३ टक्के निकाल
- **माढा :** ४,९८९ पैकी ४,६५४ विद्यार्थी उत्तीर्ण ९०.७६ टक्के निकाल
- **माळशिरस :** ६,७२५ पैकी ६,३५६ विद्यार्थी उत्तीर्ण, ९२.५६ टक्के निकाल
- **मंगळवेढा :** ३,२७७ पैकी ३,०६५ विद्यार्थी उत्तीर्ण, ९०.७२ टक्के निकाल
- **मोहोळ :** ४,०३५ पैकी ३,७७४ विद्यार्थी उत्तीर्ण, ९०.९६ टक्के निकाल
- **पंढरपूर :** ७,०७१ पैकी ६,५६९ विद्यार्थी उत्तीर्ण, ८९.८४ टक्के निकाल
- **सोलापूर शहर दक्षिण व उत्तर तालुका :** १९,८७९ पैकी १८,२९७ विद्यार्थी उत्तीर्ण, ८८.८२ टक्के निकाल
- **सांगोला :** ५०८४ पैकी ४८५९ विद्यार्थी उत्तीर्ण, ९३.३४ टक्के निकाल

## ▶▶ १०० टक्के निकाल

### शांती स्कूलचा १०० टक्के निकाल : श्रावणी कुलकर्णी प्रथम



दहावीच्या परिक्षेत विजापूर रोड येथील शांती इंग्लिश मिडियम स्कूलचा १०० टक्के निकाल लागला. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थाचालक सिध्देश्वर पाटील, प्राचार्य रजुला मॅक यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. शाळेतील प्रथम श्रावणी कुलकर्णी (९७.४० टक्के), द्वितीय श्रद्धा बोरळकर (९५.८० टक्के), तृतीय नमीरा मोमीन (९५.६० टक्के) क्रमांक मिळवून यश संपादन केले.



### ज्ञान प्रबोधिनी प्रशाला : श्रावणी काळे प्रथम

दहावी परीक्षेस ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेचे ७३ विद्यार्थी बसले होते. दरवर्षीची परंपरा राखत प्रशालेचा १०० टक्के निकाल लागला. श्रावणी काळे या विद्यार्थिनीने ९७.६० टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. यावेळी मुख्याध्यापिका प्रवीणा काळे, पर्यवेक्षिका उज्ज्वला अलकुंटे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. द्वितीय कपिल सावंत ९६.६० टक्के, तृतीय क्रमांक शुभम स्वामी, ९६.०० टक्के मिळवून यश संपादन केले. ९० टक्के पेक्षा अधिक गुण १९ विद्यार्थी, ८० ते ८९ टक्के, २४ विद्यार्थी, ७० ते ७९ टक्के १२ विद्यार्थी, ६० ते ६९ टक्के - १० विद्यार्थी, ५९ टक्केच्या आतील गुण ८ विद्यार्थी.

### युनिक स्कूल : सृष्टी घाडगे प्रथम

युनिक इंग्लिश मीडियम स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला. सृष्टी घाडगे या विद्यार्थिनीने ९६ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. इरेश शिरोळकर या विद्यार्थ्याला ९३.८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला तसेच. आदित्य फडतरे याने ९३.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. शाळेत ६८ विद्यार्थी बसले होते. एकूण पाच विद्यार्थी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून गुणवत्ता यादीतस्थान मिळाले. एकूण १९ विद्यार्थ्यांना ८० टक्के गुण प्राप्त झाले. त्याचप्रमाणे ७० टक्के गुण प्राप्त करून २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थापक अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेच्या सल्लागार अंजली तिवारी, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य डॉ. शुभदा उपासे, मुख्याध्यापिका पूजा वाजपेयी, विश्वस्त भीमाशंकर शेटे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### ट्विंकल स्कूल : सुमैय्या शेख प्रथम



दहावीच्या परीक्षेत ट्विंकल इंग्लिश मिडियम स्कूलचा १०० टक्के निकाल लागला आहे. यामध्ये प्रथम सुमैय्या शेख (९३ टक्के), द्वितीय सादशकील शेख (९१ टक्के), तृतीय जोहरा शेख (८९.८० टक्के) यांनी यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सफिया खान, संस्थापिका सदफ शेख यांनी अभिनंदन केले.

### मल्लिकार्जुन हायस्कूल : निकाल ९०.३४ टक्के

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचा निकाल ९०.३४ टक्के लागला असून या परीक्षेत १७६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह ६१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,५२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.प्रशालेत अनुक्रमे प्रथम ऐश्वर्या विभुते ९३.४०, द्वितीय प्रतिक्षा वरनाळ ९२.८० टक्के, तृतीय क्रमांक सुरज पवार ९२.६० टक्के गुण प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे, संस्थेचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, सचिव नागप्पा सिंदगी, प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे यांनी अभिनंदन केले.

### राजेभाई उर्दू हायस्कूल; जोया शेख प्रथम

राजेभाई उर्दू हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स येथील दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून प्रथम जोया शेख ८७ टक्के, द्वितीय बुशरा जकलेर ८०.४० टक्के, तृतीय सऊद शेख ७७.२० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष फैलअहमद इनामदार, उपाध्यक्षा तस्निमआरा शेख, मुख्याध्यापिका सबिहा पिरजादे यांनी अभिनंदन केले.

## आयएमएसचा निकाल १०० टक्के | २२५ विद्यार्थ्यांनी मिळवले ९० टक्के पेक्षा जास्त गुण

दहावी बोर्डच्या परीक्षेचा इंडियन मॉडेल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. मॉडेल पब्लिक स्कूलच्या केतकी कुलकर्णीने १०० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक मिळवला आहे.

इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई.) च्या शर्वरी ढाकणे हीने ९९ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. इंडियन मॉडेल स्कूल (स्टेटबोर्ड) च्या हर्षदा कोमटी या विद्यार्थिनीने ९९.६० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक मिळवला मॉडेल पब्लिक स्कूल मधून केतकी कुलकर्णी १०० टक्के गुण मिळवून प्रथम आलेली आहे. प्रशालेतून ११८ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ठ झाले. सलग १४ व्या वर्षी या शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. एकूण २८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. वरुण मंगरुळे ९७.६० टक्के मिळवून प्रशालेतून द्वितीय आलेला आहे. तसेच अनुष्का घोडके ९६ टक्के घेवून प्रशालेतून तृतीय आलेली आहे. समाजशास्त्र विषयामध्ये केतकी कुलकर्णी व वरुण मंगरुळे यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई.) मधून शर्वरी ढाकणे ९९.०० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम आलेली आहे. प्रशालेतील ५८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले व १८ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. अनिमेश चव्हाण ९८.०६ टक्के गुण मिळवून प्रशालेतून द्वितीय आलेला आहे व समृध्दी हाके, आर्यन पाटील ९८.०२ टक्के घेवून तृतीय आलेले आहेत. मराठी विषयात ११ विद्यार्थ्यांनी, इंग्रजी विषयात ५ विद्यार्थ्यांनी, विज्ञान व तंत्रज्ञान विषयात २ विद्यार्थ्यांनी, हिंदी विषयात २ विद्यार्थ्यांनी, गणित विषयात १ विद्यार्थ्याने तसेच समाजशास्त्र विषयात २ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले. इंडियन मॉडेल स्कूल (स्टेट बोर्ड) मधून ८२ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवत उत्तम यश प्राप्त केले आहे. यातील ३२ विद्यार्थ्यांना ९५ टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत. हर्षदा रमेश कोमटी या विद्यार्थिनीने ९९.६०% गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर ऐश्वर्या कोमटी ९९.२० टक्के, आभा मलजी ९९ टक्के या विद्यार्थ्यांनी शाळेत अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला आहे. सहर्ष पंपट, आत्मन कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी गणित विषयामध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. तर श्रेया पवार या विद्यार्थिनीने समाजशास्त्र या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. आत्मन कुलकर्णी याने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. शाळेबरोबरच स्वामी विवेकानंद पोलिस पब्लिक स्कूल या शाळेचा देखील १०० टक्के निकाल लागलेला आहे. प्रशालेतून एकूण ९१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले. २३ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले.



एकूण ७ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. साई यल्ला ९७.२० टक्के घेऊन प्रशालेतून प्रथम आलेला आहे. तर इरम सबा शेख ९७ टक्के व अंकिता वाघमारे ९६.८० टक्के घेऊन प्रशालेतून अनुक्रमे द्वितीय व तृतीय आलेले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान या विषयात इरम सबा शेख हीने १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.



## अरिहंत स्कूल : वैष्णवी दुध्याल प्रथम

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत घवघवीत यश मिळवत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. जुना विडी घरकुल रेब्बानगर येथील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलच्या २०२४-२५ चा माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला. गेली ७ वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. परीक्षेस ९० विद्यार्थी प्रविष्ट होते. वैष्णवी दुध्याल ८८.६० टक्के मिळून प्रथम रोहन महेश्वर ८७.६० टक्के मिळवून द्वितीय तर नैतिक धुळम ८६.६० टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, ज्योती आडम, पर्यवेक्षिका रजनी सग्गम, रुपाली निकते, चन्नेश इंडी यांनी अभिनंदन केले.



## कुचन प्रशालेचे घवघवीत यश

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशालेचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश. प्रशालेचा दहावी बोर्ड परीक्षेत मराठी व सेमी माध्यमाचा निकाल ८६.३७ टक्के नोंदवला आहे तर तेलुगू माध्यमाचा १०० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेसाठी २७९ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी २४१ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. प्रशालेचा वडनाल चेतन बालाजी याने ९३.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला तर श्रीराम निकिता दत्तात्रय हिने ८८.६० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला. पोदिली मीनाक्षी रविशंकर हिने ८६.२० टक्के गुण मिळवत प्रशालेत तिसरा तर तेलगू माध्यमातून पहिला क्रमांक पटकावला. तर तेलुगू माध्यमातून रतल्लू बालाजी रामू याने ८२.६० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला. तर भीमनाथ विजयालक्ष्मी बालाजी हिने ८०.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम व शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, प्राचार्य युवराज मेटे व उपप्राचार्य अनिल निंबाळकर उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जून जोकारे यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक अशोक सरगम, अशिष मिसाळ, अश्विनी म्हैसूर, बसवराज हिटनळी, शुभांगी माने, प्रतिभा इराबत्ती, राहूल ताटे व बाळासाहेब गंभीरे उपस्थित होते

## सेवासदन प्रशाला ९८.९२ टक्के

● **मानसी चवरेला संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत परीक्षेत पुणे सेवासदन संस्था, शाखा सोलापूर संचलित सुरजाबाई रामलाल मुलींची सेवासदन प्रशाला या शाळेचा निकाल ९८.९२ टक्के इतका लागला आहे शाळेतील विद्यार्थिनी मानसी गणेश चवरे हिला संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.

परीक्षेला २७८ विद्यार्थिनी बसल्या होत्या त्यापैकी २७५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. विशेष प्राविण्य ८२, प्रथम श्रेणी १०६, द्वितीय श्रेणी ७१, तृतीय श्रेणीत १६ आल्या आहेत. सेमी इंग्रजीमध्ये प्रशालेतील प्रथम पाच विद्यार्थिनी मानसी चवरे ९७, वैदेही गायकवाड ९६.४०, तब्बसुम पटेल ९३.८०, स्नेहा पवार ९२.८०, तर श्रीषा पाटील ९२.६०, उत्तीर्ण झाले आहेत. मराठी माध्यमातील पहिल्या पाच विद्यार्थिनी : राजनंदिनी खुर्द ८९.२०, संस्कृती वाघमोडे ८१.६०, गौरी वराडे ८०.२०, सिफारा अस्लम नदाफ ७९.८०, शिल्पा मदभावी ७६.८० उत्तीर्ण झाले आहेत तसेच ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थिनी मानसी चवरे, वैदेही गायकवाड, श्रीषा पाटील, श्रद्धा पाटील, स्नेहल निकम, साक्षी राठोड, तब्बसुम पटेल, स्नेहा पवार. या सर्व विद्यार्थिनींना शाळेच्या मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नलिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांच्यासह इयत्ता दहावीला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. शाळेच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा शिला मिस्त्री, उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सचिव विणा पतकी, शालेय समितीच्या अध्यक्षा विद्या लिमये यांनी अभिनंदन केले.

## ठोकळ प्रशाला : तनिष्का वाघमारे प्रथम

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०) फेब्रु/मार्च २०२५ चा निकाल १०० टक्के लागला आहे. तनिष्का गंगाधर वाघमारे ही ९४.६० टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम आली. संस्कृती रेवणसिद्ध जाधव(९४.४०टक्के) व प्रज्ञा प्रमोद साळुंखे हिने (९३.०० टक्के) हे अनुक्रमे द्वितीय व तृतीय आले. परीक्षेस प्रशालेतील १६१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. पैकी ८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. त्यात समर्थ माने ९२.२० टक्के, आदिती खताळ ९२.२०, मो. युसूफ शकील सय्यद ९२.००, भक्ती कोरे ९०:४०, साक्षी भोसले ९०:२० यांचा समावेश आहे.



तर एकूण १०७ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले असून ५२ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विषय निहाय निकालात मराठी विषयात समर्थ माने ९०, हिंदी विषयात मुजावर अल्तजीम ९०, संस्कृत विषयात संस्कृती जाधव ८९, इंग्रजी विषयात तनिष्का वाघमारे ९३, गणित विषयामध्ये तनिष्का वाघमारे व समर्थ माने यांना प्रत्येकी ९७ गुण, विज्ञान विषयात संस्कृती जाधव ९६, समाजशास्त्र विषयात आदिती खताळ, समर्थ माने, प्रज्ञा साळुंके, वैष्णवी गायकवाड व अर्पिता अंबाडे यांना प्रत्येकी ९७ गुण मिळाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्षा निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ, प्राचार्य डी. डी. गाजरे, पर्यवेक्षिका ए.आर.भोसले आदींनी अभिनंदन केले.

## मेहता शाळेचा निकाल १०० टक्के : सुमित तकडे प्रथम

**तनिष्का कुंभार , प्रणिती म्हेत्रे द्वितीय तर पूर्वा पुजारी तृतीय**

जुळे सोलापूर येथील कै. वि. मो. मेहता शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. सुमित तकडे याने ९८.६० टक्के मिळवून प्रशालेत प्रथम येण्याचा मान मिळवला. तनिष्का कुंभारेने ९७.४० टक्के, प्रणिती म्हेत्रे ९७.४० टक्के गुण मिळवून द्वितीय तर पूर्वा पुजारी हिने ९७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

एकूण प्रविष्ट विद्यार्थी १५१ पैकी १२० विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य प्राप्त झाले. यापैकी ९५ टक्के पेक्षा अधिक १२ विद्यार्थी, ९० ते ९५ टक्के -३२ विद्यार्थी, ७५ ते ८९ टक्के- ७६ विद्यार्थी, ६० ते ७४ टक्के २९ विद्यार्थी, ६० टक्के पेक्षा कमी दोन विद्यार्थी. संस्कृतमध्ये २ विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले तर २० विद्यार्थ्यांनी ९९ गुण मिळवले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, व सर्व शिक्षक-शिक्षकेतरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## ग्लोबल व्हिलेज स्कूल : आदित्य नारायणकर प्रथम

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेजचा सलग पाचव्या वर्षी इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. अजिंक्य कलशेट्टीने ९४ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांकासह घवघवीत यश मिळवले.

आदित्य नारायणकर याने ८५.६० टक्के मिळवून द्वितीय तर श्रुती खेडगी व प्रतीक्षा भोसले या विद्यार्थिनीने ८४.४० टक्के गुण मिळवून विभागून तृतीय क्रमांक प्राप्त केले. या परीक्षेत ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल मधून २१ विद्यार्थी परीक्षेस सामोरे गेले आणि सर्व २१ विद्यार्थी उत्तीर्ण होत सलग पाचव्या वर्षी शंभर टक्के निकाल लावण्यात यशस्वी ठरले आहे. विद्यार्थ्यांना प्राचार्या आसमा नदाफ, मल्लिनाथ जळकोटे, प्रा. राहुल काळे, प्रा. प्रदिप राठोड प्रा. निलोफर सय्यद प्रा. प्रियंका माने आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगीता शहा व शैक्षणिक समन्वयक प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी अभिनंदन केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# यंदा साडेचार लाख पाठ्यपुस्तकांची मागणी

## खासगी अनुदानित व मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांना बालभारतीकडून पहिल्याच दिवशी वितरीत होणार पाठ्यपुस्तके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मे-**

नवीन शैक्षणिक वर्षांसाठी बालभारती पोर्टलवर सोलापूर शहरातील खासगी अनुदानित आणि सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या वतीने ४,४०,५८१ पाठ्यपुस्तकांची मागणी करण्यात आली आहे. सदरची पुस्तके लवकरच प्राप्त होणार असल्याचे बालभारतीच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, दरवर्षी प्रशासनाच्या वतीने शहरातील खाजगी अनुदानित तसेच महापालिका व झेडपी अशा सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांची योजना राबवली जाते. सदरच्या योजनेमध्ये मराठी, उर्दू, कन्नड, तेलगू, हिंदी, इंग्रजी अशा माध्यमांची पुस्तके मागविली जातात. इयत्ता पहिलीपासून ते इयत्ता आठवी पर्यंतची पुस्तके शासनाकडून प्राप्त होत असतात. मे महिन्यामध्ये सदरचा अहवाल बालभारतीकडे पाठवण्यात आला असून, यासंबंधी बालभारतीने बैठक आयोजित केल्याचे सांगण्यात आले आहे. या बैठकीनंतर सदरची पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात येणार आहेत. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षात राबवण्यात येणार आहे. राज्यातील विद्यार्थ्यांसाठी (सी.बी.एस.सी) केंद्रीय अभ्यासक्रम पद्धती या शैक्षणिक वर्षात लागू करण्यात येणार आहे. त्यासंबंधी देखील पाठ्यपुस्तकांचे कामकाज सुरू आहे. असे देखील यावेळी सांगण्यात आले आहे.

**मनपा सोलापूर सन २०२५ - २६ शैक्षणिक वर्षांतर्गत इ.१ ली ते ८ वी पर्यंत बालभारती पोर्टलवर पाठ्यपुस्तकांची केलेल्या मागणीचा तक्ता**

| माध्यम | विद्यार्थी | पाठ्यपुस्तक प्रती |
|---|---|---|
| मराठी | ५९२६१ | ३,४९,०८८ |
| उर्दू | ११११९५ | ७६,५६६ |
| कन्नड | ९३९ | ६,३८९ |
| तेलुगू | ९५ | ६३७ |
| हिंदी | २०५ | १,२७५ |
| इंग्रजी | ९७५ | ६,६२६ |
| **एकूण** | **७२,७७०** | **४,४०,५८१** |

### बालभारतीकडून प्राप्त होणार पाठ्यपुस्तके

सोलापूर शहरातील मनपा अखत्यारीत येणाऱ्या खासगी अनुदानित व सरकारी शाळेतील विविध माध्यमांच्या एकूण ७२,६७० इतक्या विद्यार्थ्यांसाठी लवकरच ४,४०,५८१ इतके पुस्तकांच्याप्रती प्राप्त होणार आहेत. त्यासाठी बालभारतीच्या वतीने बैठक आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलण्यात आल्याने, पहिलीची पाठ्यपुस्तके वितरणासंबंधी पुढील माहिती प्राप्त होणार आहे.

**- रियाज आत्तार, समन्वयक बालभारती**



## ज्ञानामृत आनंदलहरी - १११५

**संेंदराचे दैवत केलें ।**
**नवस बोलें तयासी ।।**

कर्तव्यापेक्षा नशिबावर भर देणाऱ्यांची संख्या जास्त आहे. कसल्याही प्रकारचे कष्ट न करता सहजासहजी इच्छित प्राप्त व्हावे म्हणून अनेकजण नको त्या मार्गाचा अवलंब करतात. कर्तव्य म्हणजेच ईश्वर हे संतवचन अनेकांना पटत नाही. दे रे देवा पलंगावरी ही वृत्ती जोपासणारे अनेक लोक समाजात आहेत. म्हणूनच दैनंदीन देव-देवतांची संख्या वाढत चालल्याचे पहायला मिळते. खरा भगवंत हा प्राणीमात्रातच भरलेला असल्याने त्यांची सेवा हीच ईश्वर सेवा होय. हे जरी सत्य असले तरीही जिवांना लाथाडून दगडा-धोंडयाची पूजा केली जाते. दगडाला शेंदूर फासून त्या शेंदरी दगडाला देवी-देवतांची नांवे दिली जातात. या दगडासमोर मनाला वाटतील त्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी नवस बोलले जातात. योगायोगाने मनातील इच्छा पूर्ण झाली तर नवसाची पूर्तता केली जाते. दगडा-धोंड्यांना शेंदूर फासून किंवा त्यावर कपडा झाकून त्याला दैवत करणे, आणि त्याच्यासमोर नवस फेडणे, हा केवळ वेडेपणा आहे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, सेंदराचे दैवत केलें । नवस बोलें तयासी ।।



दगडा-धोंडयांना शेंदूर लावणाऱ्यांमध्ये किंवा दगडा-धोंडयावर विविध रंगाचे कपडे टाकून त्याला दैवत करणाऱ्यांमध्ये केवळ अज्ञानी लोकांचाच समावेश असतो असे नव्हे, तर मोठया प्रमाणावर शिक्षितांचाही समावेश असतो. आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य पार पाडण्याचे सोडून असा वेडेपण करणारे लोक अनेकांच्या मनात त्या दगडा-धोंडयाबददल जागृतपणाच्या भावना निर्माण करतात. त्यामुळे अशा दगडा-धोंडयाची पूजा करणाऱ्यांची संख्या वाढत जाते. अनेकांना कष्ट करावेच वाटत नाहीत. त्यामुळे विना कष्ट इच्छित प्राप्त होईल, या अपेक्षेपोटी नवस बोलून दगडा-धोंडयाकडून इच्छेच्या पूर्तीची अपेक्षा केली जाते. संत-महात्म्यांना नशिबावर विसंबून राहणे मान्य नाही. आपले नशिब आपणच आपल्या कर्तव्यातून घडवायचे असते. कर्तव्यापेक्षा नशिबावर भर देणारे लोक समाजात आहेत. म्हणूनच सार्वजनिक रस्त्याच्या कडेला किंवा मध्यभागी ज्या मोकळया जागा असतील त्या जागा दगडा-धोंडयांना शेंदूर लावून किंवा त्यावर कपडा टाकून बळकावल्या जात आहेत. सार्वजनिक उपयोग होण्याऐवजी त्या जागा धार्मिक कार्यासाठी अडकावल्या जात आहेत. रहदारीला अडथळा होत आहे, याचा विचार केला पाहीजे. अशा दगडा-धोंडयावर रहदारीमुळे धूळ जमा झाली तरी कोणी त्याकडे लक्ष देत नाही किंवा पाहात नाही. फक्त धर्मांधतेमुळे त्या जागा तशाच अडकवून ठेवण्यात त्या-त्या समाजातील लोकांना आनंद वाटतो. विज्ञान युगात मानव चंद्रावर गेला असला तरी अद्यापही अशा दगडा-धोंडयापासून मात्र तो दूर गेलेला नाही. अनेक जिवांचे बळीही अशा देव-देवतांसमोर दिले जातात. अशा अंधश्रध्दाळु लोकांकडे पाहिले म्हणजे यांना संत ज्ञानोबा-तुकाराम समजलेच नाहीत, याची खंत वाटते. असो, भगवंत हा दगडा-धोंडयात नसून तो सर्वांच्या ह्रदयात आहे, हे याप्रसंगी लक्षात ठेवावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# निवासी कला-संस्कार शिबिरात ४० बालकलाकारांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. १३ मे-**

जीवनांत संस्काराचे खूप महत्त्व आहे. संस्काराशिवाय जीवन शून्य असते. संस्कारच मनुष्याला श्रेष्ठ बनवितात, उत्तम आकार देतात, याचाच विचार करुन संस्कारा सोबत विविध कलांनी बालकांची सृजनशीलता वाढविण्याकरिता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्नित असलेल्या बालरंगभूमी परिषदेच्या वतीने कोल्हापूर येथील कणेरी मठात तीन दिवसांचे दोन टप्प्यात निवासी कला-संस्कार शिबिर झाले.



यात सोलापूर जिल्ह्यातून ४० बालकलाकार सहभागी झाले होते. या शिबिरात बालरंग भूमी परिषद सोलापूर शाखेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांच्यासह उपाध्यक्ष खंडू शिंदे, कार्यकारणी सदस्य अन्नपूर्णा साखरे, सदस्य शोभा गिराम, संगीता गायकवाड, उज्वला पताळे, गणेश कोळी, यांच्यासह पालकही या शिबिरात सहभागी झाले होते. या कलासंस्कार शिबिराच्या माध्यमातून बालकांची बुद्धिमत्ता आणि मानसिकता वाढविण्यावर भर देण्यात आला यासोबतच मुलांचे भावविश्व, त्यांचा सामाजिक आणि शैक्षणिक विकास यासह विविध विषयांवर पालकांसाठी कृतीरुप कार्यशाळा झाली. यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या राज्याच्या अध्यक्षा अँड. निलम शिर्के- सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर पार पडले. शिबिरासाठी सोलापूर शहर आणि जिल्हा जिल्ह्यासह बाल रंगभूमीच्या २८ शाखांमधील नऊ ते पंधरा वयोगटातील बालकांनी सहभाग घेतला. सर्व शिबिरार्थींना तेजा पाठक, नागसेन पेंढारकर, सुजय भालेराव, महेश मांजरेकर, वैदेही चौरे-सोईतकर, तेजा पाठक-बर्वे, राजू तुलालवार, देवीप्रसाद सोहनी, आसेफ अन्सारी, निरंजन सागवेकर, महेश सोनुले, सौ सोनुले, दीपाली शेळके, प्रकाश पारखी, योगेश शुक्ल, आदिती मेराणकर, नंदकिशोर जुवेकर, अनंत जोशी, त्र्यंबक वडस्कर, आदी प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.



# भगवंत सोसायटी शाळेच्या माजी विद्यार्थी व शिक्षकांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे यांच्या सुंदरम नगर येथील नु. म. वि. आणि पूर्वीच्या आय.टी.आय. समोरील भगवंत सोसायटी शाळेतील (सध्याची मेहता शाळा) १९९२ ते १९९८ या कालखंडातील माजी विद्यार्थी व शिक्षकांचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी मुख्याध्यापिका लिमये, शिंदे, भातवडेकर, जेधे, वडगावकर, कुगावकर, भुरटे, देशमुख तसेच धनंजय काका आणि बेलाटीकर काका यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात ३२ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. शाळेतील गोड आठवणींना उजाळा देताना उपस्थित सर्वजण भावूक झाले. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना पाहून अत्यंत समाधान व्यक्त केले आणि त्यांना उत्तम नागरिक व व्यक्ती होण्याचे तसेच देश व समाजाप्रती आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचे मार्गदर्शन दिले. पहिल्यांदाच असा स्नेहमेळावा झाल्याने अनेक शिक्षक गहिवरले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - शुभ दिवस, |
| दि. १४ मे २०२५ | छ. संभाजी राजे जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | वृषभ संक्राती |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वितीया (२६.२९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अनुराधा (११.४६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (०६.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१३.३४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ** : जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क** : आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलते मुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील.

**सिंह** : आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील.

**कन्या** : धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ** : आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक** : सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु** : आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा.

**मकर** : घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे.

**कुंभ** : उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन** : आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.



# वाहतूक संघटना पालिका निवडणूक स्वबळावर लढणार

## प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

चालकांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने आगामी महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची घोषणा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केली.

चालकांच्या विविध समस्यांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ राज्यभरात ज्या ज्या ठिकाणी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी महानगरपालिका निवडणुका लढवणार आहे. तसेच सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे वीस उमेदवार उभे करणार असल्याचा निर्धारही रियाज सय्यद यांनी केला आहे. प्रारंभी भारत पाकिस्तान युद्धात शहीद झालेल्या जवानांना आणि नागरिकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेश महासचिव प्रदीप शिंगे यांनी प्रास्तावित केले. याप्रसंगी मंचावर रियाज सय्यद, लाडजी नदाफ, हजरत शेख, अल्लाहबाक्ष शेख, देविदास कोळी, इलियास सिद्दीकी, सिदगणे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन महासचिव प्रदीप शिंगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदीप शिंगे, इरफान कल्याणी, इम्रान शेख, तुफान शेख, अकील शेख,नागेश वाघमारे,शंकर राऊत, मिन्हाज बागवान, कलीम हुंडेकरी, रमेश बनसोडे, गौस शेख, आसिफ शेख, फयाज काझी, फिरोज तांबोळी, खाजा अमीन पटेल, अलीशेर पटेल, मल्हार शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

# वधू-वर परिचय मेळावा काळाची गरज

## प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार; भावसार समाजाचा वधू-वर मेळावा

**सोलापूर, दि. १३ मे-**

आजच्या धकाधकीच्या जीवनात इच्छुक मुला-मुलींचे विवाह लवकर न जुळणे, ही फार मोठी सामाजिक समस्या बनली आहे. ही समस्या ओळखून पालकांनी सजग राहणे व वेळेवर निर्णय घेऊन आपल्या मुला-मुलींच्या सुखी सांसारिक जीवना सुरुवात करावी. वधू-वर परिचय मेळावा काळाची गरज बनली आहे. असे प्रतिपादन वालचंद महाविद्यालयाचे निवृत्त प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले.



भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संस्थेमार्फत श्री हिंगुलांबिका सांस्कृतिक भवन, गणेश पेठ येथे वधू-वर पालक परिचय मेळावा उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर भावसार क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष राजकुमार हंचाटे होते, श्री हिंगुलांबिका देवी देवालयचे ट्रैस्टी अध्यक्ष किशोर कटारे यांच्या हस्ते हिंगुलांबिका देवी प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रस्ताविक खजिनदार रविंद्र खमितकर यांनी केले. त्यानंतर पाहुण्यांचा सत्कार अध्यक्ष प्रकाश जवळकर व सचिव अरुण आकुडे यांच्या हस्ते भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांना लकी ड्रॉच्या माध्यमातून १० पैठणी देण्यात आले. सूत्रसंचालन व आभार कार्याध्यक्ष शशिकांत रंगदळ यांनी केले.

वधू-वर पालक परिचय सुसंवादाची सुरुवात होण्यापूर्वी सुशांत अंबुरे यांच्या गणेश वंदनाने सुमधुर बासरी वादनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वधू-वर व पालक यांचा परिचय करुन देण्यासाठी शोभा अंबुरे, शितल रणसुभे, प्रणिता महिंद्रकर व स्मिता क्षीरसागर, शोभा आकुडे यांचे सहकार्य लाभले. मेळावा यशस्वी करण्यासाठी सुभाष पाखरे, राजेंद्र मिरजकर, रविंद्र आकुडे, सुदाम पिसे, श्रीकांत अंबुरे, सुधाकर कटारे, शाम क्षीरसागर, संतोष आकुडे, सतिश हिबारे, प्रदीप आकुडे, प्रमोद हंचाटे, विद्याधर रंगदळ, दिपक महिंद्रकर, बाळकृष्ण पतंगे, उल्हास डोईजोडे, आदींनी परिश्रम घेतले. यावेळी किरण क्षीरसागर, नितीन अंबुरे व दत्तात्रय पुकाळे, प्रकाश कटारे, गिरीश माळवदकर, सुनिल डोईजोडे, सूर्यकांत खमितकर, पुजारी संजय हंचाटे, यल्लप्पा महिंद्रकर, विशाल खमितकर, आशिष जवळकर, मल्लिनाथ बासुतकर, रवि वायचळ आदींची उपस्थिती होती.

# महापालिकेच्या जागांवर होणार सफाई कामगारांची घरे

## बीओटी प्रणाली अंतर्गत ५०० घरांच्या प्रक्रियेला गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

सोलापूर शहरात महापालिकेच्या जागांवर सफाई कामगारांची घरे होणार आहेत. बीओटी प्रणाली अंतर्गत ५०० घरांच्या प्रक्रियेला गती आली आहे. या योजनेबाबत अभिप्राय, मते मागविण्यात आली आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेतील सफाई कामगारांना घरे बांधून देण्यात यावीत अशी मागणी होत असताना महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जागांवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत (पीएमएवाय) घरे बांधण्याचा प्रस्ताव यापूर्वी तयार करण्यात आला होता त्याच्यावर कार्यवाही देखील सुरू होती मात्र आता सफाई कामगारांसाठी बीओटी प्रणाली अंतर्गत ही घरे उभारण्या संदर्भातील प्रक्रिया महापालिकेच्या प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे.

शहरात सध्या विविध ठिकाणी एजन्सी मार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत वसाहती उभारण्यात येत आहेत यामध्ये सुमारे ३० हजार घरांचा प्रकल्प सुरू आहे. या मधूनच महापालिकेच्या सफाई कामगारांना घरांचे प्रकल्प उभारण्यात येणार होते. मात्र प्रशासनाने यासाठीचा आपला निर्णय बदलला आहे.

सोलापूर शहरात विविध ठिकाणी बीओटी प्रणाली अंतर्गत (बांधा-वापरा-हस्तांतर करा) व्यापारी संकुल आणि परवडणारी घरे उभारण्याचे व्यावसायिक विकास तसेच नागरिकांची मते जाणून घेण्याबाबत महापालिका प्रशासनाच्या वतीने नगर अभियंता कार्यालयामार्फत जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात आले आहे. यानुसार महापालिकेच्या मालकीच्या जागेत उत्पन्न वाढीच्या दृष्टिकोनातून विविध ठिकाणी बीओटी प्रणाली अंतर्गत व्यापारी संकुल आणि परवडणारी घरे उभारण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहरातील विविध सहा भागात व्यापारी संकुल उभारण्या बरोबरच शहरातील विविध तीन ठिकाणी परवडणारी घरे उभारण्यात येणार आहेत. यानुसार शहरातील सात रस्ता येथील शासकीय मालकीच्या असलेल्या २ एकर १४ गुंठे इतक्या भूखंडावर महापालिकेच्या सफाई कामगारांसाठी बीओटी अंतर्गत २५३ सदनिका बांधण्याचा प्रस्ताव आहे.

याच अनुषंगाने दि. ११ मे रोजी महापालिकेच्या स्थायी समिती सभागृह येथे संबंधित योजनांचे सल्लागार आर्किटेक्ट एजन्सी कन्सल्टंट यांच्यामार्फत सादरीकरण करण्यात आले. व्यावसायिक विकास तसेच शहरातील नागरिकांनी उपस्थित राहून प्रस्तुत योजनांबाबत अभिप्राय सुधारणा व मते या बैठकीत जाणून घेण्यात आली.

आता नागरिकांसाठी गुरुवार, दि. १४ मे रोजी पर्यंत यावर महापालिकेच्या cityengg.smcgmail.com ईमेल आयडीवर अथवा नगरा अभियंता कार्यालय सोलापूर महापालिका या कार्यालयाकडे नागरिकांनी आपले अभिप्राय सुधारणा व मते सादर करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे. यानंतर मात्र महापालिका प्रशासनाकडून पुढील प्रक्रिया करण्यात येऊन लवकरात लवकर महापालिकेच्या सफाई कामगारांना बीओटी अंतर्गत घरे बांधण्याची कार्यवाही होणार आहे.

### या ठिकाणी उभारणार प्रकल्प

बुधवार पेठ येथील महापालिका मालकीच्या भूखंडावर महापालिकेच्या सफाई कामगारांसाठी बीओटी अंतर्गत सदनिका बांधणे आणि रविवार पेठ परिसरातील २५६ गाळा येथे महापालिकेच्या जागेवर महापालिकेच्या कामगारांसाठीच बीओटी अंतर्गत सदनिका बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्यात आला असून पुढील प्रक्रिया राबविण्यापूर्वी यासंदर्भात नागरिकांची मते जाणून घेणे महत्त्वाचे असल्याने यासाठी जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात आले.

## महत्वाचे...

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचा निकाल ९६.१७ टक्के

**पिलीव, दि.१३ मे -**
पिलीव (ता.माळशिरस) येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाचा मार्च २०२५ मध्ये घेणयात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल ९६.१७ टक्के लागला आहे. यामध्ये २०९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २०१ विदयार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये पुन्हा एकदा मुलींनीच बाजी मारली आहे. प्रथम क्रमांक शौर्या सोमनाथ बुगड हि ९४.२० टक्के गुण घेऊन प्रथम, अल्वीया असिम तांबोळी ( ९४ टक्के) द्वितीय तर रुतुजा दिलीप गायकवाड (९२.८० टक्के) तृतीय आली. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पर्यवेक्षक, स्थानिक स्कूल कमीटी सदस्य, शिक्षक-पालक संघ, तसेच पिलीव परीसरातील शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

### श्री बाळेश्वर विद्यालयाचे दहावी परीक्षेत यश

**अणदूर :** बाळेश्वर विद्यालय बारुळ, (ता. तुळजापूर) येथील इ.१० वी चा निकाल आज (१३ मे) परीक्षा मंडळाकडून लागला. विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा जपली आहे. शाळेतून प्रथम येण्याचा मान कुमारी लोखंडे श्रीदेवी बालाजी ८४.४० टक्के, व्दितीय कुमारी वट्टे रेणुका योगेश ८२.६० टक्के,तृतीय-कुमारी ठोंबरे सलोनी सुनिल ८०.८०% , शाळेचा एकूण निकाल, ९६.९७ टक्के असा लागला असुन,सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे,संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, संस्थेचे मार्गदर्शक ड लक्ष्मीकांत पाटील,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबुराव ठोंबरे,मुख्याध्यापक मंगेश अणदूरकर व ग्रामस्थ यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे विशेष अभिनंदन केले आहे.



### अणदूरच्या श्री श्री गुरुकुलची प्रणौती जत्ते केंद्रात प्रथम; शुभांगी ढाले केंद्रात द्वितीय

**अणदूर, दि.१३ मे-**
तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल या शाळेतील विद्यार्थ्यांनी मागील ७ वर्षाची यशाची परंपरा कायम राखीत याहीवर्षी दहावी शालांत परीक्षेमध्ये शाळेतील ३३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.सर्वच विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. यात कु.जत्ते प्रणौती नागनाथ (१०० टक्के ) गुण मिळवित केंद्रात प्रथम तर कु.ढाले शुभांगी नागेश (९९.४० टक्के) गुण मिळवित केंद्रात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. ११ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले असून, १३ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवलेत तर ९ विद्यार्थ्यांनी ७०टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे, सचिव डॉ. नागनाथ कुंभार, संचालिका डॉ. रूपाली कानडे, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, मुख्याध्यापक शिवराज भुजबळ यांनी अभिनंदन केले आहे.

### दत्तू पाटील विद्यालयाचा निकाल ९७ टक्के

**अणदूर, दि.१३ मे-**
चिवरी (ता. तुळजापूर) येथील दत्तू पाटील (आण्णा) माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९७ टक्के लागला आहे. प्रथम क्रमांक कच्छवा प्रगती राजू सिंग ८९.४०% द्वितीय क्रमांक झांबरे प्रगती कृष्णा ८३.२० टक्के, तृतीय क्रमांक स्वामी कार्तिकी निळकंठ ८१.६० टक्के, या सर्व मुलींनी बाजी मारली असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटराव पाटील, कार्याध्यक्षा मनीषा पाटील, सदस्य प्रतीक पाटील, मुख्याध्यापिका लक्ष्मी बिराजदार यांनी अभिनंदन केले आहे, पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### अक्कलकोट तालुक्याचा दहावीचा निकाल ८५.८८ टक्के

**अक्कलकोट दि १३ मे-**
मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परिक्षेचा अक्कलकोट तालुक्याचा निकल ८५.८८ टक्के लागला. यंदा कॉपीमुक्त तालुका अभियान राबविताना गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे यांनी अनेकांचा दबाव झुगारत अंत्यत काटेकोरपणे यंत्रणा राबविली. गुणवंत विद्यार्थ्यांना बळ प्रोत्साहन मिळत असल्याने पालक वर्गातुन समाधान व्यक्त होत आहे. तालुक्यात यंदा दहावी परिक्षेकरिता ४ हजार २३५ मुले प्रविष्ठ होती यापैकी ४ हजार १७२ विद्यार्थ्यानी परिक्षा दिली . ३ हजार ५८३ विदयार्थी पास झाले . यामध्ये मुले पास होण्याचे प्रमाण ८१.०१ टक्के तर मुलीचे प्रमाण ९१.५७ टक्के आहे.

### तुळशीदास जाधव प्रशालेचा दहावीचा निकाल १०० टक्के

**वैराग, दि. १३ मे-**
तुळशीदास जाधव माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये प्रविष्ट विद्यार्थी ११४ होते २२ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेतले असून विशेष प्राविण्य मिळवणारे विद्यार्थी ६९ आहेत. अथर्व शिंदे ९७ टक्के, श्रीराम पाटील ९७ टक्के, संस्कार पाटील ९६. ८० टक्के , आर्यन भोसले ९६ ४० टक्के, शर्वरी जाधव ९६. २० टक्के, ईश्वरी बुरगुटे ९५.६० टक्के. गोविंद यादव ९५. टक्के दुर्गा मुळे ९४.४० टक्के, सुहास काळे ९४.४० टक्के, वैष्णवी वाघ ९४.२० टक्के, कृष्णा माने ९४ टक्के, सानवी कानडे ९३. ८० टक्के, प्रणित गव्हाणे ९३.६० टक्के अक्षरा खरटमोल ९३.४० टक्के, श्रेयश चापले ९२.८० टक्के. अनुष्का शेळके ९२.८० टक्के, अंतरा पौळ ९२०.४० टक्के, प्रीतम खताळ ९२ टक्के, मृणाली डोईफोडे ९१ ४० टक्के, गायत्री वाघमारे ९१ टक्के, साई ठोकळ ९१ टक्के प्रथमेश पाटील ९०.६० टक्के. सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री व्ही. बी. पिसाळ, जनरल सेक्रेटरी एस. एन. गडसिंग, उपाध्यक्ष प्रमोद जगताप, जॉईंट सेक्रेटरी हेमंत बापू गडसिंग, संचालक मिरगणे, आगलावे, पाटील व संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच प्रशालेचे प्राचार्य सतीश चव्हाण, पर्यवेक्षक इंगळे, उच्च माध्यमिक विभागप्रमुख प्रा. एम. डी. जाधव यांनी अभिनंदन केले.

# मराठा सेवा संघाची जुलैमध्ये होणार पुनर्बांधणी

### अधिवेशन समारोपात संस्थापक खेडेकर यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१३ मे-**
जुन्या रुढी परंपरांची बंधने तोडून शिक्षणाची कास धरलेल्या महिला चंद्रावर गेल्या तर तीच बंधने सांभाळत बसणारी डोंगरावरच राहिल्याचे सांगत मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांनी येत्या जुलै मध्ये संघातील नव्या जुन्याची मोट बांधून संघाची पुनर्बांधणी करणार असल्याचे जाहीर केले.

याचवेळी अधिवेशनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात सहकार महर्षि साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. येथील स्मृतीभवन मध्ये दिनांक १० मे पासून म्हणजे गेली ३ दिवसांपासून मराठा सेवा संघाचे ३० वे राज्यस्तरीय अधिवेशन सुरू होते. यामध्ये अनेक वक्त्यांची विविध विषयांवर व्याख्याने,परिसंवाद,सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. सोमवारी अधिवेशनाच्या तिसऱ्या व शेवटच्या



दिवशी नवोदित कवींचे काव्य संमेलन झाले.त्यानंतर मराठा सेवा संघ व ३३ कक्ष पुनर्बांधणी कृती कार्यक्रम व अंमलबजावणी तसेच जिजाऊ रथ यात्रेचे अनुभव आणि फलश्रुती या विषयावर परिसंवाद झाला. त्यामध्ये प्रदेश नवनाथ घाडगे,जिजाऊ ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष सीमा बोके, संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे, वारकरी परिषदेच्या महासचिव ज्योती राजेजाधव, प्रा. अर्जुन तनपुरे, सौरभ खेडेकर, संदीपान जाधव व मनोहर तुपकर यांनी सहभाग घेतला.त्यानंतर गंगाधर बनबरे यांचे नाचू कीर्तनाचे रंगी या विषयावर व्याख्यान झाले.

दुपारी यवतमाळच्या स्नेहा टोम्पे यांचे माहितीचे जग आणि जगणे या विषयावर व्याख्यान झाले. नित्य नवे कायदे नित्य नवा संघर्ष या विषयावर पुण्याचे विधीज्ञ मिलिंद पवार यांचे व्याख्यान झाले. कला क्षेत्रातील जातवाद आणि बहुजन समाज या विषयावर सिने अभिनेते किरण माने यांचे व्याख्यान झाले. समारोप सत्रात पुरस्कार वितरण झाल्यानंतर मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर उपस्थितांना मार्गदर्शन केले. व रात्री लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांच्या लावणी उत्सवाने या अधिवेशनाचा समारोप झाला. पुढे बोलताना खेडेकर यांनी जुलैमध्ये प्रत्येक जिल्ह्यात संघाच्या ३३ कक्षांचे बळकटी करणाच्या दृष्टीने समित्या नेमून जुन्या व नवीन कार्यकर्त्यांना घेऊन राज्य व जिल्हा पातळीवरील पदाधिकारी निवडल्या जाणार असल्याचे सांगितले. मराठा सेवा संघाच्या सांस्कृती करणाची गरज असून त्यादृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचेही आवाहन केले.

#### यांना केले पुरस्कारांनी सन्मानित

जयसिंह मोहिते-पाटील यांना छत्रपती शाहू महाराज आश्रयदाता पुरस्कार, जन्मेंजय भोसले, सिने कलावंत किरण माने, शिवशाहीर राजेंद्र कांबळे, अर्जुन तनपुरे व सौरभ खेडेकर यांना पुरस्कार देण्यात आले.

## शिवशाही बस आकारणी कमी करा

### ग्राहक पंचायतीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ मे -**
सध्या राज्या बरोबरच जिल्हात धावत असलेल्या शिवशाही बसेसची स्थिती अत्यंत खराब असल्याने त्याची भाडे आकारणी साध्या बसप्रमाणे करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने राज्य परिवहन महामंडळा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे केली असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वातानुकुलित आराम बस म्हणून शिवशाही राज्य परिवहन हामंडळाने प्रवाशांच्या सेवेत दाखल केली. काही दिवस तिची चांगली सेवा मिळाली. परंतु मागील वर्षभरापासून तीची अवस्था अत्यंत गंभीर व खराब झाली आहे. मोबाईल चार्जिंग पॉईंट, नाईट लँप चालू नाहीत. बस रस्त्यावर बंद पडण्याचे प्रमाण जास्त,संथ गतीने धाव, इंजिनचा मोठा आवाज, अशा असंख्य त्रुटी असुनही आराम बस म्हणून लठ्ठदराने प्रवाशांच्या सेवेत आहेत. या सर्व बाबी प्रवाशांच्या सेवेतील त्रुटी आहेत. त्यामुळे अशा बसेसची तिकीट आकारणी तात्काळ साध्या दराने करावी, अशी मागणी मार्च महिन्यामध्ये विभाग नियंत्रक यांच्यामार्फत करुनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अशा बसमधून प्रवास केलेल्या सर्व प्रवाशांना जादा दराने आकारणी केलेले प्रवास भाडे परत मिळण्यासाठी गाहक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात येईल तरी महामंडळाने तातडीने त्रुटी असलेल्या शिवशाही बसचे प्रवास भाडे आकारणी सामान्य दराने करावी अशी मागणी ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते सौ. माधुरी परदेशी यांनी पत्राद्वारे केली आहे.

## आरोपीची निर्दोष मुक्तता; बार्शी न्यायालयाचा निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ मे-**
बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. के मांडे यांनी दि. ७ मे रोजी आरोपी विलास दत्तात्रय जगताप याची लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, कलम १२ या आरोपातून सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली.



दि. १८ एप्रिल २०१९ रोजी फिर्यादीने टेंभूर्णी पोलीस स्टेशन येथे आरोपी पीडित अल्पवयीन बालिकेचा नेहमी पाठलाग करुन अश्लील हावभाव वगेरे कारणावरुन आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुद्ध टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे गू. र.नं. २६४/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने सत्र न्यायालय बार्शी येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले व खटला सुरु करण्यात आला. खटल्याच्या कामी फिर्यादी तसेच अनेक साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविण्यात आले व अखेर दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद करण्यात आला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद व उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले न्याय निवाडे ग्राह्य धरून आरोपीस सदर खटल्यातून निर्दोष मुक्त केले. आरोपींकडून ॲड.अमोल अलाट यांनी खटल्याचे कामकाज पाहिले.

## बाळासाहेब देशमुख यांचा अकलूज येथील महाअधिवेशनात विशेष सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी,दि.१३ मे-**
देशमुख आणि कंपनीच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर नावलौकिक मिळवलेले उद्योजक बाळासाहेब देशमुख यांचा मराठा सेवा संघाच्या वतीने अकलूज येथील महाअधिवेशनात भरीव योगदानाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. बाळासाहेब देशमुख यांनी नेहमीच आपल्या उद्योगासोबत सामाजिक बांधिलकीतून समाजासाठी सातत्याने काम केले आहे.

मे. देशमुख आणि कंपनीच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना रोजगार दिला आहे. गुणवत्तापूर्ण रस्ते व चांगल्या दर्जाचे काम ही त्यांच्या कंपनीची ओळख निर्माण झाली आहे. अनेक सामाजिक कार्यास त्यांचा नेहमीच हातभार राहिला आहे. अकलूज येथे संपन्न झालेल्या महाअधिवेशन सोहळ्यात मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर, सिनेअभिनेते किरण माने, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, सचिन जगताप, निलेश देशमुख उपस्थित होते.

## तरुणाने प्राशन केले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि. १३ मे -**
अज्ञात कारणातून तरुणाने पिकावर फवारणी करण्याचे औषध प्राशन केले. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील माळकवठे येथे सोमवारी दुपारी चारच्या सुमारास घडला. अर्जुन अंबण्णा कोटे (वय ३३ ) असे तरुणाचे नाव आहे. सोमवारी दुपारी चारच्या सुमारास अर्जुन हा माळकवठे गावातील त्याच्या घरात होता. त्यावेळी त्याने अज्ञात कारणातून पिकावर फवारणी करण्याचे औषध प्राशन केले. मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून आई गौराबाई यांनी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## आरोग्यासाठी आवश्यक सुविधा पंढरपुरात निर्माण झाल्या पाहिजेत : आ. अभिजीत पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मे-**
पंढरपूर शहर मोठ्या गतीने वाढत आहे, अशा या शहरामध्ये आरोग्य चांगले राहावे यासाठी वेगवेगळ्या सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. फिजिओथेरपी या संदर्भातील जाणीव जागृतीही वाढली पाहिजे असे मत आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले. डॉ. श्रेया मिलिंद टोमके यांच्या गांधी रोड येथील नव्याने सुरू केलेल्या आरोग्यम फिजीओथेरपी क्लिनिकच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत पंढरपूरचे प्रसिद्ध जेष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. गिरीश बेणारे, दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ॲड. वैभव टोमके आणि चंद्रकांत डावरे (परभणी) हे होते.




याप्रसंगी टोमके परिवारावरील मैत्री संबंध नात्याने आवर्जून उपस्थित राहिलेले आमदार अभिजित पाटील पुढे बोलताना म्हणाले, की आपल्या गावातील लोकांची सेवा करण्याच्या उद्देशाने पंढरपूरची निवड करून डॉ .श्रेया टोमके यांनी जे फिजिओथेरपी क्लिनिक उभारले आहे, यातून सेवाभावी वृत्तीने पंढरपूरकरांची डॉ.श्रेया यांनी सेवा करावी. सध्या युद्धजन्य स्थिती आहे अशातच फिजिओथेरपीस्ट डॉक्टरांची नितांत गरज देशाला मौलिक ठरणार आहेत. डॉ.गिरीश बेणारे म्हणाले, की पूर्वीचा काळ व सध्याचा काळ यामध्ये खूप फरक आहे. नवनवीन उपचार पद्धती येत आहेत. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये फार पूर्वीपासून ज्या उपचार पद्धती अस्तित्वात होत्या, त्याच नव्याने आपल्यासमोर येत आहेत. या पद्धतीचा उपयोग आपल्या आरोग्यासाठी होत असतो. फिजिओथेरपीमुळे अनेक आजारांमध्ये व्यक्तीला परिपूर्ण उपचार मिळतो व त्याच्या शरीराची होणारी हानी टाळू शकते. याप्रसंगी बोलताना ॲड वैभव टोमके म्हणाले, डॉ. श्रेया यांनी शहराच्या मध्यवर्ती भागात क्लिनिक सुरू केल्याने गावभागातील वयस्कर पेशंट यांना अधिक लाभदायक ठरणार आहे. या बरोबरच नागेश फाटे, माया कुलकर्णी (सांगोलकर) आदींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मिलिंद टोमके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आभार उमेश टोमके यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन लादे यांनी केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी सर्व टोमके परिवार, नगरसेवक विवेक, अमरनाथ परदेशी, व्हि.डी. परिचारक, अर्बन बँकेच्या व्हा. चेअरमन माधुरी जोशी, अभय जोशी, दै. सोलापूर तरूण भारतचे महेश भंडारकवठेकर, ॲड. ओंकार जोशी, पोलिसमित्र श्रीराम बडवे, निकते सर्जिकलचे किशोर निकते आदींसह व्यापारी, मित्रमंडळी तसेच सामाजिक, वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन महेश टोमके, रोहित टोमके, आकाश टोमके यांनी केले.

## संत नामदेव क्षत्रिय एकसंघ प्रदेशाध्यक्षपदी गणेश उंडाळे

### सचिवपदी विलास पोरे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मे -**
अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या पदाधिकाऱ्यांची निवड पंढरपूर येथे झालेल्या विचार विनिमय बैठकीप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी पंढरपूर शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे व सचिवपदी विलास पोरे यांची निवड करण्यात आली.

पंढरपूर येथे अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी राज्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहिर करण्यात आल्या. यावेळी सर्वश्री ह.भ.प. माधव महाराज नामदास, मुकुंद महाराज नामदास, ज्ञानेश्वर महाराज नामदास, निवृत्ती महाराज नामदास, केदार महाराज नामदास, केशवराज संस्थेचे सर्वेसर्वा व एकसंघाचे राष्ट्रीय सचिव रुपेश खांडके, संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे उपाध्यक्ष संजय जवंजाळ, सचिव विलास पोरे, विश्वस्त राजेश धोकटे, महेश गानमोटे, सोलापूरचे धनंजय जवंजाळ, महेश रेळेकर, ॲड.अजय तल्लार, मनोज भांडारकर, नंदकुमार कोसमतवार, अनिल गचके आदी उपस्थित होते.तसेच प्रदेश उपाध्यक्ष म्हणून परळी वैजनाथचे कैलास धोकटे (मराठवाडा विभाग), युवराज सुतोने (नागपूर-विदर्भ विभाग), नटवरलाल टेलर-कल्याण (मुंबई विभाग), विजय माळवदे (कोकण विभाग), शितल माळवदे (महिला कार्यकारणी, कोकण विभाग), संतोष मुळे (पश्चिम महाराष्ट्र विभाग), पश्चिम महाराष्ट्र संघटक म्हणून खेमराज नामा तसेच जिल्हा प्रमुख म्हणून काकडे (कोल्हापूर), महेश रेळेकर (सोलापूर), ॲड. सागर मांढरे (पुणे शहर), सुनिल पोरे (पुणे ग्रामीण), गजेंद्र शिंपी (नंदुरबार), गणेश सोनवणे (धुळे), शरद सोनवणे (जळगाव) यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

पंढरपूर येथे राज्य शासनाच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या संत नामदेव महाराजांच्या स्मारकासाठी एकसंघाने वेळोवेळी पाठपुरावा केला असून प्रशासकीय बाबींची पुर्तता झाली आहे. त्यामुळे लवकरच स्मारकाचे काम सुरु होणार आहे. यावर्षी २३ जुलै रोजी संत नामदेव महाराजांचा ६७५ वा संजिवन समाधी सोहळा पंढरपुरात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नुतन पदाधिकाऱ्यांनी एकसंघाच्या माध्यमातून आपापसातील मतभेद दूर ठेवून समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन अध्यक्ष उंडाळे यांनी केले व निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

या बैठकीस महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून शिंपी समाजाचे पदाधिकारी व समाज बांधव, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन राजेश धोकटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष प्रथमेश परांडकर, युवक संघटनेचे अध्यक्ष पै. शैलेश धट, केशवराज संस्थेचे सदस्य जयवंत कांबळे, पत्रकार प्रशांत माळवदे, निलेश धोकटे, प्रशांत काकडे, दत्ता चांडोले, अक्षय महिंद्रकर, कृष्णा जवंजाळ, अनिल धट, माऊली निकते, प्रकाश मेटकर आदींनी परिश्रम घेतले.




## संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्काराने सतीश दीडवाघ सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ मे-**
प्रहार जनशक्ती पक्षातर्फे सोलापूर, लातूर, धाराशिव या विभागातुन संताजी धनाजी कार्यकर्ता सन्मान अभियान २०२५ यातून प्रथम क्रमांकाचा संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्कार सांगोल्यातील सतीश सीताराम दीडवाघ यांना माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडु यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी महेश बडे, मंगेश ठाकरे जिल्हाध्यक्ष दत्ता मस्के, नगरसेवक बाबा मिस्त्री, जमिर शेख, विजय पुरी, संजय जगताप, अमोल जगदाळे यांच्यासह सांगोला तालुक्यातील दिव्यांग बांधव उपस्थित होते. सतीश दीडवाघ यांनी सांगोला तालुक्यातील दिव्यांग बांधवांना त्यांचा हक्काचा ५ टक्के निधी, पेन्शन, दिव्यांग प्रमाणपत्र, व्यवसायासाठी गाळे उपलब्ध करून देणे, घरकुल, अंत्योदय रेशनकार्ड, शासनाच्या वेगवेगळ्या सवलती मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलने, उपोषणे वेगवेगळ्या स्वरूपाचे मोर्चे काढले. सदर कामाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या जनता दरबारचे १५ मे रोजी आयोजन

**पंढरपूर, दि. १३ मे-**

मराठा समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास व सुशिक्षित बेरोजगार तरुणांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य करत आहे,त्या अनुषंगाने मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना महामंडळाच्या व बँकेकडून येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत १५ मे रोजी जनता दरबार आयोजित केला आहे. हा जनता दरबार गुरुवारी, १५ मे रोजी सकाळी दहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ उपकेंद्र कार्यालय, गाळा नंबर ७, इंदिरा गांधी चौक शॉपिंग सेंटर, पहिला मजला, पंढरपूर येथे होणार आहे. पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला व माळशिरस तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांना महामंडळाच्या योजनेसंदर्भात येणाऱ्या अडचणीची सोडवणूक करून घेणे आहे त्या मराठा बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## महत्वाचे...





### सरस्वती माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा ९८.६३ टक्के निकाल

**ओमराजे मगर विद्यालयात प्रथम**

**सोलापूर, दि. १३ मे-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयाचा फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेचा शेकडा निकाल ९८.६३ टक्के लागला असून, एकूण परीक्षेत बसलेल्या १४७ विद्यार्थ्यांपैकी १४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दरम्यान, यामध्ये प्रथम क्रमांक मगर ओमराजे संतोष (९६.२० टक्के) यांनी पटकावला. या शाळेत द्वितीय क्रमांक नवगिरे विवेकानंद मुकुंद -९४ टक्के, तृतीय क्रमांक जेनुरे साक्षी सुदाम -९३.४० टक्के, चतुर्थ क्रमांक चौगुले राज रावसाहेब-९३ टक्के याने पटकावला. तर भाकरे वैष्णवी विठ्ठल ९२.२० टक्के, गायकवाड आदिती तुकाराम ९२.२० टक्के, शेख अल्फीया फैयाज ९२.२० टक्के, गाटे रविराज नानासाहेब ९१.४० टक्के, सुरते साक्षी सूर्यकांत ९१.२० टक्के, धोतरकर शेता भरत ९०.२० टक्के, वडणे संस्कृती ज्ञानेश्वर ९० टक्के असे विशेष प्राविण्यासह ७४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ६० विद्यार्थी व द्वितीय श्रेणीमध्ये ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सरस्वती विद्यालयाचे प्राचार्य सुहास वडणे यांच्या सुनियोजनामुळे तसेच सरस्वती विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बसवनप्पा मसुते, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सचिव यशवंत लोंढे, पर्यवेक्षक सावळे व सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले.

### अणदूरच्या जवाहर विद्यालयाचा निकाल ९६.५३ टक्के

**अणदूर, दि. १३ मे-**



अणदूर (ता.तुळजापूर) येथील जवाहर विद्यालयाचा दहावीचा निकाल ९६.५३ टक्के लागला आहे. स्व सि.ना.आलूरे गुरुजींच्या या शाळेने आपली उज्वल यशाची परंपरा जपली आहे. यंदाच्या दहावी परीक्षेत दोन विद्यार्थ्यांनी समान गुण घेऊन, प्रथम क्रमांक पटकाविला असून, नमन गणपती कांबळे व समृध्दी सत्यवान अभिवंत या दोघांना ९९.२० टक्के गुण पडले. तर व्दितीय- निवेदिता विजयकुमार गायकवाड ९८.८० टक्के, तृतीय-केतकी संगमेश्वर संगशेट्टी ९८.६० टक्के यांनी घवघवीत यश संपादन केले. विद्यालयातून ३७५ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्यापैकी विशेष प्रविण्य-१३७, प्रथम श्रेणी-११०, व्दितीय श्रेणी-६९, तृतीय श्रेणी-४६, अनुत्तीर्ण-१३ एकूण उत्तीर्ण - ३६२, शेकडा निकाल-९६.५३ टक्के असा लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, संस्थेचे मार्गदर्शक लक्ष्मीकांत पाटील, नागनाथ कानडे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

### गुळपोळीच्या भैरवनाथ विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**वैराग, दि. १३ मे-**

एसएससी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये भैरवनाथ माध्यमिक विद्यालय गुळपोळी या विद्यालयाने सलग अठरा वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत प्रशालेच्या यशामध्ये उच्चांक गाठला आहे.. या विद्यालयातील साक्षी शिवाजी काळे ९४.२० टक्के हिने जामगाव केंद्रात प्रथम क्रमांक पटाकवला असून नेहा दत्तात्रय काळे ९२.८० टक्के हिने जामगाव केंद्रात तृतीय आली तर अंजली काकासाहेब खबाले ९२. २० टक्के जामगाव केंद्रात चौथी आली आहे . गुलाब शेख ९१.४० टक्के , दिव्यानंद मचाले ९० टक्के, संस्कृती सांब बारवकर ८९ .६० टक्के गुण मिळविले आहेत. प्रशालेतून या परीक्षेसाठी ३५ विद्यार्थी बसले होते. यापैकी ९० टक्केच्या पुढे ६ विद्यार्थी ८० टक्के च्या पुढे १७ विद्यार्थी ७० टक्के च्या पुढे १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. प्रशालेतील या यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक प्रमोद देशमुख यांचेसह सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. प्रशालेच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुण कापसे, मुख्याध्यापक प्रमोद देशमुख यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### अमृता नलवडेचा ९८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक

**पंढरपूर, दि. १३ मे-**



पंढरपूर माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ पुणे विभागातील खासदार इय दहावी बोर्ड मध्ये रयत शिक्षणवंत यशवंत विद्यालय पंढरपूर येथील अमृता दादा नलवडे या विद्यार्थिनी ९८.२० टक्के गुण शोधून विद्यालय प्रथम प्राप्त.विठ्ठल रुक्णी मंदिर येथील वरिष्ठ अधिकारी आयकॅडे दादासो नल यांच्या कन्या आहेत.सगरे संभाजीराजे सगरे ९५टक्के,केशा जमीर खाटी ९४० असे गुण निर्माण करून या उमेदवारी प्राप्त केली.या उज्वल यशवंत विद्यार्थी व संचालक शिक्षकांचे रयत अभ्यासले चेअरमन चंद्रकांत दवी, विकास देशमुख, चेअरमन संजीव पाटील, विभागीय अधिकारी जगदा, बॉडी तसेच सदस्य स्कूल कमिटी सदस्य राजेंद्र जाधव, सुनेत्रा पवार, मुख्यध्याप अनिता साळवे, अध्यापक, शाळकरी, शाळकरी पालक, शिक्षक पालक संघ, सामाजिक विद्यार्थी संघ यांनी अभिनंदन करून शैक्षणिक वाटचालीसाठी भाग घेतला.

## जन्मेजयराजे भोसले यांचा विशेष पुरस्काराने गौरव

**मराठा सेवा संघाकडून देण्यात आला पुरस्कार**




**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १३ मे-**

मराठा सेवा संघाच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले यांचे चिरंजीव जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले संस्थापक अध्यक्ष श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), अक्कलकोट यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

शंकरनगर-अकलूज येथील स्मृतीभवनामध्ये मराठा सेवा संघाच्या वतीने ३ दिवसीय राज्यस्तरीय महाअधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाची सोमवारी मोठ्या उत्साहात सांगता झाली. या कार्यक्रम प्रसंगी जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले संस्थापक अध्यक्ष श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), अक्कलकोट यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्ष स्थानी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरषोत्तम खेडेकर हे होते.

दरम्यान मराठा सेवा संघाचे ३०वे राज्यस्तरीय अधिवेशन सुरु होते या मध्ये अनेक वक्त्यांनी विविध विषयावर वाख्याने, परिसंवाद, सांकृतिक कार्यक्रमाची रेलचेल होती. जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले संस्थापक अध्यक्ष श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), अक्कलकोट यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आल्याबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. या कार्यक्रमास स्वागत अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख (शिंदे गट) अमोल शिंदे, सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष विजयकुमार घोगरे, कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, सनी सोनटक्के, प्रकल्प संचालक पुरुषोत्तम कडू, केंद्रीय कार्यकारणी सदस्य उत्तमराव माने शेंडगे, गंगाधर बनबरे, संदीपपान जाधव, स्नेहा टोणपे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश अध्यक्षा शिमला बोके, संभाजी ब्रिगेडच्या ॲड. मनोज आखरे, ना.तु. वारकरी परिषदेचे महा सचिव ज्योती राजे जाधव, लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर, सिने दिग्दर्शक नागराज मंजुळे, सिने कलावंत किरण माने, शिवशाहीर राजेंद्र कांबळे, ॲड. मिलिंद पवार, जिजाऊ रथ यात्रेचे मुख्य समन्वयक प्रा. अर्जुन तनपुरे, रथ यात्रा प्रमुख सौरभ खेडेकर, डॉ. मनोहर तुपकर, धनाजी माने, जिल्हा सचिव हेम लता मुळीक, मनोरमा लावंड, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष वनिता कोरटकर, प्रियाताई नांगणे, शारदा चव्हाण, मनीषा जाधव, सुवर्णा घोरपडे, रविंद्र पवार, अशोकराव रणवरे, दिगंबर मिसाळ, नवनाथ कोडक, सिद्धेश्वर नागटिळक, डॉ. विश्वनाथ आव्हाड, शिवाजी शिंदे, बाळासाहेब पराडे, डॉ. अमोल माने, सचिव राजेंद्र मिसाळ, निनाद पाटील, श्री क्षेत्र अक्कलकोट चे गो रक्षक प्रथमेश पवार, शुभम कामनुरकर, विजय माने, प्रवीण घाडगे, आकाश सूर्यवंशी, आकाश गडकरी, प्रसाद मोरे, सागर जाधव, शिवराज स्वामी, सरफराज शेख, बाळासाहेब देसाई बाबलादकर, प्रशांत साठे, महांतेश स्वामी, श्री गुरव, यश विभूते आदिजन बहुसंख्येने उपस्थित होते.

## भाजप सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्षपदी चेतनसिंह केदार सावंत यांची फेरनिवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ मे-**

भारतीय जनता पार्टीने आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सदस्य नोंदणीचे उदिष्ट दिले होते. चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील तालुका प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्ती केंद्रप्रमुख व बूथ प्रमुख यांनी दिवस-रात्र मेहनत करून भाजप सदस्य मोहिमेत राज्यात अव्वल क्रमांक पटकावला.

या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी भाजपच्या सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्षपदी चेतनसिंह केदार सावंत यांची फेरनिवड केली आहे. सदर निवड जाहीर झाल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला.

> “ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा.रणजीतसिंह निंबाळकर, आ.चित्राताई वाघ, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, आ.सचिन कल्याणशेट्टी, माजी आ. राजाभाऊ राऊत, माजी आ.प्रशांत परिचारक, माजी आ.राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचे संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार
>
> **- चेतनसिंह केदार सावंत,**
> ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्ष, भाजपा



जल्ह्यात भारतीय जनता पक्षाची पकड अधिक घट्ट करण्यासाठी भाजप प्रदेश कार्यकारिणीच्या आदेशान्वये सदस्य नोंदणीची जोरदार मोहीम हाती घेतली होती. या अभियानात चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हा भाजप सदस्य नोंदणीत महाराष्ट्रात अव्वल ठरला आहे. त्याची पोचपावती म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकारिणीच्या साक्षीने भाजपचे सोलापूर ग्रामीण पश्चिमचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांचा सन्मान करून शाबासकी दिली होती.

## महाराष्ट्र विद्यालयाचे दहावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ मे-**

एसएससी परीक्षा सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

दहावी परीक्षेला ५०२ विद्यार्थ्यांपैकी ४८३ उत्तीर्ण झाले आहे. विद्यालयाचा शेकडा निकाल ९६.२१ टक्के लागला. या परीक्षेत विशेष श्रेणीसह एकूण १८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीमध्ये १६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, द्वितीय श्रेणीमध्ये १०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर पास श्रेणीमध्ये ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयात आलेले प्रथम ३ क्रमांक पुढीलप्रमाणे- प्रथम क्रमांक गुंड भक्ती नितीन ९७.६० टक्के व खोंदे सुमेरा जहॉगीर ९७.६० टक्के, द्वितीय क्रमांक तांबारे ईश्वरी बालाजी ९७.४० टक्के तर तृतीय क्रमांक लोमटे वैष्णवी श्रीकांत ९७ टक्के व गुंड सार्थक विजय ९७ टक्के या दहावीच्या परीक्षेमध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारी विद्यार्थी संख्या ही ५५ आहे.

यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मिरा यादव, एस.बी. शेळवणे, सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.






## मागील ११ वर्षाची परंपरा कायम
## इंडियन मॉडेल स्कूलचा १०० टक्के निकाल

**तभा प्रतिनिधी,**
**अक्कलकोट, दि. १३ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभागाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी परीक्षेचा निकाल आज जाहिर झाला त्यात अक्कलकोट येथील इंडियन मॉडेल स्कूलचा १०० टक्के निकाल लागला असून यात संकेत धडके यांनी ९८.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला.

शेजल संतोष जाधव फुटाणे या विदयार्थीनीनी ९८.२० टक्के गुण मिळविले व दिशा कामाठी यानीही ९८.२० गुण मिळवित व्दितीय क्रमांक मिळवले व यथार्थ पाटील याने ९७.६० गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविले. एकुण विदयार्थ्यांपैकी ९५ टक्केपेक्षा ही जास्त गुण मिळवलेले एकूण ९ विदयार्थी आहेत तर ९० टक्केच्या वर गुण मिळवलेले एकूण ३० विदयार्थी आहेत. या सर्व यशस्वी विदयार्थ्यांना माजी गृहराज्यमंत्री व शाळेचे संस्थापक अध्यक्ष सिध्दाराम म्हेत्रे. संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी सर. सायली जोशी मॅडम व संस्थेचे सचिवा शीतलताई म्हेत्रे, ममता बसवंती मॅडम प्रशालेच्या मुख्याध्यापिका गौरी दातार, बी.एड महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे व प्रशालेतील शिक्षकांनी या विदयार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जनसेवा संघटनेची नव्याने पुनर्बांधणी करणार

**✔ डॉ.धवलसिंह मोहीते-पाटील यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ मे-**

शेतकरी कामगार, कष्टकऱ्यांच्या प्रश्नावर झगडणारी एक सामाजिक संघटना असावी या भावनेतून सहकार महर्षी व लोकनेते स्व.प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी स्थापन केलेल्या जनसेवा संघटनेला आता वटवृक्षाचे स्वरूप आले आहे. जन सेवेचे सभासद असणारे अनेक जण आमदार खासदार झाले. मात्र मधल्या काळात संघटनेला मरगळ आली होती ती आता झटकून पुन्हा सर्वसामान्यांच्या प्रश्नावर आक्रमक होऊ असे आवाहन डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

अकलूज येथील त्यांच्या प्रतापगड या निवासस्थानी जनसेवा संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी प्रतिमापूजनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रथम पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात जीव गमावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानवर हवाई हल्ले करून चोख प्रत्युत्तर दिले याबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अभिनंदनाचा ठराव अण्णासाहेब शिंदे यांनी मांडला. त्यास प्रताप झनजे यांनी अनुमोदन दिले. यावेळी अण्णासाहेब इनाम दार यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात जनसेवा संघटनेच्या माध्यमातून झालेल्या सामाजिक कामांचा आढावा घेतला.तसेच यावेळी भिमराव बाळगी, शाहीर राजेंद्र कांबळे, अशोक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. निकम यांनी सूत्रसंचालन केले तर सुधीर रास्ते यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून जनसेवा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्ह्यात यंत्रणांनी पाणी टंचाईबाबत सतर्क राहावे

**✔ जिल्हाधिकारी आशीर्वाद**
**✔ पाणीटंचाई आढावा बैठकीत सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मे-**

जिल्ह्यात सद्यस्थितीत ६ तालुक्यातील २६ गावांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. जिल्ह्याच्या अन्य ठिकाणाहून टँकर मागणीचे प्रस्ताव आल्यास त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी संयुक्त स्थळ पाहणी करावी व विहित नियमावलीप्रमाणे तात्काळ निर्णय घ्यावा. तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी पाणीटंचाई निवारणार्थ अत्यंत सतर्क राहून काम करावे व एकही नागरिक पाण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित




पाणीटंचाई आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, महसूल उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, भूजलचे वरिष्ठ भू वैज्ञानिक शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पुढे म्हणाले की, टंचाई आराखड्यात प्रस्तावित केल्याप्रमाणे विहीर व विंधन विहीर अधिग्रहण करण्यात याव्यात. तसेच सद्यस्थितीमध्ये २६ गावांमध्ये सुरू असलेले ३२ टँकर तर सुरूच ठेवावेत परंतु अन्य ठिकाणाहून नागरिकांनी टँकर मागणीचे प्रस्ताव दिले असतील तर संबंधित अधिकाऱ्यांनी संयुक्त स्थळ पाहणी करून त्यावर तात्काळ निर्णय घ्यावा. सर्व उपविभागीय अधिकारी तसेच तालुकास्तरीय यंत्रणांनी एकही गाव, नागरिक यांना पाण्याची टंचाई भासणार नाही यासाठी अत्यंत सतर्कता ठेवून काम करावे असे निर्देश त्यांनी दिले. सर्व उपविभागीय अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्याकडून लघु व मध्यम पाणी प्रकल्पामधील पाणीसाठ्याची माहिती घ्यावी व हा पाणीसाठा किती दिवस पुरेल त्याची सूक्ष्म माहिती घेऊन त्याप्रमाणे काटेकोरपणे नियोजन करावे. सर्व उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जिल्हा परिषद यांनी नळ योजनेची विशेष दुरूस्ती ची सर्व कामे त्वरित मार्गी लावावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. महसूल उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी टंचाई कृती आराखड्याप्रमाणे टंचाई निवारणार्थ घेण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती बैठकीत दिली.